वऱ्हाड समाचाराची किंमत

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्षाची अगाऊ | रु० ५ | डांक हाशील | ०।३ |
| सहामाही | ,, ३ | ,, | ०।८ |
| सालअखेर | ,, ७ | ,, | १।०।८ |
| किरकोळ अंकास | | | ०।४ |

नोटीशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०।६
दुसरे खेपेस ......०।१

SUBSCRIPTION

| | Rs. | | |
|---|---|---|---|
| per annum in advance | 5 | Postage 13 as |
| Per annum in arrears | 7 | ,, 1Rs. 8 as |
| Six monthly............ | 3 | ,, 8 as |
| Single copy........................ | | 4as |

Ad vertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line 3 as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOL XXV AKOLA MONDAY 1 JUNE 1891 NO 21

वर्ष २५ अकोला सोमवार तारीख १ माहे जून सन १८९१ इ० अंक २१


## औद्योगिकपरिषद्

किंवा

कारागीर, कारखानदार, व्यापारी व देशांतील उद्योगधंदे वाढविण्याविषयीं हस्तेपरहस्तें खटपट करणाऱ्या लोकांची सभा.

येत्या आगष्ट महिन्यांत पुणें मुक्कामीं भरणार आहे.

सभेची तारीख, सभेपुढें यावयाचे विषय वगैरे बद्दल कच्ची माहिती मागाहून कळविण्यांत येईल

सभेसाठीं येऊं इच्छिणार लोकांनीं तारीख १५ जुलईचे आंत खालीं सही करणार यांजकडे आपलीं नांवें कळवावीं

पुणें, रेम्युझिम कचेरी ता. १३ माहे मे १८९१ — महादेव बल्लाळ नामजोशी, देशी कारागिरीस व धंद्यास उत्तेजन देणारे मंडळीचे सेक्रेटरी.

## जाहिरात.


एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आह्मांस कळवावें. माफक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा.

जी. डी. कविटकर
मर्चंट आणि कमिशनर एजंट
शहर एलिचपूर


## भंगी पट्टाच्या नवीन नियमांचा दुरुस्त केलेला मसुदा

सन १८८६ च्या वऱ्हाड मुनसिपल कायद्या अन्वयें भंगी पट्टीच्या नियमांचा दुरुस्त झालेला मसुदा अकोलें मुनिसिपाल कमिटीच्या हुकमावरून प्रसिद्ध करण्यांत आला आहे. कोणाचो या नियमा संबंधानें कांहीं तकरार असेल तर ती त्यानें तारीख १ जुलै सन १८९१ च्या पूर्वी कमिटीचे आफिसांत लेखी दाखल करावी:—

१. या नियमांचे अमलबजावणी करितां मुनिसिपालिटीच्या हद्दीचे, कमिटीस वेळोवेळीं योग्य वाटतील तेवढे, पोटभाग केले जातील.

२. प्रत्येक पोट भाग एका एका म्युनिसिपाल शिपायाच्या ताब्यांत दिला जाऊन त्या पोटभागांतील खानगी पायखाने नीट सफा केले जातात हें पहाणें त्या शिपायाचें काम समजलें जाईल.

३. शौचेस बसण्यासाठीं जी जागा तयार केली असेल तीस पायखाना ही संज्ञा आहे. त्या जागेंत एक अथवा अधिक शौचेस बसण्याच्या बैठकी असूं शकतील.

पायखाने खानगी व सार्वजनिक आहेत.

म्युनिसिपाल कमिटीच्या मालकीचे व तिच्या व्यवस्थेखालीं असलेले पायखाने सार्वजनिक पायखाने होत बाकीचे पायखाने खानगी होत.

४ सर्व प्रकारचे पायखाने मुनिसिपालटीच्या हुकुमखालीं सफा केले जातील, व त्यांचे नमुने वगैरे कमिटी कडूनच ठरविले जातील. या कामाकरितां कमिटी जरूरियात भंगी लोक व शिपाई नौकरीस ठेवील.

कोणा इसमास आपला पायखाना सफा करण्याकरितां स्वतंत्र भंगी ठेवायाचा असेल तर त्यास प्रत्यवाय नाहीं, पण कमिटीनें नोकरीस ठेवलेल्या भंग्यास त्यानें नोकर ठेवूं नये.

५. प्रत्येक खानगी पायखाना रोज एकवेळ सकाळीं सफा केला जाईल.

६. ज्या कुटुंबांत १५हून जास्त इसम असतील त्या कुटुंबाच्या मालकानें आपला पायखाना, नियम ९ यांत सांगितलेल्या दराच्या दीडपट दर देऊन, दिवसांतून दोन वेळ—सकाळीं व संध्याकाळीं—सफा करवून घ्यावा.

दुसऱ्या कोणा इसमास आपला पायखाना दिवसांतून दोन वेळ सफा करून घेणें असेल तर याप्रमाणें दीडपट आकार देऊन त्यांस ही करून घेतां येईल.

७. कॉटन फॅकटरीशीं व सिव्हिलस्टेशन मध्यें राहणाऱ्या लोकांशीं, त्यांचे पायखाने सफा करण्यासंबंधानें व कमिटीच्या मैल्याच्या गाड्यांचा उपयोग करण्यासंबंधानें कमिटीस निराळे ठराव करितां येतील.

८. सिव्हिल स्टेशन मध्यें राहणाऱ्या लोकांस आपल्या कांपौन्डांत नोकरां करितां पायखाना करितां येईल व त्यांनीं कमिटीस महिन्यास एक रुपया आकार दिला तर कमिटीचे भंगी सदरहू पायखाने साफ करितील.

९. सध्यां उपयोगांत असलेल्या पायखान्याच्या मालकांनीं व नवीन पायखाना सुरू करूं इच्छिणाऱ्या इसमांनीं पायखान्याचा लायसेन्स घेतलें पाहिजे.

( विशेष खुलासा —१— ) या नियमा संबंधानें 'मालक' याचा अर्थ ज्या घरांत पायखाना असेल त्या घरांतील प्रत्येक रहिवासी अथवा त्या घरांत राहणाऱ्या प्रत्येक कुटुंबाचा कर्ता पुरुष असा समजला जाईल.

( विशेष खुलासा —२— ) एखाद्या पायखान्याचा उपयोग त्या घरांतील एकाहून जास्त राहिवासी अथवा कुटुंबाचे मालक करीत असतील तर त्या प्रत्येकानें निरनिराळें लायसेन्स घेतलें पाहिजे व हा प्रत्येक राहिवाशी व कुटुंबाचा मालक हे भंगी पट्टीचे नियम पाळण्या संबंधानें जबाबदार धरिला जाईल.

( विशेष खुलासा —३ ) कुटुंबांत असलेले नोकर त्या कुटुंबांतील माणसें ह्मणून समजले जातील.

१० म्युनिसिपाल कमेटी मार्फत सफा केले जाणारे खानगी पायखान्याचे मालकास खालील प्रमाणें लायसन्स फी द्यावी लागेल.

| | रु. आ. | |
|---|---|---|
| ज्या घराच्या मालकांचें उत्पन्न ९९ पेक्षां जास्त नाहीं त्यास. | १—८ | वार्षिक |
| | ०—१३ | सहामाही |
| | ०—७ | तीनमाही |
| ज्या घराच्या मालकाचें उत्पन्न ९९ हून जास्त व ५०० हून कमी आहे त्यांस. | ३—० | वार्षिक |
| | १—१२ | सहामाही |
| | १—० | तीनमाही |
| ज्या घराच्या मालकाचें उत्पन्न ५०० हून जास्त व १२०० हून कमी त्यास. | ६—० | वार्षिक |
| | ३—८ | सहामाही |
| | २—० | तीनमाही |
| ज्या घराच्या मालकाचें उत्पन्न १२०० हून जास्त आहे त्यांस | ९—० | वार्षिक |
| | ५—० | सहामाही |
| | २—१२ | तीनमाही |

मुदतः—वार्षिक लायसेन्साची मुदत ता. १ एप्रिल पासून ता. ३१ मार्च पर्यंत सहामाही लायसेन्साची मुदत तारीख १ एप्रिल पासून ता. ३० सप्तेंबर पर्यंत व ता. ३० सप्तेंबर पासून ता. ३१ मार्च पर्यंत.

तीनमाही लायसेन्साची मुदतः—

ता. १—४ पासून ३०—६ पर्यंत
ता. ३०—६ पासून ३०—९ पर्यंत
ता. ३०—९ पासून ३१—१२ पर्यंत
ता. ३१—१२ पासून ३१—३ पर्यंत

११. खानगी भंग्याकडून पायखाना सफ करविणारे मालकांस कमिटीच्या मैल्याचे गाड्यांचा उपयोग करण्याबद्दल वर्षास दीड रुपाया फी द्यावी लागेल.

१२. खानगी पायखान्याची पट्टी मालकानें आपल्या इच्छेप्रमाणें सालीना, सहामाही, व तीमाही द्यावी.

१३. ज्या मुदती करितां लायसेन्स आकार फी देऊन घेतलें असेल तेवढ्या मुदतीतच तें चालूं राहील.

१४ एखाद्या इसमास लायसन्साची मुदत संपण्यापूर्वीं परगांवीं कायमचें जावें लागलें तर जितके दिवस मुदत राहिली असेल तितक्या दिवसाचे पैसे त्यास कापून मिळतील. पण तीन महिन्याहून कमी मुदतीचा आकार काटून मिळणार नाहीं. तसेंच वर्षाच्या ज्या तीमाहींत तो जाईल त्या तीमाहीबद्दलही पैसे कापून मिळणार नाहींत. व पैसे परत मागण्या करितां अर्ज करणें तो ज्या मुदतीचे पैसे मागावयाचे असतील ती मुदत सुरूं होण्यापूर्वीं तो केला पाहिजे.

१५. ज्या मालकाजवळ पूर्वींचें लायसेन्स आहे त्यानें नवीन लायसेन्स घेतांना पूर्वींचें लायसेन्स, लायसेन्स देणाऱ्या कारकुनास द्यावें.

पूर्वींचें लायसेन्स दाखल न केलें तर त्याची स्थलप्रत आफिसांतून शोधून काढण्याकरितां अवजा त्याची नक्कल देण्याकरितां दोन आणे फी घेतली जाईल.

१६. लायसन्सें व्हाइस चेअरमनच्या सहीचीं मिळतील व तीं रविवार व इतर सुट्टीचे दिवस खेरीज करून इतर दिवशीं कमिटीचे ऑफिसांत सकाळीं ११ वाजे पासून संध्याकाळीं ५ वाजे पर्यंत मिळतील.

१७. नवीन लायसेन्स मागणारानें त्या करितां नमुना अ. प्रमाणें अर्ज करावा व त्या बरोबर लायसेन्स फी दाखल करावी. नमुना अ त्यास भरतां येत नसेल तर तो ऑफिस मध्यें भरून दिला जाईल त्यावर त्यानें आपली सही अथवा निशाणी करावी.

१८. ऑफिसांतून त्यास नं. नमुन्या प्रमाणें लायसेन्स मिळेल.

१९ चालूं मुदतींत मालकाकडून लायसेन्स हरवलें गेलें तर दोन आणे फी दिली असतां त्याची नक्कल मिळेल व तिचा असल प्रमाणें उपयोग करितां येईल.

२०. खालील इसमांस सूर्योदयापासून सूर्यास्ता पर्यंत खानगी पायखाने तपासण्याचा व लायसेन्स पाहण्यास मागण्याचा अधिकार आहे.

( १ ) व्हाइस चेअरमेन.
( २ ) सेक्रेटरीज्.
( ३ ) कान्सरव्हन्सी सुपरिंटेन्डेंट.
( ४ ) कमिटीचा इतर कोणीही मेंबर.
( ५ ) कानसरव्हन्सी इन्पेक्टर.
( ६ ) कान्सरव्हन्सी जमादार व शिपाई.

२१. सध्यां उपयोगांत असलेल्या पायखान्याचे मालक आपले पायखाने दुरुस्त स्थितींत ठेवण्या बद्दल जबाबदार आहेत. हर्ष रस्त्याच्या बाजूनें, सध्यां असलेले पायखाने व नवीन होणार पायखानें यांची जागा, ठेवण, व रचना हीं कमिटीनें नेमलेल्या अधिकारानें मंजूर केली पाहिजे. त्या विना ते पायखाने सुरू [illegible] राहींत. कान्सरव्हन्सी सुपरिन्टेन्डन्ट कडे हे मंजूर करण्याचें काम बहुधा राहील.

२२. एखाद्या मालकास त्याच्या पायखान्यांत खोलखडा पाहिजे अथवा कमिटीनें पसंत केलेलें दुसरें तशाच प्रकारचें मैला सांचण्याकरितां टोपलें वगैरे ठेवण्या विषयीं लेखी नोटिशीनें फर्मावण्याचा अधिकार कमिटीस आहे. मालकानें त्या दिलेल्या मुदतींत तें ठेवलें पाहिजे.

२३. खानगी पायखाने अथवा सार्वजनिक पायखाने या शिवाय म्युनिसिपलिटीच्या हद्दींत इतर जागीं कोणी शौचास बसूं नये.

२४. सार्वजनिक पायखान्यांचा उपयोग फक्त शहरांत आलेल्या प्रवाशी लोकांनीं व ज्यांचें उत्पन्न सालीना १०० रुपयांहून कमी आहे त्यांनीं करावा. इतर कोणी करूं नये.

२५. हे नियम जो कोणी मोडील त्यास तन

१८८६ च्या वऱ्हाड म्युनिसिपाल कायद्याचें कलम ११८या अन्वयें गुन्हा केला असें समजलें जाईल.

अकोलें ता. २०।५।९१

Vyankatesh R. Mudholkar.
सेक्रेटरी म्युनिसिपाल कमिटी
अकोलें.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य ९ शके १८१३

ज्याचे निमित्त येवढा कल्लोळ माजला व अनेक प्राण खर्ची पडले त्याचा- म्हणजे मणिपूरचे सेनापतीचा एकदाचा पाठलाग होऊन त्यास धरलें. या प्राण्यास पकडण्याचे बाबतींत यश दोन नेटिव शिपायांस आलें. त्यांचीं नांवें सुभेदार कालिंद्रसिंग. व अनुसिंग आधीच मुळीं मणिपूर शहर काबीज केल्यावर मुख्य मुख्य लोकांस पकडण्याची सक्त तजवीज ठेविली. सर्व नकींच दाबल्यावर बिचारा जाणार तरी कोणी कडे. एका घटकेंत आलेली वावटळ निघून गेल्या बरोबर त्याचे नर्जिक कुत्रें देखील फटकेना. तेच पूर्वीचे मणिपुरी लोक त्याकडे नाकें मुरडाव यास लागले आतां सर्वच फिरलें—आपणांस एक पाऊल देखील पुढें जाणें म्हणजेच मृत्यूच्या दाढेंत जाऊन पडणें आहे असें पक्कें वाटल्यावर आपण होऊनच दातीं तृण धरून इंग्रजांची पायधरणी करण्याचा बेत केला व त्या प्रमाणें सेनापती हा हळू हळू इंग्रजांचे छावणी कडे येऊं लागला. ओसाड, भयंकर व निर्जल अशा डोंगराळ जंगलातून वेळीं अवेळीं भटकत फिरण्याचा- त्यातून बिकट, काळोख्या व अडचणीचें स्थळीं लपून कालक्रमण करण्याचा—व प्रसंगीं ओल्या कोरड्या पाल्याच्या फाकांवर निर्वाह करून आपणास कोणी पाहून धरून नेईल कीं काय या धास्तीनें डोळ्यांत तेल घालून चोहोंकडे टेहाळणी करण्याचा कंटाळा येऊन एकादाचा मोक्ष मोक्ष काय व्हावयाचा तो एकदम व्हावा अशी आशा दिवसेंदिवस बलवत्तर होत चालली. आश्रित सहायाचा जमाव हीं झटकन नाहींसा झाला इत्यादी सर्व गोष्टींचा विचार करिता सेनापतीचें करणें साहजीक व योग्य असें दिसतें. आतां पकडण्याचे वेळीं थोडी झटापट झाली हें साहजीकच आहे. सेनापती कोणीकडे- व एक पोलिस जमादार कोणीकडे! आपणाहून कमी दर्जाचे इसमास दारण नाच्या पेक्षां त्यास दोन हात दाखविणें हें बरें असें वाटल्या वरून त्यांनीं अंगीं स्वेष अणिला असेल व त्या स्वेषांत सामनाही झाला असेल. परंतु कच्चा शिपायां पुढें टिकाव निघेना. सेनापती हे जेरीस आले व अणुसिंगचे स्वाधीन झाले. अणुसिंग कृतार्थ होऊन सेनापती समवेत माणिपुर कोटा कडे निघून आले—आतां सेनापती इंग्रजांचे ताब्यांत असून त्याचे वर सक्त देखरेख आहे.

औदार्य, नेकी, सहिष्णुता व दया यांचे आवरणाखालीं कारवाईनें जुलूम चालवावा ही पद्धत हिंदुस्थानचे राज्यशकट हाकतांना फार उपयोगी पडते, व हा मोठा विस्तृत शकट वाहण्यास हीच पद्धत व हाच मार्ग सुरेख व योग्य आहे असें ज्यांचें मत असेल त्यांस यथास्थित सणसणून व खरमरीत उत्तर एका इंग्लिश पत्रकारानें दिलें आहे. असल्या पद्धतींत छिद्र दाखऊन कान उघाडणी करण्याचा जर एखाद्या मानवानें अघोर पापाचा घडा शिरावर घेतला तर त्याची फट फजिती होऊन भीक नको पण कुत्रा आटोप अशा स्थिती होते. आतां या धुमसत असलेल्या मणिपूर प्रकरणीं किती टलेनंग प्रमादाची माळिका लागली आहे व अनुचित पद्धतीस अयोग्य व भलतीच दिशा मिळाल्या मुळें किती घोर व दुर्घट परिणाम झाले आहेत त्याचा प्रत्यक्ष मासला रुबरूं समोर आहेच. असल्या प्रसंगी जर खरें स्वरूप दाखवून दुष्परिणाम टाळण्याचा प्रयत्न न करावा तर करावा तरी केव्हां? आतां ह्या मणिपूर प्रकरणीं सर्वस्वी जबाबदारीचा बोजा खुद्द लॉर्ड लन्सडाऊन यांचे माथीं आहे. मणिपूर प्रांतीं घडून आलेला प्रकार जर नेक साहेबांच्या हुकुमान्वयें झाला असेल तर मग किन्टन साहेब व व्हाइसराय साहेब या मध्ये या बाबतींत कागदोपत्रीं झालेला व्यवहार अमीनात गुप्त ठेवणें नेक साहेबांस फार हितावह आहे.

मणिपूरचें बंड विझलें. कलकत्त्याची चळवळ मंडळी इतक्यांत ओरिसा प्रांतांत कुंनझार संस्थानांत गडबड उडाली याचें कारण काय हें अह्मास कळलें नाहीं. पण या संबंधानें तूर्त एवढीच माहिती आहे कीं, १८६८ सालीं ज्या भूया व जवांग व इतर लोकांनीं बंड केलें होतें त्यांनींच सांप्रत गादीवर असलेल्या महाराजाविरुद्ध उठून धामधूम सुरू केली. खजिना लुटला. व तुरुंगातून बऱ्याच बंदीवानांस सोडून दिलें. व रस्त्यांत जपून ते अडविले. पहावें याचा परिणाम काय होतो तो.

## अबदुल रसूल.

अबदुल रसूल याचे संबंधानें आह्मी आमचे वाचकांस बरीच माहिती दिली आहे. मि. कानबिअर यांनीं यासंबंधानें स्टेट आफ सेक्रेटरीची बगदी पाठ पुरविली पण त्यांनां या कामांत फारसें यश आलें नाहीं. तारीख १६ फेब्रुआरी पासून या संबंधानें ते प्रश्न विचारात आहेत; व त्यांना हिंदुस्थानांतून अजून माहिती आली नाहीं अशा प्रकारची उडवाउडवीची उत्तरें मिळत गेलीं. सरते शेवटीं त्यांनीं एप्रिलचे १६ वे तारखेस हाऊस कामन्सामध्यें या प्रश्नाचा विचार व्हावा ह्मणून सूचना केली परंतु तिला सभेचें अनुमोदन मिळालें नाहीं. ही सूचना करतांना त्यांनीं अबदुल रसूल याचे संबंधानें सर्व हकीकत सांगितली. अबदुल रसूल हा मूळचा काश्मीर येथील रहिवासी. त्याला काश्मीर सोडून सुमार ३५ वर्षें झालीं. इतक्या वेळांत तो युरोपांत निरनिराळ्या राष्ट्रांत फिरला. तो कान्स्टॅंटिनोपल येथें ३० वर्षें होता. व तेथें कालेजमध्यें तो भाषा शिकवित होता. तेथें त्याला सुमार तीन चार शे रुपये दरमहा मिळत होता. कान्स्टॅंटिनोपल सोडल्यावर अबदुल रसूल हा पुष्कळच ठिकाणीं फिरला. कांहीं दिवस तो इंग्लंडांत एक अरबी भाषेंत वर्तमानपत्र काढित असे. यापुढें तो १८९० त जानेवारी महिन्यांत मुंबईस आला व तेथें त्यास पोलिस कमिशनरनें कैद केलें. यापुढील हकिकत आह्मी दिलीच आहे. मि. कानिबेअर यांचे मतानें (व ही माहिती खुद्द अबदुल रसूलचे पासून आहे) ह्यास त्याचे मर्जी विरुद्ध हिंदुस्थानांतुन घालविलें. सर जान गार्स्ट यांचे मतानें त्यानें इंग्लंडांत जाण्याची आपली खुषी आहे असें दाखविलें ह्मणून त्यांस इंग्लंडांत पाठविलें असें आहे; व त्याचे खरें पणासाठीं चीफ कमिशनर मि. मॅकेन्झी यांस पाठविलेला अर्ज दिला आहे. मि. कानिबेअर यांनीं खान शाहेजी नांवाचे मनुष्याचे देखत अबदुलरसूल यानें लंडनास आपली जाण्याची खुषी नाहीं असें सांगितलें ह्मणून बोलतांना म्हणून दाखविलें. आतां ह्यामधून खरें खोटें शोधून काढणें फार कठीण आहे तरी सरकार तर्फे जें कांहीं चमत्कारिक वर्तन घडलें तें दिल्या वांचून राहवत नाहीं. घडलेल्या गोष्टीमध्यें व त्या संबंधानें लिहिल्या गोष्टीमध्यें महदंतर असतें ही गोष्ट गेल्याचे मागिल इंडियाचे अंकांत सप्रमाण सिद्ध करून दाखविली आहे.

वस्तु स्थिती एक प्रकारची असते व त्या संबंधानें लिहितांना त्याला भलतेंच रूप दिलेलें असतें. ही गोष्ट जर ज्या गोष्टी लिहिल्या असतात त्यांचे संबंधाची तर मग ज्या गोष्टी बाहेर दाखविण्यांत येत नाहींत व ज्याचे संबंधानें फक्त सरकारी अधिकाऱ्यांचीं मतेंच मात्र बाहेर येतात त्याचे संबंधानें काय गोंधळ असेल तो असो. पहिली गोष्ट अशी कीं यासंबंधाची माहिती हिंदुस्थानांतून येण्यास इतका उशीर कां लागला या संबंधानें खुलासेवार कांहींच सांगितलें नाहीं. फक्त हिंदुस्थान सरकारचे शहाणपणाविषयीं अभिवचनें मात्र दिलीं आहेत. दुसरी गोष्ट जर अबदुलरसूल यांस सरकारनें धरिलें होतें तर त्यास हिंदुस्थान सरकारनें व त्यांचे वतीनें स्टेट आफ सेक्रेटरीनें काश्मिरापर्यंत जाण्याचे पैसे व आणखी कांहीं पैसे देण्याचें कां मनांत आणलें! जर त्यास त्यांचे मर्जी प्रमाणें इंग्लंडांत आणून सोडलें होतें तर अशा प्रकारची त्याची सोय करण्याची स्टेट आफ सेक्रेटरीला कोणत्याही प्रकारची जरूर नव्हती. अबदुल रसूल यास कशा करितां धरलें याचा अजून उल्लेख झाला नाहीं. त्याला धरिलें तें सुद्धां इंग्लंडांतून माहिती धाडिली त्यावरून असें मि. कानिबेअर यांचे बोलण्यांत आलें, व यासंबंधानें खुलासेवार माहिती आपणास मिळत नाहीं. व प्रश्नांस नीट उत्तरें मिळत नाहींत असें त्यांनीं सांगितलें. यावरून हें दिसून येईल कीं, सरकारची वागणूक दुटप्पीपणाची आहे. असो. ही शेख अबदुलरसूल याचे संबंधाची हकिकत झाली. अबदुल रसूल यास न्याय मिळावा हा मि. कानिबेअर यांचा सूचना आणण्यांत हेतु होताच परंतु त्या बरोबरच त्यांनां आणखी ही कांहीं गोष्टी सभेपुढें आणावयाच्या होत्या.

आमच्या सरकारला पाहिजे त्या मनुष्याला चौकशी न करतां किंवा कोणच्या ही प्रकारचा दोष न ठेवितां अटकेंत ठेवितां येतें. हा कायदा १८१८ त झालेला आहे; व त्या वेळीं लढाया वगैरे चालूं होत्या ह्मणून तो कायदा केला होता परंतु आतां सर्व गोष्टी बदलल्या आहेत व अशा वेळीं असा कायदा असणें फार अन्यायाचें आहे. मि. कानिबेअर साहेब ह्मणाले कीं, जर आज सभेपुढें अबदुलरसूल संबंधाचे प्रश्न आले नसते तर अशा प्रकारचा कायदा हिंदुस्थानांत आहे हें कोणालाही खरें वाटलें नसतें. अशा प्रकारचा कायदा असणें हें फार अन्यायाचें आहे. या रीतीनें आमचे सरकार व अतिशय जुलमी राज्याचे कायदे यामध्यें फारसे अंतर रहात नाहीं. या कायद्याचे योगानें जीवितसंरक्षण मुळींच होत नाहीं. हा कायदा होता ह्मणून तरी आमचे किती वाचकांस ठाऊक असेल? मि. कानिबेअर यांनीं आज पर्यंत कोणकोण लोक या कायद्यान्वयें धरिले गेले व त्यांची व्यवस्था काय झाली, निदान आजपर्यंत किती लोक धरिले गेले इतकें तरी कळावें ह्मणून बरेंच वेळ प्रश्न केले परंतु असल्या प्रकारची हकीकत देणें सरकारला हितावह होणार नाहीं. ह्मणून कांहीं बाहेर आलें नाहीं. या पासून कोणाचा तोटा झाला असेल किंवा होईल हें आह्मांस समजत नाहीं. एवढें मात्र खरें कीं सरकारची सर्व अशा प्रकारचीं कृत्यें बाहेर पडतील. असो. यावरून सरकारचें वर्तन कसें काय तें स्पष्ट दिसतें. लिहिण्यांत कांहीं ही असो व नुसती अभिवचनें कशाही प्रकारचीं असोत सरकारची वागणूक तशी नाहीं हें निर्विवाद आहे. हा कायदा १८५७ सालचे जाहीरनाम्याचे तत्वाविरुद्ध नाहीं काय? यावरून सरकारचा आमचे लोकावर भरंवसा नाहीं हें स्पष्ट दिसून येत नाहीं कां? हेंच कां आमच्या राजनिष्ठेचें बक्षीस? मनुष्य एकदां परतंत्र झाला ह्मणजे त्याचे कांहीं चालत नाहीं व तो सर्वांशीं पराधीन होतो. इंग्लिशांचें हें वागणें मनुष्य स्वभावाला कोणते ही प्रकारें विरुद्ध नाहीं.

मनुष्याची नेहमीं आपला फायदा पाहण्याकडे बुद्धि असते व जो वस्तु आपल्या हातांत सांपडेल तिला सोडावें अशी इच्छा होणें हें मनुष्य स्वभावाविरुद्ध आहे. त्याप्रमाणेंच इंग्लिश लोकांची वागणूक आहे इतकेंच कीं ही वागणूक आपण नेहमी ऐकतों किंवा पुष्कळ वेळां वाचतो त्याचे विरुद्ध आहे. अशा प्रकारचे कायदे रास्त आहेत असें अजून कोणी प्रसिद्ध केलें नव्हतें. हें मोठें महत्वाचें काम सर जान गार्स्ट यांनीं आपल्यावर घेतलें. ते ह्मणाले कीं

**हिंदुस्थान हा स्वतंत्र देश नव्हे. हिंदुस्थान देशावर परकीय आज त्यांना वाटेल त्याप्रमाणें राज्य चालवीत आहेत व या राज्य पद्धतीलाच अनुसरून हे व असल्याच प्रकारचे कायदे होत.**

हें वाचल्या पासून आह्मी ह्मणतो या विषयीं आमचे वाचकांची खात्री होईल. आज पर्यंत याच तत्वा प्रमाणें सर्व काम चाललें होतें इतकेंच. इतके दिवस हें तत्व—मग तें कोण-

त्याही कारणानें असो—बाहेर आलें नव्हें. आतां हें तत्व हाऊस आफ कमन्स पुढें आलें आहे व आतां या तत्वा प्रमाणें वागण्यास सरकाराला नवीन सनद मिळाल्या सारखी झाली आहे आमच्या लोकांना जर इच्छा असली तर त्यांनीं राष्ट्रीय सभेच्या द्वारें ह्या तत्वांचा होईल तितका बोभाट करण्याचा यत्न करावा. सध्यां एवढाच उपाय आहे. या बरोबरच आमचे पुढें गेलेल्या सुधारकांस अशी विनंती आहे कीं त्यांनीं सामाजिक प्रश्न काढून लोकांची मनें विटवून न टाकतां या व अशाच्या प्रकारच्या गोष्टी लोकांस समजून देऊन व त्या संबंधानें लोकांचें मत विश्वास वसवून अशाच्या प्रकारीं कामें हातीं घ्यावा. फाटफूट म्हणें चांगलें नाहीं व जर लोकांचा एकदां विश्वास उडाला तर लोक कुठें याच गोष्टींत त्यांवर विश्वास ठरणार नाहींत. पुष्कळ वेळां सर्व लोकांचे मतावर व विश्वासावर चालणाऱ्या लोकांचा विश्वास ठेवावा लागतो व 'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं' या मताचें अवलंबन करावें लागतें. प्रत्येक गोष्टींत कांहीं ना कांहीं तरी व्यंग असतेंच व पुष्कळ गोष्टींत आपल्याला जें चांगलें वाटत तें करण्यापेक्षां सर्व लोकांना जें चांगलें वाटतें तें करावें लागतें. पार्लमेंटच्या कोणत्या प्रकारचाही नियम घालतां येत नाहीं; तरी आमचे सांगण्याचा हेतु हा कीं समाजाचे पुढाऱ्यांनीं आपण एकीकडे व लोक एकीकडे ह्या तत्वांवर वागण्याचें घेतलें आहे तें सोडून द्यावें. ह्याकडे आमचे सुधारक लक्ष देतील काय?

# The Berar Samachar

**MONDAY, JUNE 1, 1891**

## THE RECENT DISTURBANCES AND THEIR MORAL.

It will be acknowledged on all hands that the religious susceptibilities of the people have been sharpened since the discussions on the famous Consent Bill. This showed itself in the recent occurrances at Benares and Calcutta. The cause is the interference on the part of the Government officers in the religious affairs. The Government has carried the matters with the usual high-handed policy. The chief of the so-called Benares Rioteers are sent abroad. Though the temple is allowed to stand in *situ* still the public are excluded. A similar fate awaits for the culprits who took part in the recent disturbances at Calcutta. Though it is the duty of the Supreme Government to look to the public peace and to set an example still it will not be much if we were to say that circumstances should be taken into consideration. The facts are clear. Judging from what we learn the conduct on the part of the Government savours much of harshness. It is natural that the people should be maddened into fury when they hear that a temple is to be rased. The people protested but to no purpose. What is to be expected from people under these circumstances? It is but natural that they should make up their mind to take the law into their own hands and should be ready to sacrifice even their lives. Self-preservation is the first law of nature and it is only in matters of grave importance that men become ready even to lose their lives. The Government has virtually carried its own points. The temple will only nominally stand. The public will have no access. The intention of the Government is clear. It wishes to force the people into blind obedience. The people should try their best to resist such an attempt. It is only perseverance and zeal which overcome difficulties. The National Congress has furnished a constitutional organ to bring every thing to light. 'Heaven helps those who help themselves' should be the motto. It is the help from within which would enable one to succeed after patient effort. We must learn to depend upon ourselves and should not look abroad for it. However the professions may be the ruling power will not look with a favourable eye on the growth of free spirit. History furnishes innumerable examples, which illustrate this principle. The great charters of liberties are won by a patent struggle. Sir John Gorst declared the other day that India was not a free country, that it was governed by arbitrary principles and that it could only be governed by such arbitrary laws. It is clear from this that if the people require any rights, any franchises, any thing which is inconsistent with despotism they will have to work for themselves. It would be no thing if they were to count upon promises. Every man therefore should think well before they take an objection to institutions like the Congress.

---

The National Guardian has an able article on the opium question which Sir John Pease has, with a characteristic boldness and moral courage, opened in the House of Commons for the suppression of the consumption of opium. The above paper has a number of suggestions to make up the deficit of some five or six crores in the Government Treasury. It is well and good if sober consideration will prevail in realizing the income from the opium trade provided the Government of India is called upon to give a total blow to its opium revenue. The article runs as follow:—

### THE OPIUM QUESTION.

The motion of Sir Joseph Pease carried to triumph has two sides, the moral and the political. As regards the first, it cannot be denied that the conduct of a civilized Government is indefensible, for its monopoly in an immoral trade. It then stands self-condemned. Since these questions attracted the notice of the British public, it behoves the Government here to be on the alert. The vote of censure, passed a year or so ago, on the *abkari* system of our Government, and the recent motion condemning the opium trade, cannot pass without producing some salutary effect.

As regards the curtailment of Indian expences, high authorities can be cited, on the side of there being ample room for this. The hill expenses can be totally disallowed, with blessings to the whole whole body of tax-payers. The increasing military expenses can be very easily and advantageously overhauled. A tentative system of Native volunteering may be introduced by way of economy. It is notorious that the fat pay of many a public servant far exceeds the gross incomes of several independent rulers. The income-tax may be safely increased without great hardship to the poor peasantry of this country. Duty upon foreign wines and liquors can be increased with impunity and fresh duties levied on the piece goods imported in this country, especially on the articles of luxury. Instead of a Government Monopoly the opium trade can be carried on by private enterprise and taxes of different shapes can be laid on and realized from it. It will not be too much to ask the British philanthropic public to meet the expenses of the Indian Office, or the cost of the navy, in England, for the safety of the Indian shores, in cases of probable emergencies. These expenses the British public are rich enough to pay out of their over-stocked exchequer, instead of asking poor India to pay.

These are some of our suggestions how can an apparent loss of 5 to 6 crores of rupees be very easily compensated without the *slightest* hardship to the poverty-stricken peasentry of India. But these things unfortunately do not commend themselves to our rulers or to the Anglo Indian community generally. We have not the least doubt that these may meet all financial deficiencies arising out of the abolition of the opium trade. Supposing that these do not, that they will, cover the best portion thereof, can never be denied, and the trifling loss if loss there be any, may be borne by our Government without making the poor people pay.

To turn to its political aspect. However strongly it may be condemned from a moral point of view, it cannot for that reason alone be defended from its political ground. It ought never to be allowed to govern a distant Dependency from Westminster. Since the American War of Independence the policy pursued has been to leave the Colonies and Dependencies to manage their own domestic concerns. It will therefore be a very unwise and impolitic departure from an established principle, if the Government were now to interfere with the internal management of India. The peremptory mandate of the British Committee to rain a bitter pill of reform down the throat of an unwilling people and the next mandate to call upon the Indian Government to sacrifice its opium trade, are not healthy signs after all. If better counsels prevail, the English Parliament should never think of meddling with the domestic management of the Indian Government. For it makes the Government here powerless, a mere sham and it may easily lose its *prestige* before a conquered people. It is therefore advisable that the Parliament should control but must not unnecessarily and often interfere with the Indian affairs.

---

Surgeon Major Charles Little, M. D. Sanitary Commissioner, has suggested us to give publicity to the following circular of the Resident. The best we can do is to print it in full. We would however call the attention of the Government to the complaint that Government is shirking its duty in providing properly for the funds of the schools, hospitals, and dispensaries when it is inviting contributions for the very funds by preparing a new guide in regard to the erection of mural tablets:—

### BOOK CIRCULAR NO. IX OF 1891.

*Dated Hyderabad Residency, the 25th April* 1891.

The Resident is pleased to issue the following orders for guidance on the subject of the erection of mural tablets to commemorate the names of all donors and subscribers to hospitals, dispensaries, and schools:—

1. In all cases in which a contribution of Rs. 500 or upwards is made to a hospital, dispensary, school, or to improve the sanitation, water-supply, or site, &c., of a neighbourhood, a tablet of marble or brass will be permanently affixed in a conspicuous position describing the liberality and perpetuating the name of the donor.

2. When endowments for beds in hospitals are made to the extent of covering the expenses of one or more patients permanently, a tablet showing the name of the donor will be placed on the wall over the bed of the patient. The cost of keeping one patient in clothing, bedding, diet, &c., will be about Rs. 100 per annum, representing an investment of Rs. 2,500 at 4 per cent.

3. In all cases where a contribution over Rs. 50 and under Rs. 500 is made, the names of the contributors will be brought to the notice of the local Administration in the departmental annual reports.

4. A notification in Englieh and in the Vernacular setting forth the provisions of these orders will be framed and suspended in every tahsil hospital, dispensary, and school in Berar.

(By order)
J. A. CRAWFORD,
Secretary for Berar.

---

## वऱ्हाड

रा. रा. शेषाचलम तहशीलदार यांस रजा संपून परत दाखल झाल्या वरून दर्यापुरास रवाना केलें. आणि मि. शापुरजी वीरजी यांस या तालुक्यांत तहशीलदार नेमणार असल्या विषयीं कळतें. सदर्हू शापुरजी शेट यांच्या चांगुलपणाचा अनुभव लोकांस त्यांच्या नाझरचे दर्जी पासूनच आलेला आहे.

खामगांवचे तरुण असिस्टंट कमिशनर कप्तान डेव्हीस साहेब यांस कोंकणा मुक्कामीं देवाज्ञा झाल्याचें दुःख करिक वर्तमान कळल्या पासून त्यांच्या सद्गुणाची आठवण करून लोक हळहळताहेत.

इलिचपूरचे एक्स्ट्रा असि॰ कमिशनर रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर यांस उमरावतीस बदललें असून रा. रा. पण्डित सुरज नारायण असि॰ कमि॰ यांस वाशिमाहून इलिचपूर कोर्टावर नेमिलें आहे.

या तालुक्यांतील खेरड्याच्या पाटलीणीस एका पायलूनें कोणाच्यातरी ज्येष्ठ मुलाला किंवा सुनेला बळी दिल्यास भूमिगत धन विपूल सांपडेल असें समजावल्यावरून बाईनें स्वतांच्या सुनेची शिकार योजिली परंतु ती मुलगी चाणाक्ष म्हणून माहेरीं पळाली. तरी धनतृष्णा बळवत्तर पडल्यामुळें तिनें घरच्या शेजीच्या उमरीतल्या चाकरास आपल्या भावाच्या व गड्यामाणसाच्या साह्यानें बळी दिला. सर्व प्रकार ब्राह्मणांतील कऱ्हाड्यांच्या प्राचीन गोष्टी प्रमाणें घडून आला. परंतु पुढें पैशाची निराशा झाली तेव्हां पट्टकर्णी मंत्र फुटून पोलिस मार्फत खटला चालला आहे. धनासाठीं व स्त्रीसंभोगासाठीं दुर्नियंत नानाविध लबाडे उपस्थित होत असतात हें पहून अनुदारांनीं जितेन्द्रिय होण्यास शिकत असावें.

पुनोतीच्या एका सावकाराच्या रजपुतानें तगादा करितांना कर्जदाराशीं हातवाऱ्यांवर येऊन मारहाण केली आणि तो कुणबी त्या इजेनें मरण पावला. कडवा स्वभाव व अविचार यांचा मिलाफ सदोदित घातुक होत असतो.

या आठवड्यांत आणखी दुसरा एक मनुष्य येथील नदींत बुडून मेला. अशा अपघातास मनुष्य मात्राचा कांहीं इलाज चालत नाहीं.

वाशिमच्या इंग्रजी आफिसांतील मि. ब्राऊन यांच्या जागीं येथील आफिसांतून रा. रा. वासुदेव पांडुरंग जोशी यांस पाठविलें आहे.

---

## वर्तमानसार.

इंग्रज सरकाराकडून हिंदुस्थानांत शिक्षण देण्याचे कामीं कायतो सर्व खर्च दोन कोट रु० होतो तेंच हिंदुस्थानचा राज्यकारभार विलायेंतून हांकण्या करितां १९ कोट रुपये व लष्कर खात्याकडेस २९ कोट रु० खर्च होतो हें पहिलें ह्मणजे इंग्रज लोक आह्मी हिंदुस्थानच्या लोकांस शिक्षण देण्यांत खर्च करितो अशी विनाकारण बढाई मारतात त्याची सत्यता कितपत कोण कशी मानील बरें ! ! कर रूपानें वसूल केलेला पैसा त्याची व्यवस्था तशीच काय?

सर वुईलियम मूर यांचें असें ह्मणणें आहे कीं, नेहमीं मनुष्यांस दुखणें येतें तें शैत्याचा जोर झाल्या वांचून येत नाहीं सबब यापासून नेहमीं जांब रहावें ह्मणजे शैत्य न होऊं देण्याबद्दल प्रत्येक मानवी प्राण्यानें काळजी बाळगावी

सोनकेळें हें फार पौष्टिक असतेंत. त्यामध्यें मांसाच्या किंवा बटाट्याच्या तिप्पट पौष्टिक द्रव्य असतें न्या. सिं.

—जगांत एकंदर ९०० निरनिराळ्या भाषा बोलतात असें ह्मणतात.

—हिंदुस्थाना साठी नांठे कर्ज काढण्याचा विचार चालला आहे.

—मणीपूर संबंधी सर्व कागदपत्र पार्लमेंट सभेपुढें ठेविले आहेत.

युरोपामध्यें पुनः गडबड होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत असें कांहीं वर्तमानपत्र कर्त्यांचें ह्मणणें आहे. सु० प०

लंडन, फ्रान्स वगैरेकडे हल्लीं हवा फार वाईट झाली आहे असें ह्मणतात.

विलायेतेस हिंदुस्थानांतील बाजाराचें एक प्रदर्शन होणार आहे. यावेळीं तेथील बायका इकडच्या बायका प्रमाणें पोषाख करतील व त्यांचे हुजरे इकडच्या पुरुषाप्रमाणें पोषाक करतील.

१८९०-९१ सालाचा इंग्लंडचा एकंदर लष्करी खर्च ३४,८९,३६,४२० रुपये आहे असें ह्मणतात. ठा० अ०

## LATRINE CESS RULES.

The following revised draft of Latrine Cess Rules (under section 42 and 138 of Berar Municipal Law, 1886) has been published by order of the Municipal Committee, Akola. Objections to these proposed Rules, if any, will be received at the Municipal office upto 1st July 1891.

1. The area within Municipal limits shall, for the purpose of these rules, be divided into such circles as the Committee may, from time to time, consider desirable.

2. Each circle shall be placed in charge of the Municipal peon whose duty it will be to see that private latrines are duly cleaned.

3. A latrine is a place used as a necessary. It may contain one or more seats.

Latrines are public and private.

Public latrines are those owned and kept by the Municipal Committee.

All other latrines are private.

4. The cleaning and regulation of all latrines shall be carried out under the orders of the Municipal Committee for which purpose the Committee shall keep a sufficient staff of sweepers and peons.

The house-owners, however, may engage their own sweepers provided that no Municipal sweeper shall be privately engaged by them.

5. Each private latrine shall be cleaned once every morning.

6. Every house-holder of a family consisting of more than 15 persons shall have to get his latrine cleaned every morning and evening on payment of one and half times the ordinary rates prescribed in rule 9.

Other persons may also get their latrines similarly cleaned at these rates.

7. The Committee may make special arrangements with cotton factories and residents in the Civil Station for cleaning their latrines or for the use of night soilcarts.

8. Persons residing in the Civil Station may build temporary or permanent latrines for the use of their servants in their compounds and the Municipal sweeper shall clean them once a day on the occupant of each Bungalow paying one rupee per mensum to the Municipality.

9. Every owner of an existing private latrine in use and every person wishing to use a new private latrine shall provide himself with a latrine license.

(Exp. I) An owner in this rule means and includes every occupant of or the head of every family living in a house wherein the latrine is situate.

(Exp. II) Where there are more occupants or heads of families than one using the same latrine, each occupant or head shall have to provide himself with a separate latrine-license, & every such occupant or head shall be held responsible for breaches of latrine bye-laws.

(Exp. III) Medical servants living with a family shall be considered as members of the family.

10. The license fee for each owner using private latrine, cleaned by Municipal sweepers shall be as follows—

| | Rs. | As. | |
|---|---|---|---|
| Owners whose annual income does not exceed Rs. 99...... | 1 | 8 | Yearly |
| | 0 | 13 | Half yearly |
| | 0 | 7 | Quarterly |
| Owners whose annual income exceed Rs 99 but does not exceed 500 | 3 | 0 | yearly |
| | 1 | 12 | half yearly |
| | 1 | 0 | quarterly |
| Owners whose income exceeds 500 but does not exceed 1200 | 6 | 0 | yearly |
| | 3 | 8 | half yearly |
| | 2 | 0 | quarterly |
| Owners whose income exceed 1200...... | 9 | 0 | yearly |
| | 5 | 0 | half yearly |
| | 2 | 12 | quarterly |

Periods

Yearly—1st April to 31st March.

Half yearly—1st April to 30th Septr.
1st October to 31st March

Quarterly—1st April to 30th June
1st July to 30th September
1st October to 31st December
1st January to 31st March.

11. Persons employing private sweepers under the provision of rule 4 shall pay in advance a fee of one rupee and a half per annum for using the night soil carts of the Committee.

12. The private latrine-cess shall be paid in advance yearly, half yearly, or quarterly at the option of the license holders.

13. No license shall be valid save for the period for which payment has been made in advance.

14. When any holder of license leaves the town for good before the expiry of the period for which the license is granted, he may claim a refund of the cess for the unexpired portion of such period. No refund will be granted for an unavailed of portion, if it is less than three months, nor for the quarter in which the license holder leaves the town. Every application for a refund of an unavailed of portion for any period should be made before the commencement of that period.

15. Every holder of an old license wishing to get a new one at the expiry of the license period shall hand over his old license to the License-issuing clerk before obtaining a new one. Annas two for inspection or a copy of old license will be charged in case the old license is not produced.

16. The licenses shall be issued under the signature of the Vice-Chairman on application at the Municipal office between the hours of 11 A. M. and 5 P. M. on all days except Sundays and public holidays.

17. Each applicant for a new latrine license shall write an application in the form (A) annexed paying at the same time the license-fee. If he be unable to fill up the form it shall be filled up for him without charge at the office of issue and he will be required to sign it or to affix his mark.

18. The issuing office shall then grant a license in the form B annexed.

19. If the holder of the latrine license loses the same during the period of its currency he shall be entitled to receive a duplicate license on payment of a fee of annas two, and such duplicate license shall have the same effect as the original one.

20. The following persons shall have the right to inspect private latrines between sunrise and sunset and to demand the production of latrine license.

1 Vice Chairmen
2 Secretaries
3 Conservancy Superintendent
4 Any member of the Municipality
5 Conservancy Inspector and
6 Conservancy Jamadar and peons.

21. Every owner of an existing private latrine shall be bound to keep it in proper repair, and no latrine adjoining a high road shall be continued or any new latrine opened unless the place, position and design have been approved of by the officers whom the Committee from time to time may appoint for the purpose. The Conservancy superintendant will ordinarily approve of the place, position, and design.

22. The Committee may by written order require any owner of a private latrine to furnish the same with galvanised iron pan or such other receptacles as may be approved of by the Committee for the retention of excreta. The persons required by the Committee as above shall furnish the latrines with such pans or receptacles within the time allowed by the Committee.

23. No person shall use any place within the Municipality other than a public or private latrine for answering the call of nature.

24. Public latrines are intended to be used by the temporary visitors to the Town and by persons whose income is less than Rs. 99 per year. No other person shall use these latrines.

25. Persons infringing any of these rules shall be held to have committed an offence punishable under section 138 of the Berar M. law of 1886.

20th May 1891 } V. R. Mudholkar
Secretary, Municipal
Committee Akola.

## नोटीस

रा. रा. सुखदेवदास पुरनमल मारवाडी अकोला अकलकोट यांस नोटीस देणार लादू रघुनाथ व छोटु रघुनाथ मारवाडी ब्राह्मण राहणार अकोलें अकलकोट नोटीशीनें असें कळवितों कीं तुह्मापाशीं आह्मीं कर्ज काढिलें रुपये एकंदर ४७१ त्याचा तपशील. एकवेळा वहीखात्यांवर स्टांप लावून २०० शें रुपये व दुसरे खेपेस पुरजा देऊन रुपये १०० व तिसरे खेपेस मागील देण्याचा हिशोब वगैरे करून १७१ रुपयांच्या सालबंद्या दोन करून दिल्या असें मिळून ४७१ तुमचें देणें हें तुह्मांस आह्मी एकदां ३०० व दोन वेळां मिळून १७१ अशी सर्व तुमची देण्याची फेड केली तुह्मी आमचे पुरजे देत नाहीं व खातें बाकीबद्दल पावती देत नाहीं ह्मणून तुह्मांस नोटीशीनें असें कळवितों कीं तुमचे आह्मीं कांहीं देणें नाहीं. पुढेंमागें फिर्याद कराल तर त्याजबद्दलचें नुकसान वगैरेचे सर्व जबाबदार तुह्मी आहा. तुमचें सर्व देणें दिल्याबद्दल साक्षीदार मजकूर आहेत. आल्यास करावें. ता. २८।५।९१ इसवी.

( सही. )

लादु रघुनाथ मारवाडी दस्तुर नारायण रघुनाथ मारवाडी.
छोटु रघुनाथ मारवाडी दस्तुर नारायण रघुनाथ मारवाडी.

## नोटीस

रा. रा. दावजी वल्द कृष्णाजी माळी राहणार सावंग तालुके दारव्हे जिल्हा यवतमाळ यांस नोटीस देणार गंगू मर्द दावजी माळीण. नोटिशीनें असें कळवितें कीं मी तुमचे लग्नाची बायको असोन मला आज सुमारें आठ वर्षें आई बापाचे घरीं रहून झालीं. मागें माझे बापानें दोन वेळा तुमचे घरीं आणून घातलें परंतु तुह्मी मजला पोटापाण्यास न देतां माझे अति हाल करितां व मारहाण करून माझे बापाचे घरीं मजला पोंहोचतें केलें. आजपावेतों तुह्मी माझे अन्नवस्त्राचा कांहींच विचार केला नाहीं. मी तुमचे नांवांवर आज आठ वर्षें कर्ज काढून निर्वाह केला आतां मजला कोणी कर्जही देत नाहीं व तुह्मी मजला नेऊन घरसंसार करीत नाहीं. माझा जन्म व्यर्थ जात आहे यांजकरितां तुह्मांस ह्या नोटिशीनें असें कळवितें कीं नोटीस पावल्या पासून १५ दिवसांचे आंत सदरहू आठ वर्षांचे रुपये ४०० दरसाल ५० प्रमाणें आणून द्यावे व मजला आपण घेऊन जावें मात्र मजला तुह्मी चांगल्या रीतीनें वागवावें व जातीचे चार गृहस्थ बायको घेऊन घरसंसार करितात त्याप्रमाणें तुह्मी कराल अशाविषयीं ४ चार जातीचे पंच व भले लोक यांची खात्री करून मजला घेऊन जावें असें न केलें तर मी दुसरा घरठाव करीन मग कोणतेही प्रकारचा मजवर तुमचा हक्क राहणार नाहीं. सदरहू अन्नवस्त्राचे रुपये ४०० व या नोटिशीचा खर्च यांजबद्दल तुमचेवर रीतीप्रमाणें फिर्याद करून अखेर निकाल होई पर्यंत सर्व भरून घेतलें जाईल.

नोटीस पावल्या पासून १५ दिवसांचे आंत नोटिशींत लिहिलेल्या गोष्टींचा निकाल करावा ह्मणून दिल्हा नोटीस ता. २१,५,९१ इसवी.

सही

सहीची निशाणी बांगडी गंगू मर्द दावजी राहणार मसणी ता. मंगरूळपीर जि. वाशीम इच्या हातची असे.

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाड समाचाराची किंमत
वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१२
सहामाही ,, ३ ,, ०८
साळअखेर ,, ७ ,, १।०८
किरकोळ अंकास.................. ०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .........०।

SUBSCRIPTION
Rs.
Per annum in advance 5 Postage 12 as
Per annum in arrears 7 ,,1Rs. 8 as
Six monthly..........3 ,, 8 as
Single copy..............................4as

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXV AKOLA MONDAY 8 JUNE 1891 NO 22

वर्ष २५ अकोला सोमवार तारीख ८ माहे जून सन १८९१ इ० अंक २२

## औद्योगिकपरिषद्

किंवा

कारागीर, कारखानदार, व्यापारी व देशांतील उद्योगधंदे वाढविण्याविषयीं हस्तेंपरहस्तें खटपट करणाऱ्या लोकांची सभा.

येत्या आगष्ट महिन्यांत पुणें मुक्कामी भरणार आहे.

सभेची तारीख, सभेपुढें यावयाचे विषय वगैरे बद्दल कच्ची माहिती मागाहून कळविण्यांत येईल

सभेसाठीं येऊं इच्छिणार लोकांनीं तारीख १५ जुलईचे आंत खालीं सही करणार यांजकडे आपलीं नांवें कळवावीं.

पुणें, रेम्युझिम कचेरी ता. १३ माहे मे १८९ | महादेव बल्लाळ नामजोशी, देशी कारागिरीस व धंद्यास उत्तेजन देणारे मंडळीचे सेक्रेटरी

## जाहिरात.

एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आम्हांस कळवावें. माफक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा.

जी. डी. कविटकर
मर्चंट आणि कमिशनर एजंट
शहर एलिचपूर

## सचित्रक्याटलाग



आर. डी. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव ह्याचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ठ शुद्ध २ शके १८१३

मणिपूरच्या भाविक स्थितीवर सर रिचर्ड टेम्पल साहेबांनीं आपले विचार प्रगट केले आहेत. त्यांकडे हिंदुस्थान सरकारचें लक्ष पोहचेलच. त्यांचा सारांश कीं प्रांत खालसा करणें म्हणजे अगदीं शवटची मसलत व शवटला उपाय यास दोन कारणें. पहिलें मुख्य हें होय कीं खालसा हा शब्दच ऐकल्या बरोबर ब्रिटिश लोकांचें रक्त खवळतें व मर्यें ठणठणतें व दुसरें हें कीं खालसा करून म्हणजे तिजारीस भर पडून पैशाची टंचाई दूर होईल असा सुमार दिसत नाहीं. त्या पैशाचे उत्पन्न संबंधानें तर खरोखर ह्या प्रश्नास महत्व येत आहेच तरी सर डेव्हिड बार्बर यांचे विचारा अंतीं त्यांच्या मता प्रमाणें या प्रश्नाची चर्चा करणें ठीक पडेल. तूर्त त्या संबंधानें कांहीं म्हणता येत नाहीं. तें कांहीं ही असो; आपले कबज्यांत तो प्रांत येवो अगर नामधारी सत्तात्मक होऊन तो स्वतंत्र राहो यांत कांहीं ही विशेष नाहीं. फक्त एका क्षणांत त्याजवर सैन्य सोडून त्यांची धुळधाण करण्याची आपले अंगी कुवत असली व त्या प्रातांत ब्रिटिश लोकांचे श्रेष्ठत्व व स्वामित्व बसून वचक बसला म्हणजे पुरे इतकें धोरण धरून झालेल्या गोष्टीचा निकाल लावण्यास सुखला केले म्हणजे ठीक पडेल. आता या इष्ट गोष्टी साधण्यास एक सोपी युक्ती आहे. ती कोणती तर ह्या प्रांतांत रेलवेचा फाटा न्यावा म्हणजे झालें. आणि सध्यां इंडिया आफिस मध्यें असाम चितगांग रेलवे संबंधी नें प्रकरण दफ्तरीं भिजत पडलें आहे त्या ऐवजी त्यांचा एकदां निकाल करून ती रेलवे सुरू केली असतां मणिपूर प्रांतांत रेलवे होणें अनायासाचें काम आहे. आतां एवढें खरें कीं या कामांत खर्च फार होऊन ओतलेल्या पैशाची फेड होणार नाहीं व याच कारणा करितां असाम चितगांग रेलवे कंपनी हें ज्यास्त काम हातीं घेणार नाहीं. तथापिण तूर्त सांप्रतच्या अडचणी पेक्षां फार दूरचे मोठ मोठाले होणारे फायदे यांवर नजर दिली म्हणजे रेलवे करायी हाच उत्तम मार्ग दिसतो. एकदा मणिपूर प्रांतात रेलवे गेली कीं उत्तर ब्रह्मदेशांत तिचा फांटा सहज नेतां येईल. व उत्तर ब्रह्मदेशांत रेलवे सुरू करण्याचा सर्वांचा मनापासून इरादा आहे पण कोणी हो अद्याप पर्यंत तसलें काम हातीं घेत नाहीं अतां अशा प्रकारें सर्वोपरी रेलवेचा संच यथास्थित बसल्यावर त्या पासून फायदा होणार नाहीं हें म्हणणें म्हणजे केवळ वेडेपणाचे होईल. उत्तर ब्रह्मदेश ज्या क्षणीं इंग्रजाचे ताब्यांत आला त्या क्षणींच रतांचें पाऊल इंग्रजाचे घरीं शिरलें. तेव्हां पासून ह्याचे चांगलेंच फळफळलें. व्यापार दृष्ट्या व राजनीति दृष्ट्यां ब्रह्मदेश कुबेर वसतिस्थान आहे. परंतु इतर अनेक महत्वांचे गोष्टींचा विचार केला असतां तो प्रदेश फारच फार महत्वाचा आहे. असो असली धामधूम झाली नसतीतर आणखी २०।३० वर्षें सुद्धां रेलवे वाळण्याचा थाट बसला नसता परंतु पुढें होणारा फायदा सांप्रतच्या शोचनीय व दुःखद गोष्टींचा चांगला विसर पाडणारा होऊन आनंदी आनंद करून टाकील.

ग्वाल्हेर संस्थानाचे संबंधानें गेल्याचे मागील इंडियाचे अंकांत एक पत्र आलें आहे त्यावरून कळतें कीं महाराज जयाजीराव शिंदे यांनीं साठवून ठेवलेला पैसा बहुतेक सरकारी खजिन्यांत गेला. मि. हेन्वी साहेबांनीं १८८९-९० सालाचे जे रिपोर्ट लिहिले त्यावरून त्यांनां कांहींच फारशी माहिती नाहीं. हें स्पष्ट होतें. हेन्वी साहेबांचे ह्मणण्या प्रमाणें सर्व संस्थानाची शिल्लक ४१३ कोट पर्यंत आहे. परंतु वस्तुस्थीती तशी नाहीं जमा खर्चाची तोंडमिळणी बरोबर होत नाहीं. व दिवसानुदिवस संस्थान कंगाल दशेस येऊन पोहोंचतें आहे. असें असून हो विनाकारण कांहीं कामगार ठेविले आहेत व राहिलेला शिल्लक पैसा कोणचे तरी लोकोपयोगी कामाकडे लावावा असा सरकारचा मानस आहे. असो या गोष्टी आमचे लोकांचे लक्षांत केव्हां येतील त्या येवोत.

इंग्लंडांत व विशेषें करून हाऊस आफ कामन्सें मध्यें हिंदुस्थानांतील स्थिती संबंधानें बरीच चर्चा होते; व असेंच चालले तर कांहीं फायदा होण्याचा संभव आहे. आज गर ब्राडला साहेब असते तर आम्हास जास्त फायदा झाला असता यांत कांहीं संशय नाहीं. हिंदुस्थानांतील कायदे काऊन्सिलाचे संबंधानें आज पर्यंत कांहीं ना कांहीं तरी झालें असतें व अबदुल रसूलचे संबंधाची सूचना फुकट गेली नसती. आहे त्यांत समाधान मानण्या सारखी गोष्ट होय की अजून ५।६ गृहस्थ अविश्रान्त काम करित आहेत. इंडिया वरून असें समजलें कीं आ. ए वेंड यांस निवड्याचे वेळीं हिंदुस्थानांतील कायदे काऊन्सलांत लोकनियुक्त सभासद असावे अशा विषयीं त्यांनीं पार्लमेन्टांत प्रश्न निघाला असतां मत द्यावें असें ठरलें. असाच ठराव थोड्याच दिवसा पूर्वीं झाला. असें होत जाइल तर बरेंच आहे. हिंदुस्थानांतील वस्तु स्थिति संबधानें प्रश्न विचारणाऱ्यांस चांगलें यश नाहीं याचें कारण सध्याची प्रधान मंडळी. अशी जर आमच्या तर्फेची मंडळी तसेंच टिकून राहतील तर आज नाहीं उद्यां त्यांस यश येईल यांत कांहीं संशय नाहीं. हिंदुस्थानांतून इंग्लंडांत गेल्यानें तेथील पुष्कळ लोकांनां इकडील माहिती होते. व त्यानें बराच फायदा होतो. यंदा अजून कोणी जाता दिसत नाहीं. याचें कारण काय असावें तें समजत नाहीं. पार्लमेन्टांत विचारलेल्या प्रश्नांचा कांहींनाकांहीं तरी उपयोग झाल्यावांचून राहत नाहीं. मुंबई सरकार 'मिठाचे कायद्या' मधील 'मीठे तयार करण्या' चे व्याख्ये संबंधानें विचार करताहेत असें समजतें. ही गोष्ट वरील उपयोगा पैकीं थोडा मासला होय.

मि. क्राफर्ड व त्यांचे मित्र मंडळ यांस त्यांस पेन्शन मिळालें हें ऐकून आनंद झाल्या वाचून राहवयाचा नाहीं या संबधानें सरकाराचे वर्तना संबंधानें काय ह्मणावें हें आह्मास समजत नाहीं सरकारानें पुष्कळ पैसे खर्च करून योग्य रीतीनें सरकारी रीतीनें चौकशी करविली. या चौकशींत क्राफर्ड साहेब निर्दोषी ठरले. व सर्व लोकांनीं त्यांचेवर हा लांचाचा आरोप हकनाक आणला असें सिद्ध झालें व असें असून हीं क्राफर्ड साहेबांची जागा गेली. व अतां त्यांत थोडे वां होईना पेन्शन मिळालें. त्या न्यायाचे संबधानें सारा धरसोडीचा प्रकार आहे.व लार्ड री साहेब नसते तर ह्या प्रकरणाचा निकाल काय झाला असता कोणजाणे. गोरा मनुष्य अपराधांत सापला ह्मणजे हिंदुस्थानांत सर्व लोकांबरोबर न्याय देवतेची सुद्धां पाचावर धारण बसते व कसें तरी करून - अर्थ बदलऊन ह्मणा - सबबी काढून ह्मणा - ती आपली सोडवणूक करून घेते. त्या पेन्शनाच खर्च त्याच्या वतीवळ्या सुद्धां हिंदुस्थानीवर असणार. आतां क्राफर्ड साहेबांस १५० पोंड (सुमारे २००० रु०) प्रतिवर्षी मिळणार.

ता. ७ मे रोजीं सर. एच. हॅवेलॉक अलॅन यांनीं गार्स्ट साहेबांस विचारिलें कीं शेजारच्या संस्थानाच्या राजास पदच्युत करण्या सारख्या मोठ्या, धाडसी व जबाबदारीच्या कामाचें प्रसंगीं पांचशेहून हीं कमी सैन्य कसें पाठविलें गेले—सैन्याची बरदास्त व सामुग्रीची योग्य तपासणी करण्यांत हयगय कशी झाली—शत्रूचे सैन्याचा बरोबर अंदाजा करून ते किती लगटीनें सामना करतील यांचा विचार कसा झाला नाहीं—ज्या ठिकाणाहून हें सैन्य पाठविलें त्या निरल्यांत आर त्या ठिकाणा नजीकच लष्करी अधिकारी त्यांवर देखरेख करण्यास कोणी होता आर नव्हता? असल्यास तो कोण? व सैन्याची योग्य व्यवस्था रहावी या साठीं हिंदुस्थान सरकारानें कांहीं खबरदारी ठेवली होती किंवा नाहीं—ठेविली असल्यास कोणत्या प्रकारची? यावर उत्तर:—या संबंधीं साद्यंत मजकूर अद्याप उपलब्ध नाहीं. लष्करी अंमलदार ब्रिगेडिअर जनरल कॅन्नेट होते व हिंदुस्थान सरकारानें सैन्याचे योग्य तजविजसंबंधानें विशेष खबरदारी घेतल्याचें दिसत नाहीं.

मि. रॅबोकीअर यांनीं मे ता. ४ रोजीं गार्स्ट साहेबांस असा प्रश्न वतला कीं रुपयाचा भाव बाजारांत एक शिलिंग, सव्वा पांच पेन्स असतांना- एक शिलिंग साडेसहा पेन्स हा भाव धरून या एप्रिल पासून सालीम पुढच्या पांच महिन्यापर्यंत सरकारी नोकरांच्या पगाराची आकारणी कशी केली? यावर उत्तर कीं पुढें येणाऱ्या सालानिमित्त सरकारी भाव एकदांच अगोदर ठरविला जातो. १८९१-९२ सालासाठीं तो भाव एक शि. ६ $\frac{1}{2}$ पे. आहे. ह्या उत्तरानें ही मि. लॅबो-

किंअर यांचे समाधान झाले नाहीं. कां कोण जाणें!

---

सर. जे. लॉनस्टन यांचें ह्मणणें कीं मणिपूर संस्थान खालसा करण्यापेक्षां तसेंच पूर्वींप्रमाणें स्वतंत्र ठेवणें अधिक इष्ट आहे.

सर. डब्ल्यु हंटर साहेबांचें ह्मणणें कीं, क्किंटन साहेबांवर दोषाचा ठपका ठेऊन आपलें माथें पिकवून घेण्यापेक्षां सर्व कागदपत्रीं योग्य तपासणी करून नंतर जें मत योग्य दिसेल तें द्यावें. परंतु येवढें खात्रीनें सांगतों कीं जर हिंदुस्थान सरकारानें विश्वासघातकीचें काम केलें असें अढळून आलें तर त्यांना हे माथ धरणी ठाय करण्याची वेळ येईल.

---

चालूं वर्षाच्या मार्च महिन्यामध्यें निरनिराळ्या प्रांतांतून कलकत्ता, मुंबई व कराची या तीन बंदरच्या शहरीं बाह्य देशावर धाडण्यासाठीं कापूस, गहूं, जवस व नीळ हे पदार्थ रवाना झाले त्याचें पत्रक सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झालें आहे त्यावरून कळतें कीं कापूस १५,२७,६२० मण एकंदर असून त्या पैकीं वऱ्हाडांतून १,३१,६५८ मण आहे. गहूं ११,००,७५६ मण बाहेर गेला त्यांत आमच्या प्रांतांतून सारे १५,६१९ मण आहे. मध्य प्रांतांतून गहूं वऱ्हाडपेक्षां सातपटीनें अधिक गेला असून निजामच्या राज्यांतून अवघे ४६ मण गव्हाची नोंद केली आहे. निजाम सरकारच्या राज्याच्या मानानें हा एवढा भारी फरक कां पडावा याचें कारण आम्हास कळत नाहीं. जवस १६,४६,९५७ मण भरला त्यांपैकीं वऱ्हाडांतून ३,२२,२३४ मण असून नागपूर प्रांताच्या खालोखाल आमचा नंबर लागला आहे. नीळ सारी १,१५२ मण बाहेर गेली तेव्हां त्यासंबंधानें काहीं विशेष सांगावयाचें नाहीं. वऱ्हाड, नागपूर, म्हैसूर, आसाम, सिंध वगैरे प्रांताशीं निळीच्या सौद्याचा काहीं संबंध नाहीं. बंगाल्यांत तिचें मूळ उत्पन्न आहे आणि कलकत्त्यास ती रवाना होते.

मार्च महिन्याचे वर आंकडे दाखल केले आहेत त्याची फारशी मातबरी नाहीं. मुख्यत्वें करून एप्रिल, मे महिन्यामधील खरेदी फार जंगी असून मोठा व्यापार वरील धान्यासंबंधानें या दोन महिन्यांत होत असतो. तरी व्यापारास फेब्रुवारी अखेर नेहमीं सुरवात होत असते ह्मणून आह्मी मुद्दाम मार्च महिन्याच्या फेरिस्ता वरून कांहीं ठळक ठळक आंकडे नमूद केले आहेत. गेल्या दोन महिन्यासंबंधाचीं हीं पत्रकें बाहेर आलीं ह्मणजे आह्मास कापूस, गहूं, जवस इत्यादि व्यापाराविषयीं कांहीं गोष्टी लोकांच्या नजरेपुढें आणावयाच्या आहेत. तरी मोघमांत प्रस्तुत वेळीं एवढें सांगणें आह्मांस आवश्यक वाटतें कीं हल्लीं प्रचारांत असलेल्या व्यापाराचे पद्धतीचा ओघ लोकांनीं बदलून त्यास निराळें वळण लावलें पाहिजे.

---

इंग्रजीमध्यें मानमरातब करण्याचा मार्ग अगदीं सावकारी पद्धतीचा आहे. राणी सरकार आपल्या छत्रा खालील प्रजे पैकीं कांहीं जणा विषयीं आनंद पावल्या ह्मणजे त्यांस कांहीं तरी महत्वसूचक पदवी देण्याचा शिरस्ता आहे. आमच्या जुन्या राजदरबारची पद्धत अशी आहे कीं राजानें आपल्या लोकांस इनामें, वतनें, पोषाख, जवाहीर रत्नजडित कट्यार किंवा समशेर इत्यादि बहूमोल वस्तू देणग्या देऊन उत्तम राजसेवेचें चीज करून दाखवावें. थोडें दिवसा पूर्वीं आमचे बडोदे सरकार श्रीमान सयाजीराव दुखण्यांतून बरे झाल्यावर राजे समशेर बहादुरांनीं प्रजेस आनंद पुर्वक चौदा लाख रुपये मागील थकलेला सारा माफ केला. परंतु आमच्या सरकारची द्रव्या वरील दृष्टी कृपण मनुष्या प्रमाणें असते. मद्रासे कडील प्रांत दुष्काळानें पिडून हवालदील झाले आहेत अशा प्रसंगीं महाराणी सरकारच्या वाढदिवसाच्या उत्सवा निमित्त कांहीं फंड दुष्काळानें अन्नान्न दशेस पोचलेल्या लोकांच्या प्राणत्राणासाठीं सरकारनें खर्ची घातला असतां तर आमच्या लोकांच्या मनांत राणी सरकारच्या संबंधानें किती प्रेमभाव वागला असतां हें सांगून कळवितां येत नाहीं अशा गोष्टी सहस्रावधि आहेत त्यांचें येथें दिग्दर्शन ही करण्यात हांशील नाहीं. ह्मणजे तात्पर्य काय कीं सरकारची आह्मावर मेहर नजर झाली तरी त्यांत सरकारच्या पैशाला हात लागतां कामा नये असें धोरण असते. आमच्या हिंदुस्थान सरकारास गोडबोले उपनांव चांगलें शोभतें कांकीं पैशाच्या बाबीं खेरिज इतर सर्व गोष्टींत चांगुलपण पतकरण्यास तें सदोदित तयार असतें.

हिंदुस्थानचा तारा, नाईट कमांडर, महाराज, खानबहादूर वगैरे पदव्या आपल्या नांवास जोडून राणी सरकाराचा चांद संपादण्यास फार कर्तबगारी, वशिला, व आर्जवशक्ती इत्यादि गुण आवश्य लागतात. हे ज्यांच्या अंगी वसत असतात त्यांस सरकारी दर्शी बहूमान मिळत असतो. यामध्यें आमच्या सरकारी खजिन्यांतून कांहीं खर्च न होतां उलट निरनिराळ्या प्रकारें अपरोक्षरित्या खजिन्यांत बहुत करून भर पडत असते.

नेटिव अमलदारांस किंवा सुखवस्तु स्वतंत्र गृहस्थांस ह्या पदव्या कोण कोणत्या कारणा निमित्त दिल्या जात असतात या विषयीं थोडा सूक्ष्म विचार केला म्हणजे कळून येईल कीं निरनिराळ्या खात्यांतून लहान लहान नौकराच्या जागा कमी करून, भिन्न भिन्न दर्ज्याचे पगार कमी करून, पुष्कळांस 'आयरिश प्रमोशन' देऊन मोठासा गवगवा होऊं न देतां काटकसरीच्या पद्धतीनें विलक्षण प्रकारची सरकारी खर्चांतून काटाकाट केली म्हणजे राव बहादुरी वगैरे पदव्या मिळतात. हें सर्वांस ठाऊक आहेच कीं एखादें नेटिव संस्थान ब्रिटिश अंमलदाराच्या सल्ला मसलतीनें रसातळास पोंचून इंग्रजी सुरूं झाली म्हणजे ही सरकारांतून बहुमानाच्या पदव्या मिळून सन्मान होत असतो. मोठमोठ्या देणग्या दिल्या, साहेब लोकांची सरबराई उत्तम राखली आफिसरांस पानसुपाऱ्या, चिरकद्दान नाचरंग वगैरे मौजा करून दाखविल्या, मुनसिपालिट्यांतून सरकारी अधिकाऱ्यांच्या तर्फेनें माना डोलवल्या, आणि अशाच प्रकारानें वर्तन ठेविलें म्हणजे ही बहुत प्रसंगीं स्वतंत्र पेशाचे लोक सरकारच्या आदरास पात्र होत असतात. तेव्हां आम्हीं उघडपणें सांगतो कीं सरकारी बहुमानाच्या पदव्या धारण करणाऱ्या गृहस्था विषयीं त्यांच्या पदवी वरून आमच्या मनांत पूज्यभाव उत्पन्न होत नसतो. सरकारच्या पदव्या संबंधानें आमचा असा ग्रह आहे म्हणून त्या वरून सरसकट सर्व पदवीवाल्यास आमचा लेख लागू आहे असें कोणी समजू नये.

शिवाय दुसरा एक परिपाठ आहे कीं प्रांतिक सरकार मार्फत भिन्न भिन्न पदवीस पात्र अशा गृहस्थांची शिफारस वरिष्ट सरकार प्रत होत असते आणि ती मंजूर होऊन नंतर त्या त्या मनुष्यास ती ती पदवी प्राप्त होते. प्रांतिक सरकारचें एक द्वार खुलें असल्या मुळें त्या सरकारचे मोहरेप अधिकारी असतील त्यांस खुष राखावें, त्यांची मेहरबानी करून घ्यावी तेव्हां कोठें सरकारच्या मानापानाच्या पदव्या मिळतात. आणि ह्या गोष्टी धनसंपन्न गृहस्थांस सहजी लाभतात कांकीं पैशानें किंवा त्या संबंधीं अन्य मार्गांनीं वश होत नाहीं असा प्राणी विरळा. आनररी माजिस्ट्रेटचा अधिकार देतानां ही वरील प्रकारचा मासला दिसतो अशी पुष्कळांची समजूत आहे. असो. वरील सर्व गोष्टी खऱ्या खऱ्या आह्मांस वाटल्या किंवा लोकांत ही तशाच वाटल्या तरी त्या पासून ह्मणजे कांहीं सुधारणा होईल अशी आह्मांस खात्री नाहीं सध्यां आमची एवढीच विनंती सरकार पाशीं आहे कीं त्यांस ज्या कांहीं सार्वजनिक संस्था मान्य असतील त्या मार्फत सरकारच्या सन्मानास योग्य अशा कांहीं नियमित गृहस्थांची निवड करण्याची वहिवाट सरकारनें घालून ठेवावी ह्मणजे लोकोपयोगीं कृत्यांत विजय प्राप्त करून घेणाऱ्या लोकांचा सरकारांतून ही बहुमान होत असतो असें सर्वत्रास कळल्या पासून अनेक तऱ्हेनें फायदा आहे.

---

The Berar Samachar

MONDAY, JUNE 8, 1891

## PRELIMINARY OF THE 'EMPRESS vs. WITTENBAKER' CASE.

Mr. H. S. Nicholetts has ably given a short connected story of the above case in his record of the grounds of commitment when he concluded his preliminary examination and ordered the accused to stand his trial at the next sessions of the High Court of Bombay. The story runs thus:—

### GROUNDS FOR COMMITMENT.

The accused in this case is George Herbert Wittenbaker late a sub Assistant Conservator of Forest in the Buldana District in the Hyderabad Assigned Districts; he was the District Forest Officer of Buldana District; and in that capacity was entrusted with the issuing of light grazing passes in the Reserved forests and had to collect and remit to the Government Treasury money paid in for these passes.

From the evidence recorded it appears that on the night of the 2nd September 1890, there was a fire in the District Office Buldana when a drawer containing grazing pass books, Registers of passes &c. were burnt, the appearance negatived the idea of accident as the drawers showed a lantern laid side-ways in it, with books and papers piled round it. On enquiry it was found that the drawer belonging to Almirah out of which it was ordered to be taken out by the accused on the morning of the fire and placed on a shelf where three lanterns had been by the accused's orders placed before. On the afternoon of that day the accused had sent away the office orderly to a village 6 or 7 miles off; the only other person who kept watch at the office had also gone to his home at about 7-30 p. m. to take his meals. It further appeared that a change had been made by the accused in the system of issuing passes for light grazing and that instead of the passes being sent through this subordinate officers in charge of the Reserves to be entered in the Registers which was considered as affording a means of check they were given to the grazers by the district forest officer who issued them; it also came out that moneys accused received were not entered in the cash book from day to day or as they came in, and that they were not remitted to the treasury promptly as required by the forest code. On these facts being reported to the Conservator of Forests through the Deputy Commissioner he issued orders for collection of passes from all passtakers and for the amounts stated in these passes, to be compared with the entries in the cash book and challans. When this was done ( Vide Ex. 437 ) it was found that in the cash book it was stated that for passes numbering 1 to 415 issued for Geru Matergaon Reserve between 21st and 28th June 1890 Rs 1097-8 were received where as the 291 passes recovered showed that 1791 were actually received on those 291 passes. Similarly on the 222 passes issued for Amdurni reserve the amount stated in the cash book was only 535-8 but the 154 passes recovered showed that on the 154 passes as much as 940 Rs were received. Again for the passes no: 501 to 580 for Geru Matergaon reserve issued between 9th and 29th July 1890 the amount in the cash book was 143-4 but the 69 passes which were recovered out of 80 issued showed that on these 338-8 had been paid; there was thus a deficiency of at least 1098 Rs. for June passes and of 195-4 Rs. for the July passes, the passes having been issued by the accused the amount of the fees received being in his hand-writing and said to have been received by him there appeared a *prima faice* case against him.

The accused was on leave and was sent for and asked to give an explanation, this he did not furnish alleging sick ness; a month afterwards on the Resident's orders a second opportunity was given him when he was distinctly told that this would be the last chance; on this occasion also he declined to give any explanation, a departmental enquiry was made by Colonel Szczepanski and Mr. Taylor Deputy Conservator Forests and the papers submitted to the Commissioner H. A. D. and through him to the Resident at Hyderabad who after going in the case ordered prosecution.

The important evidence in this case consists of the evidence of.

1 Forest Ranger Bissesur Singh.
2 Clerk Rango Bapooji.
3 Chapprassee Osman.
4 Chowkidar Govind.
5 Kishen ( accused's butler ).

There is also the evidence of Mr. Haldane the accused's successor at Buldana who supplies some of the links in the chain of evidence; the evidence of Mr. Taylor is rather of a formal character.

The evidence of the Ranger Bissesur Singh and clerk Rango Bapooji establishes:—

1st The deviation by the accused from the light grazing rules of 1888

the doing away of a system of check which existed and general laxity with regard to the passes.

2 nd: Laxity in keeping accounts and remitting money to the Treasury.

3 rd: Contrary to all precedents the accused himself wrote out the passes.

4. All money within the period in question in this case was received by him from the pass-takers kept by him in the cash-chest, the key of which he had and which chest was kept in his private dwelling.

The evidence of Osman, Govind and Kishen corroborates this.

Rango Bapuji, Osman, and Kishen establish that when the money was remitted to the Government Treasury it was taken out of the cash-chest by the accused and then handed over to the clerk. Rango Bapuji and Bissesur Singh establish that the pass-books were with the accused who also kept the registers of passes. Rango's evidence shows that a second set of Register books was ordered by the accused before the first could by any possibility have been used up.

The main fact in this case is that the passes are in the hand writing of the accused, they are in the nature of receipts and the presumption would naturally arise that he received money for which he gave receipts, there is the strongest evidence to prove that the money on these passes was received by the accused himself and kept by him. The evidence of witnesses Bissesur Singh, Rango Bapuji, Osman, Govind and Kishen is corroborated by some three hundred persons who have absolutely no interest in the case.

The suspicious circumstances connected with the burning, the accused's conduct on that night, his subsequent reticence, the excuse of inability to reply which is shown to be untrue by the evidence of Dr: Mont-gomery, all go to strengthen the case.

The accused's explanation now given before the court is unsatisfactory, it is admitted that the passes are in his hand-writing, that the money was placed on his table, that the pass-books and registers remained with him, that he checked them at times, that the money was placed in the cash-chest under his eyes, that the key of the cash-chest was with him always, it is difficult to suppose that under these circumstances the ranger or the clerk could take any thing without his being aware of it; the greatest difficulty is for the accused to explain how he came to enter false figures of cattle and money in the cash-book tallying exactly with the amount in the cash-chest; it is a significant fact that on the slip from which Rango Bapuji says he made the entries there are the figures 1633 in blue pencil in the hand-writing of the accused.

The exact amount of the defalcation is proved by the passes and the cash-book. It is clear that he issued passes, Exht. no: 4—to 448 and 450 to 518, and received 3069 8 and that the cash-book extract Ex. 519 and Treasury chal lans Exht. 3 and 449 show that he accounted for the sum of Rs. 1776-4 only, and made false entries in the cash-book of the number of cattle for which the passes were issued and the amounts received by him, and that he appropriated to his own use the three sums of Rs. 693-8, 404-8, and 195-4, and as a *prima facie* case has been made out by the prosecution, I have framed a charge under section 409 Indian Penal Code and decided that the accused is a European British subject who is triable by the High Court, therefore have committed the said George Herbert Wittenbaker to stand his trial at the next sessions of the High Court of Bombay.

Dated Akola 23rd May 1891. (Sd.) H. S. Nicholetts District Magistrate Akola.

Mr. Wittenbaker has made several statements in the course of the prosecution instituted by the Government. The concluding portion of their summary as published in the Vaidarbha has startled us for its singular nature and we cannot finish the history of the case without quoting it in full.

"I know that the whole of this prosecution was originated and is now being conducted by Colonel Szczepanski and therefore I make the following statement: Colonel Szczepanski and I were not on good terms. There was considerable official friction between us, due to the colonel being opposed to the Forest department and its officers; and losing no opportunity to show his opposition to them. This was also due to it being a sore joint with the Colonel. I had something to do with an inquiry with regard to Tahsildar Shabas Khan, the Colonel's disposal of which brought him a certain amount of disrepute. Besides official friction of this sort our private relations were considerably strained. This was due to certain disagreements and unpleasantness between the colonel and myself, regarding matters in which Mrs. Cotgrave was concerned. These disagreements finally led to a distinct rupture between the Colonel and myself; also through an unhappy remark I let fall on one occasion regarding Mr. Cotgrave. On the occasion the colonel lost complete control over himself and threatened that he would do me injury. I impute and can trace all my recent official troubles culminating in the present prosecution to that occasion. In fact the first trouble with regard to the Buldana Rumna was one cooked up by colonel and Mr. Cotgrave. I may state that even after I had given over charge I had a repetition of the colonel's threat conveyed to me to the effect that I had not come to the end of my troubles.

I was on leave and do not know whether the first inquiry into my case was ordered by the Conservator of Forests, or any body else."

## वऱ्हाड.

हवामान— उष्णा फार होता परंतु वाऱ्याच्या सतत वाहण्यानें त्याचा अम्मल मंदावत चालला आहे. हवेंतील फरका वरून मृग नक्षत्र आपली छाप लवकरच बसविल असा अंदाज आहे.

चक्रवर्तिनी महाराणी सरकारच्या वाढदिवसा निमित्त कित्येक गृहस्थांस सन्मानदर्शक पदव्या देण्यांत आल्या आहेत त्यांत आम्हांस लिहिण्यास मोठा संतोष वाटतो कीं आमच्या वऱ्हाडांतील देऊळ घाटचे जहागिरदार खान बहादुर सल्लामुल्लाखान यांस त्यांच्या थोरवी वरून 'नबाब' हा किताब दिल्याविषयीं व्हाइसराय साहेबांनीं जाहीर केलें आहे. तेव्हां नबाब सल्लामुल्लाखान यांनीं आपल्या सद्गुणांनीं 'नबाबा' ची योग्यता व मातबरी लोकांस नीटपणें समजाऊन दिल्यानें नबाब संज्ञेचीं सार्थकता होईल असें आह्मी ह्मणतों.

गेल्या गुरुवारीं रा. रा. दत्तात्रय विष्णु भागवत यांच्या पत्नीस देवाज्ञा झाली हें कळविण्यास दुःख वाटतें. अखंड सौभाग्यवती पार्वतीबाई नऊ दिवसांची बाळंतीण असून किरकोळ ताप येत होता. मरण फार स्वल्पकाळांत व अवचित आलें. राजश्री दत्तोपंतासारख्या तरुण व सूज्ञ गृहस्थाविषयीं आम्ही फार चौकस असतो तेव्हां त्यांच्या ऐन उमेदीच्या संसारसुखास, आनंदवृत्तीस, उत्साहशक्तीस विघ्नकारक गोष्ट ईश्वरास रुचली ह्मणून फार खेद वाटतो.

रा. रा. गोविंद नारायण काणे वकील उमरावती हे बारिस्टरीच्या परीक्षेचा अभ्यास करण्यासाठीं दहा दिवसांपूर्वीं विलायतेस रवाना झाले. त्यांचे बरोबर त्यांचे मुंबईचे मित्र रा. माडगांवकर हे ही देशपर्यटणा निमित्त गेले आहेत.

पुसदचे आफिशिएटींग तहशिल्दार रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशपांडे हे कायमचे तहशिदार दाखल झाल्या नंतर किरकोळ रजेवर अडगांवांस आपल्या घरीं गेले आहेत. या गृहस्थांचे चुलते रा. रा. भाईजीपंत हेही लग्नकार्या निमित्त हैदराबादे कडून आपल्या तालुकदारीच्या जागेवरून थोड्या रजेवर स्वगृहीं आले आहेत.

रा. रा. गोपाळ नारायण देशपांडे असि. मास्तर मुर्तिजापूर यांस शिरपूर मुक्कामीं हेड मास्तरचे जागीं नेमिलें आहे.

मुनसी अजिजुद्दीन एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस दुसरे वर्ग माजिस्ट्रेटचे अधिकार दिल्याविषयीं रेसिडेन्सी आडरवरून समजलें.

हिंगोलीचे पोलिस सुपरिन्टेंडन्ट यांनीं वाशिम जिल्ह्यांत माजिस्ट्रेट वर्ग २ चा अखत्यार चालवावा असें ठरलें आहे. आणि त्या शिवाय पन्नास रुपया पर्यंत दाव्यांचा निकाल करण्याचा स्मालकाज कोडताचा अधिकार सुपारिनटेंडेन्ट साहेबांस दिला आहे.

मि. मीर मुबारक अली एक्स्ट्रा असि. कमिशनर मोर्शी यांस असि. कमिशनर वर्ग २ चे अधिकार आहेत त्या शिवाय आणखी मोर्शी तहशिलींतील शंभर रुपये पर्यंत दाव्याचा निकाल करण्यासाठीं स्मालकाज कोडताचे न्यायाधीशाचा अधिकार दिला आहे.

मि. एदुलजी बहिमनजी दतुर असि. कमिशनर यांस हैदराबादच्या रेसिडेन्सी बझारच्या हद्दींत पहिले वर्ग माजिस्ट्रेट नेमून दिवाणी पांचशें रुपये पर्यंतचा स्मालकाज कोडताचा अधिकार दिला आहे.

अकोला मुनसिपल शाळेचे हेडमास्तर रा. रा. यज्ञेश्वर अनंत वैद्य यांस एक वर्षाची रजा मिळाल्या कारणानें त्यांच्या रजेंत मुंडगांवचे मास्तर रा. रा. बागाईतकर यांस नेमिलें आहे.

मलकापूर ता. बोर्डाचे सभासद रा. रा. जानजी माधव यांनीं राजीनामा दिल्यावरून त्यांच्या जागीं रा. रा. विष्णू हरी तहशिलदार यांस रेसिडेंट साहेबांनीं नेमिलें आहे.

रा. रा. वासुदेव सदाशिव पिसोळकर एक्स्ट्रा असि. कमि. वर्ग ४ आणि रेसिडेंटचे क्लार्क व सरकारी ट्रान्सलेटर यांस गेल्या २५वे तारखे पासून एक हक्काची रजा मिळाली आहे. त्यांच्या रजेंत हैद्राबादच्या दिवाणी अपील कोडतांतील क्लार्क रा. रा. सखाराम आत्माराम अडणीखरी यांजकडे स त्यांच्या कामा शिवाय राजश्री पिसोळकर यांचें ही काम सोंपविलें आहे.

येथील 'कादरभाई'च्या जिन्या फ्याक्टरी मध्यें एक मोची चौकाच्या पत्र्यांत पाय सांपडल्या मुळें मरण पावला.


## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यात येतें कीं अकोलें मुनसिपाल कॅमिटीचे हद्दींतील गवताचा लिलाव सन १८९१।९२ साला करितां तारीख १० माहे जून सन १८९१ इ० रोजीं सकाळीं ७ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांचा लिलाव घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहु तारखेस सदरहु ठिकाणीं हजर राहावें कळावें. तारीख ६।६।९१.

Vyanktesh R. Mudholkar
Secretary.
A. M. C.



### नोटीस.

रा० रा० भगवान वल्लद पैकाजी पहुरकार पाटील रहणार मौजे संवरणें तालुके खामगाव यासः—नोटीस देणार करणाजी वल्लद खानाजी पहुरकार पाटील रहाणार मौजे संवरणें ता० खामगांव. नोटीसीनें असें कळवितों कीं, तुह्मी आह्मांपासून आमचों गुरें बांधण्याचा कोठा दरमहा चार आणे भाडें देण्याचें करारानें गुरें बांधण्यास भाड्यानें घेतला. त्यास आज तीन वर्षें झालीं तुह्मी आज पावेतों भाडें तीन वर्षांत कांहीं दिलें नाहीं. व कोठाही खालीं करून दिला नाहीं. याज करितां या नोटीशीनें असें कळवितों कीं, सदरहू कोठा नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत खालीं करून द्यावा. व तीन वर्षांचें भाडें ९ नऊ रुपये ही आणून देऊन पावती घेऊन जावी. असें केलें नाहींतर तुह्मावर भाड्याबद्दल व कोठा ताब्यांत घेण्याबद्दल योग्य कोर्टांत काम चालवून अखेर निकाल होईपर्यंत न ह्या नोटीशीचा खर्च वगैरे सर्व भरून घेतलें जाईल. ह्मणून दिली नोटीस सही. तारीख ९ माहे जून सन १८९१ इसवी.

(सही.)
करणाजी व० खानाजी पाटील पहुरकार मौजे सवरन
नि० हातची असे. द०
अंबादास केशव पांडे.


## वर्तमानसार.

बडोद्याकडे आजार फार असतात, असे डाक्टर व वैद्य सांगतात. या करितां बडोद्यांतील लोकांनीं खालीं सांगितलेल्या चार गोष्टींचें नेहमीं अवलंबन केलें असतां त्यांस बहुतकरून देशी वैद्याच्या अगर इंग्रजी डाक्तराच्या घराची पायरी चढण्याचें कांहीं प्रयोजन पडणार नाहीं. कारण ते आजार कमी करण्यास ह्या चार गोष्टी विशेष कारणीभूत होतात:—

१. दुपारीं भुकेपक्षां दोन घासानीं कमी जेवावें.

२. जेवणाशिवाय मध्यंतरीं फाजील पाणी पिऊ नये.

३. दोनप्रहरीं झोंप घेऊ नये; उद्योगांत नेहमीं असावें. आणि

४. रात्रींही फारच बेतानें जेवावें. ज. व.

मे. ता. १ रोजीं पार्लमेंट मध्यें मार्किस रिपन यांनीं व्हायकाउन्ट क्रास यांस मणिपूर प्रकरणीं प्रश्न विचारला असतां क्रास साहेबाचें म्हणणें पडलें कीं दरबारास बोलावून सेनापतीस उघड रीतीनें पकडण्याचा घाट क्विन्टन साहेबांनीं घातला असावा हें संभवनीय नाहीं. तरीपण पूर्ण माहिती मिळाल्या खेरीज खरें काय तें सांगता येत नाहीं—यालाच म्हणतात काम! ! कागदपत्र लवकर आतात कशाला व हिंदुस्थानची वेळेवर डाळ वेळेवर शिजते कशाला!

✓ मि. ग्रिमवूड – मणिपूरचे माजी रेसिडेंट याचा मारेकरी कनाऊ यांस यांस ता.. १५ मे रोजी प्रातःकाळीं फाशी दिलें.

गेल्या बनारसच्या धामधुमींत सामील असलेल्यांची चौकशी होऊन त्यापैकीं दोघांस सेशन कोर्टापुढें धाडिलें व १६ इसमांस सोडून दिलें. या बद्दल लोकांनीं बराच हर्ष प्रदर्शित केला.

अलीकडे पोर्टुगाल व ब्रिटन यामध्यें बेबनाव होण्याचा सुमार दिसतो नुकतेंच एक दोन वेळा पोर्टुगालची लॉर्ड सॅलिसबर यांनीं घटकदार दरबारी रीतीनें पोर्तुगालचे राजाची या संबंधानें कान उघाडणी केली. परंतु त्याचा कांहींच उपयोग झालासा दिसत नाहीं. मे ता. ११ रोजी पंगवी नदीवर ब्रिटिश व पोर्टुगीज लोक या मध्यें चकमक झडली. यांत पोर्तुगीज पडले. ब्रिटिश लोकांचे काय नुकसान झालें हें कळलें नाहीं.

मे तारीख ४ रोजीं मि. क्राफर्ड साहेब यांनीं पार्लमेंटमध्यें सर जान गार्स्ट हिंदुस्थानचे दुय्यम सेक्रेटरी यांस मणीपूर संस्थानावर स्वारी करण्याबद्दल मि. क्विन्टन साहेबांस दिलेला हुकूम सादर करण्याविषयीं विचारतां गारर्ट साहेबांनीं त्या प्रकरणासंबंधानें कागद पत्र हातीं येतांच सादर केले जातील म्हणून म्हटलें.

मि. ब्राईस यांनीं ही असें विचारलें कीं, मणीपूर प्रकरणासंबंधानें कागदपत्र पार्लमेंट पुढें आणतांना त्यांत क्विन्टन साहेबांस दिलेले हुकूमच केवळ नव्हत परंतु इंडिया आफिस व गव्हरनर जनरल यांमध्यें या प्रकरणीं चाललेला सर्व पत्रव्यवहार पार्लमेंट पुढें आणावा. गॉर्स्ट साहेबांनीं मि. ब्राईसचें म्हणणें कबूल केलें.

मि. क्रेमर साहेबांनीं मे तारीख ५ रोजीं गार्स्ट साहेबांस कांहीं प्रश्न केले ते येणें प्रमाणें:—युवराज दरबारांत हजर असतांना त्यांस तथेंच पकडण्याचा प्रयत्न क्विन्टन साहेबांनीं केला होता अगर करण्याचे विचारांत होते. असा प्रयत्न घडला असल्यास नुकत्याच झालेल्या रक्तस्त्रावाचें कारण तेंच कीं काय! युवराज पकडण्याविषयीं हुकूम हिंदुस्थान सरकारा कडून कमिशनर बहादुरांस गेला होता अगर कमिशनर साहेबांनीं आपण होऊनच हा अधिकार योजिला! कमिशनर बहादुरांस गेलेल्या हुकुमांच्या शब्दशः नकला आफिसमध्यें आहेत किंवा नाहींत! व असल्या हुकुमांच्या नकला पार्लमेंट पुढें कधीं येतील? यावर गॉर्स्ट साहेबांचें उत्तर कीं क्रॉस साहेबांनीं या प्रश्नावर उत्तर द्यावयाचें तेवढेंच त्यांच्या अनुज्ञेवरून येथें सांगण्यांत येईल या प्रश्नांस उत्तर येवढेंच कीं या सर्व प्रकरणासंबंधीं कागदपत्र पार्लमेंट पुढें आहेतच व आणखीं लागणारे येतांच सादर करण्यांत येतील. हें उत्तर उडवाउडवीचें असें वाटून मि. क्रेमर साहेबांनीं असें निक्षून सांगितलें कीं हाच प्रश्न योग्य उत्तर मिळेपर्यंत मी घालीन.

अमेरिकेंतून बटाटा इंग्लंडांत आल्यास बरोबर तीनशें वर्षें झालीं. आमच्या इकडे आल्यालाही दोनशें सव्वा दोनशें वर्षें झालीं आतां तो सनातन वैदिक धर्माच्या फराळांत मुख्य होऊन बसला आहे!

आसामा नजीक कांहीं डोंगर आहेत तेथें व इतर ठिकाणीं नारिंगे किती होतात याचा कोणाला अजमास देखील होणार नाहीं गेल्या सालीच तेथून बंगाल्यांत एकंदर २७०५३९६० नारिंगें आली तरी तो सगळ्यांत वईट मोसम म्हणतात; कारण सत्तर पंचाहत्तर लाख कायशीं नद्यांतून वाहून गेलीं! काय ही आमची सपीकता! कर०

—जगांतील वस्ती – जगांत एकंदर १५१०२९१००० लोक संख्या आहे. पैकीं पांच नवमांश एशिया खंडांत आहेत एशियांत ८३०५०००००; युरोपांत ३४९८७३०००; आफ्रिकेंत २०३२२१००० अमेरिकेंत १२१३३५०००; आस्ट्रेलिया, पोलिनिशिया, आणि पोलरल्यांड मध्यें मिळून ४५००००० लोक संख्या आहे. युरोपांत दर मैलास ९४, एशियांत ४९, आफ्रिकेंत १८, अमेरिकेंत १०, आस्टोलया व पोलितिशिया मध्यें २, आणि पोलिरल्यांडमध्यें १ या प्रमाणें लोकांचें स्थान प्रमाण आहे. न्या० सिं०

मद्रास प्रांतांतील कारमोदर प्रांतांत दुष्काळाचा बराच प्रादुर्भाव झाला आहे. हेड असि. कलेक्टर मि. बकश म्हणतात कीं, बहुतेक मुलांस अपुरें अन्न खावयास मिळतें कित्येक लोक बांबूच्या कोंवळ्या वेल्यांवर वें एका प्रकारच्या जंगली पानांवर निर्वाह करीत अहेत. अन्न मिळत नाहीं म्हणून गुन्हे करतो असें कित्येक आरण होऊन कबूल करतात. विगलपट्टम जिल्ह्यांत अतिशय दुष्काळ पडला आहे. त्या प्रांतांतील कित्येक लोकांस खावयास मिळत नसून कित्येक अन्नान्न करून मेलेही. अशा प्रकारची मद्रास इलाख्याची हालहवाल आहे.

✓ निजामानें आपल्या राज्यांत एका हिंदु देवळास नौबद दिली असून त्यासाठीं दरमहा ५० रु. खर्च देण्याचें ठरविलें आहे. या निजामाच्या कृत्याबद्दल तेथील हिंदु लोक वाहवा करीत असून हिंदु मुसलमान यांच्यांत ऐक्य करणार निजामासारखे राजे स्तुतीस पात्र आहेत. यांत कांहीं शंका नाहीं. आमचे इंग्रज राजेही हिंदु मुसलमान यांच्यांत झोंबी लावून आपला हात साधतात याबद्दल तेही स्तुतीस पात्र आहेत!

आफ्रिकेंत आमच्या सरकारची जी एक कंपनी व्यापारासाठीं गेली आहे त्या कंपनीची तेथील पोर्तुगीज लोकांनीं पुन्हां कुचाळी काढली अशी गप्प आहे या कुचाळींत पोर्तुगीज लोकांचे हात इसम मारले गेले असून इंग्रज किती मारले गेले हें अजून बाहेर आलें नाहीं.

वाळलेल्या गवतावर राकेल तेल ओतून त्यास आग लावावी म्हणजे टोळांचा उपद्रव नाहींसा होतो असें एकानें प्रसिद्ध केलें आहे.

हलींच्या ऋतूंत पाणी पिणें तें ऊन करून प्यावें असें मुंबईच्या हेल्थ आफिसरानें प्रसिद्ध केलें आहे.

शांघायची तार सांगते कीं, नांकिन येथील मिशनरी लोकांच्या घरांवर बंडखोरांनीं हल्ला करून बरीच नासाडी केली. घरांतील लोक मोठ्या शिकस्तेनें आपला जीव घेऊन पळून गेले. यांगसे नदीवरील बंदरांत रहाणाऱ्या परकीय लोकांस मोठें भय उत्पन्न झालें आहे. बंडखोर लोकांची संख्या अधिकाधिक वाढत आहे. त्याच ठिकाणची ता. २६ मिनहूची तार सांगते कीं, नांकिन येथील युरोपियन स्त्रीपुरुष तें शहर सोडून निघून गेले. मिथॉडिस्त नांवाच्या ख्रिस्ती मतांच्या मुलींच्या शाळेस आग लावण्यांत आली नाहीं. चीन सरकारची फौज व आमचे एक लढाऊ गलबत बंडखोरांचा नाश करण्यासाठीं पाठविलें आहे.

सुबोधसिंधु वर्तमानपत्रांत पुढील भयंकर व क्रूरपणाची हकीकत प्रसिद्ध झाली आहे:—उज्जेन येथें फार भयंकर व अंगावर रोमांच उभे रहाणारें कृत्य घडून आलें. आज बरेच दिवसांपासून शिंदे शाईंत मोठमोठालीं कामें करून कांहीं दिवस होळकरशाईंत ही रहात असलेले गृहस्थ रा. रा. बळवंत वामन बुटी या विद्वान व हुषार गृहस्थाचा प्राण दुष्ट व राक्षसी कृत्य करणाऱ्या कित्येक नराधम यमदुतांनीं मोठ्या क्रूरतेनें घेतला. याची हकीकत आमच्या ऐकण्यांत अशी आली आहे कीं, कोणत्या एका प्रकरणांत यांना होळकर शाईंतून वारंट काढण्यांत आलें होतें पण बळवंतरावजी हे शिंदेशाईंतील उजेन येथें रहात असल्यानें तें वारंट रेसिडेंट मार्फत तामिल करण्या करितां इंदोर येथील पोलिस सुपरिंटेंडेंट हे घेऊन उजेन येथें गेले. उजेन शहरांत अशी ही गप्प उठली कीं, या पोलिस सुप. नें तेथील व रेल्वेवरील कांहीं पोलिसास आपलेसें करून घेतलें व नंतर सर्वांनीं एकत्र होऊन भर दिवसा बळवंतराव यांस घरांतून फुस लावून बाहेर कढलें व रस्त्याच्या एका बाजूस नेऊन या राक्षसांनीं त्याच्या शरिराची फारच अपेक्षा केली पायाच्या नसा गुडघ्याच्या नसा, वृषण, कानसील इत्यादि १४ ठिकाणच्या नसा तोडून वृषणाच्या गोळ्या काढून त्याची जीभ ही पण बाहेर काढली व भर रस्त्यानें मारीत मारीत दिवसा ढवळ्या इंदुरास नेण्याकरितो स्टेशनवर घेऊन गेले. स्टेशनावर आल्यावेळीं बळवंतरावजी हे मरणोन्मुख झाले असून त्यांची थोडीशी वाचा मात्र चालत होती परंतु रेल्वे अक्टाप्रमाणें बळवंतरावजी आसन्न मरण असल्यानें त्यांना गाडींत चढवूं दिलें नाहीं या योगानें वरील नराधमाचे सवड हेतु जागच्या जागीं राहिले. पुढें ही खबर पसरतांच बळवंतरावजी यांनीं गांवांत नेलें. नंतर १८ घंट्यांनीं यांनीं स्वर्गाचा रस्ता धरला. हें कृत्य करून पोलिस सुप. सा. लागलीच इंदुरास निघून गेले बळवंतरावजींची अशी भयंकर स्थिती होतांच त्याच्या घरच्या माणसांनीं रेसिडेंट, ग्वाल्हेर दरबार गव्हरनरजनरल व स्टेट सेक्रेटरी कडेस तारद्वारें खबर कळविली. रेसिडेंटासही खबर मिळतांच त्यांनीं वरील पोलिस सुप. स. लागलीच गिरफतार केलें. व त्याच प्रमाणें ग्वाल्हेर दरबारास ही खबर मिळतांच त्यांनीं आपल्या राज्यांत उजेन सारख्या शहरांत दिवसा ढवळ्या असा प्रकारचा भयंकर प्रसंग घडून आला याची फार दिलगिरी राखून त्यांनीं उजेन येथील कांहीं पोलिस आफिसरास सस्पिंडही केल्याचें सांगतात. ट० अ०

बंगलोर येथें गेल्या २ ऱ्या तारखेस ७ महिन्यांच्या मुलीचें ५ वर्षांच्या मुलाशीं लग्न लावण्यांत आलें असें 'हिंदू' चा बातमीदार लिहितो. सरकारानें या लग्नाची चौकशी करावी अशी शिफारस सदहू बातमीदारानें केली आहे.

धर्मांतर—हैद्राबाद येथें गेल्या शुक्रवारीं एक साहेब मुसलमानी धर्मांत शिरले, व त्यांचें नांव कादरजंग असें ठेविलें! हैद्राबादेंतील एक मुसलमान याच सुमारास ख्रिस्ति धर्मांत गेला. मिळून फिटास फिट झाली.

दुकानांत टोळ — झेलम येथें शेतांत आतां कांहीं उरलें नाहीं, तेव्हां टोळांनीं तेथील बाजारांत प्रवेश केला आहे. कापडरस्त्यांत बसून त्यांनीं सुद्धां त्यांनीं तुकडे पाडले म्हणून तेथील बहुतेक कापडाच्या व्यापाऱ्यांनीं दुकानें बंद केलीं आहेत असें समजतें!

हैद्राबाद २० मे– निझाम सरकारच्या कालेजांत मुलीस घेऊं नये असा ठराव झाला आहे. निझाम सरकारचे मुलखांत उपयोगी पडणारे पोष्टकार्ड सुरूं करण्यांत आले आहे. हैद्राबादेस ८ वर्षांपूर्वीं सुमारें ७ लाख रुपयांचे जवाहिराची चोरी झाली होती. त्या चोरीतील माल मुंबईत विकला जाऊन त्या पैकींच कांहीं माल परत हैद्राबादेस विकोस आल्याचें उमगल्या वरून या बड्या चोरांच्या इनसाफासाठीं हैद्राबाद सरकारानें हल्लीं एक कमिशन नेमिलें आहे.

घेण्यासारखी गोष्ट— मुंबईस पारशी लोकांचें एक हायस्कूल आहे त्यांत तेथल्या मुलांनींच एक सेव्हिंग ब्यांक काढली आहे त्यांत एक पैसा पासून ची रकम मुलें ठेवितात. सध्यां या ब्यांकचे २६२ खातेदार असून ठेवीची एकंदर रकम २३९४-१५६ जमली आहे. त्याचप्रमाणें नाशिक हायस्कूल मध्यें मुलांनीं स्वतांचेंच एक दुकान काढलें आहे. यांत कागद, शाई, दौत, पेनें पेनशीला वगैरे मुलांना अवश्यक अशा वस्तु असतात. या दुकानाचे भागीदार मुलेंच आहेत. प्रत्येक भाग चार आण्याचा आहे.

कलकत्याच्या 'भारतमित्र' नांवाच्या वर्तमानपत्रावरून असें कळतें कीं, बंगाल्यांत बुनागंती नामक गांवीं एक दिवस एक ढग दृष्टीस पडला. थोडीशी पर्जन्यवृष्टि झाल्यावर एक घोरनाद झाला व लागलीच चारी अंगांनीं त्या गांवावर अग्निवर्षाव होऊं लागला. या वर्षावास वायूचे ही साहाय्य होतें पावसाची ही वृष्टि बंद झाल्यावर पाहतात तों सर्व रहिवाशी अचेतन पडले आहेत! कोणाचे हात, कोणचे पाय, कोणाचें डोकें, तुटून पडलें होतें ! ! पांच सहाशें घरांचा नाश झाला; व पुष्कळ लोक मृत्युमुखीं पडले ! ! अशा प्रकारचा उल्कापात झालेला कोणासही स्मरत नाहीं. क. त.

---

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०|१३
सहामाही " ३ " ०|८
सालअखेर " ७ " १|०८
किरकोळ अंकास........................ ०|४

per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 ,,1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy...................................4as

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०|०६
दुसरे खेपेस ........०|

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 as
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXV AKOLA MONDAY 15 JUNE 1891 NO 23

वर्ष २५ अकोला सोमवार तारीख १५ माहे जून सन १८९१ इ० अंक २३

### जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं अकोलें मुनसिपाल कमिटीचे हद्दीतील गवताचा लिलाव सन १८९१।९२ साला करितां तारीख १० माहे जून सन १८९१ इ० रोजीं सकाळीं ७ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे ज्यांचा लिलाव घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहु तारखेस सदरहु ठिकाणीं हजर राहावें कळावें. तारीख ६।६।९१.

Vyanktesh R. Mudholkar
Secretary.
A. M. C.

### औद्योगिकपरिषद्

किंवा

कारागीर, कारखानदार, व्यापारी व देशांतील उद्योगधंदे वाढविण्याविषयीं हर्तेपरहर्ते खटपट करणाऱ्या लोकांची सभा.

येत्या आगष्ट महिन्यांत पुणें मुक्कामी भरणार आहे.

सभेची तारीख, सभेपुढें यावयाचे विषय वगैरे बद्दल कच्ची माहिती मागाहून कळविण्यांत येईल

सभेसाठीं येऊं इच्छिणार लोकांनीं तारीख १५ जुलईचे आंत खालीं सही करणार यांजकडे आपलीं नांवें कळवावीं

| | |
|---|---|
| पुणें, रेम्युझिम कचेरी ना. १३ माहे मे १८९ | महादेव बल्लाळ नमजोशी, देशांतील कारागिरीस व धंद्यास उत्तेजन देणार मंडळीचे सेक्रेटरी. |

### जाहिरात.

एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आह्मांस कळवावें. माफक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा.

जी. डी. कविटकर
मर्चंट आणि कमिशनर एजंट
शहर एलिचपूर

### सचित्रकॅटलाग



आर. डी. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव ह्याचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ठ शुद्ध ८ शके १८१३

'बडोद्याचें वर्णन' नांवाचें एक लहानसें पुस्तक रा. रा. भाऊ गोविंद सापकर ज्ञानचक्षुचे मालक यांजकडून आह्मांस नजर आलें आहे त्याचा आह्मी आभार पुर्वक स्वीकार करितों. पुस्तककर्ते रा. रा. विश्वनाथ गंगाधर सापकर यांनीं बडोद्याच्या वर्णनावरील लेख ज्ञानचक्षू मधून प्रसिद्ध केले आहेत ते पुष्कळांच्या वाचण्यांत आले असतीलच हें वर्णन वाचून बडोदें शहर पाहण्या विषयीं मनांत इच्छा उत्पन्न व्हावी अशा मासल्याचें हें पुस्तक आहे. वर्णन पद्धतवार असून थोडक्यांत सोप्या भाषेंत दिलें आहे. जवाहिरखाना सोन्याऱ्हप्याच्या तोफा, सोन्याची अंबारी, सर्वजनोद्यान, हत्तीखाना, लक्ष्मी विलास, इत्यादिकांची माहिती कळल्यानें जुन्या राजवैभवाची थोडी बहुत कल्पना होते. हें बडोद्याचें त्रोटक रूपानें वर्णन असल्या कारणानें तिकडील पुष्कळ गोष्टीं विषयीं माहिती देण्यास सवड झाली नसावी असें वाटतें. पुस्तक कदाचित अपुरें वाटेल परंतु लिहिलेला विषय चांगला साधला आहे. श्रीमंत सयाजीराव यांनीं पाण्याची सुयत्त, शहर सफाई वगैरे कडे विशेष लक्ष्य पोंचविल्या कारणानें बडोदें शहर कांहीं कालानें अप्रतिम शहर बनेल असें लोक बोलतात. हा सर्व फायदा गायकवाडांच्या देशपर्यटणापासून प्रजेस मिळत आहे हें उघड आहे.

बडोद्याप्रमाणें हिंदुस्थानांतील इतिहासप्रसिद्ध आणखीं कित्येक दिल्ली आग्रा ग्वालेर हैद्राबाद, म्हैसूर, वगैरे शहरांचीं वर्णनें मराठींत उतरल्यास लोकांस त्यापासून चांगला उपयोग होऊन बादशहांच्यांतील वर्णनें वाचण्यापेक्षां प्रत्यक्ष नगरींचीं वर्णनें वाचण्यास मौज वाटून मनोरंजन होईल. आमच्या मतें असल्या प्रकारच्या ग्रंथांमध्यें वरील छोट्या पुस्तकांची गणना करण्यास कांहीं एक प्रत्यवाय नाहीं. ग्रंथ लेखनांमध्यें वर्णनपर पुस्तकें लिहिणें तीं वाचतांना सोपें वाटतें तितकें वास्तविकपणें सोपें नसून नित्याच्या लोकांच्या पाहण्यांतील शहराविषयीं मनोवेधक लेख जगापुढें आणण्यास ग्रंथकर्त्याच्या विद्वत्तेची, कल्पनाशक्तीची, सृष्टीसौंदर्याविषयीं नैसर्गिक विचक्षणतेची चांगली परीक्षा होत असते. बाणकवीच्या तोडीचे कितीसे कादम्बरीकार झाले याचा विचार केला ह्मणजे वर्णनविषयक ग्रंथ चांगले असे किती थोडे आपणांस सांपडतील याची अटकळ होईल. डोळ्यांनीं बघून हीं सर्व वस्तुमात्रांचें स्वरूप मनांत यथास्थित उतरतें असे गृहस्थ थोडे असतात तेव्हां पाहिलेल्या गोष्टी लोकांच्या डोळ्या समोर हुबेहुब उभ्या करण्यास किती कुशल ग्रंथकार किंवा चित्रकार पाहिजे हें सांगून समजण्यासारखें नाहीं. प्रस्तुत 'केसरी' पत्रांतून इंग्लंडच्या प्रवासाचें वर्णन येत असतें तें फार चांगलें व इत्थंभूत असतें ह्मणून वाचणाऱ्यांस चांगली गोडी लागते. हीच घटणी हिंदुस्थानांतील प्रसिद्ध प्रसिद्ध शहरासंबंधानें कोणी विद्वानानें उचलल्यास फार नामी होईल. अलिकडे उमरावतीच्या 'प्रमोद सिंधू' तून कांहीं थोडा नगर वर्णनासंबंधानें चांगला प्रयत्न चालला आहे. सारांश 'बडोद्याचें वर्णन' सारखीं पुस्तकें आह्मास पुष्कळ पाहिजे आहेत तेव्हां हें पुस्तक साधेल त्यांनीं अवश्य संग्रहीं ठेवावें. पुस्तकाची किंमत चार आणे आहे.

## रेलवेकडील नौकर लोकांची स्थिती व उतारू लोकांची गैरसोय.

(लिहून आलेला मजकूर)

आज आगगाडी सुरू होऊन बरींच वर्षें झालीं. आगगाडीमुळें लोकांचा जाण्या येण्याचा त्रास चुकला व जाणें येणें सुखावह व स्वल्प खर्चांत होऊं लागलें. याप्रमाणें सुख मिळूं लागलें ह्मणून रेलवेचे अंतः स्थितीकडे लोकांचें फार लक्ष गेलें नाहीं. पूर्वीं रेलवेचे नोकराची ही चंगळ असे. पूर्वीं नोकर लोकांना पगार ही आतांपेक्षां बरे असत व अन्य तऱ्हेनें ही त्यांची चंगळ असे. परंतु आतां दोन्ही गोष्टीनीं ओढल्या सारखें झालें आहे. दिवसानुदिवस उतारू लोकांचे हाल होताहेत. त्यांची दाद ही कोठें लागत नाहीं. उतारू लोक गरजाऊ असतात ह्मणून कसें तरी सोसून मुकाट्यानें बसतात पण तेणें करून कंपनी कसें ही असो—नौकर लोकांवर दाब ठेवून किंवा लोकांचे ह्मणण्याकडे लक्ष न देऊन आपला पगडा बसवीत चालली आहे पगार दिवसानुदिवस कमी होत चालले आहेत व काम तर दिवसानुदिवस वाढत चालले आहे लोकांना दाद लागत नाहीं ह्मणून स्वस्थ बसावें लागत आहे. अशी स्थिती आहे. ह्मणून लोकांनीं उचल करून आपली मागणी कंपनी पुढें ठेवावी व तसें न झालें तर सरकाराकडून कंपनीस होतील तितक्या गोष्टी करवावयास लावल्या पाहिजेत. सरकारानें रेलवे कंपन्याचे वर्तना संबंधीं सर्व प्रकारानें त्यांना विचारण्याचा हक्क ठेविला आहे. व जर रेलवे कंपन्या न ऐकतील तर लोकांस सरकारापर्यंत मजल पोहचविली पाहिजे. या संबंधानें पुण्यास भरलेल्या 'प्रोव्हिन्शिअल कानफरन्स' मध्यें एक ठराव झाला आहे. व त्यांत सरकारास कमिशन नेमून विचार करावा अशी सूचना करण्यांत आली आहे. या वेळीं रा. रा. खंडेराव वैद्य यांनीं तिसऱ्या वर्गाचे उतारूची कशी गैरसोय होते हें स्पष्ट रीतीनें सांगितलें. हे गृहस्थ आज १२ वर्षें रेलवेंत नोकरी करीत होते व त्यामुळें त्यांचें वर्णनांत कमजास्त असण्याचा संभव नव्हता.

आतां रेलवे मधील नोकरांचे संबंधानें—इतर गोष्टीमध्यें नेटिव व युरोपियन ह्यांचे मध्यें जो भेद दिसून येतो तो रेलवेमध्यें ही दिसून येतो. रेलवेंत तरुण युरोपिअन किंवा युरेशिअन लोकांस नोकऱ्यांची चंगळ. पगार जास्त व काम कमी. त्यांचें काम पुष्कळ वेळां नेटिव लोकांनां करावें लागतें व शिवाय रजेची वगैरे सवलत कारण वरिष्ठ अधिकारी बहुतेक युरोपियनच असावयाचे. युरोपियन लोकांना ज्या जागा मिळतात त्या बहुतेक पुष्कळ पगाराच्या असून त्या नेटिवांनां मुळींच मिळत नाहींत. उदाहरणार्थ पुष्कळ ठिकाणचे स्टेशन मास्तरांच्या जागेला व परमनंट वे इन्स्पेक्टरांच्या ही जागेला लायक असे पुष्कळ नेटिव्ह लोक असतात पण त्यांनां ह्या जागा मिळतच नाहींत. व पुष्कळ वेळां इन्चार्ज इतके शहाणे असतात कीं त्यांचें काम त्याचे हाता खालचे टाईम कीपरांस करावें लागतें. गोऱ्या लोकांनां जागा देण्या करितां पुष्कळ वेळां अनुभवशीर नेटिव्हांनां पाठी मागें ढकलतात. पगार जास्त होण्याची नेटिव्हांच्या संबंधानें मात्र पंचाईत अतिशय. सारावेळ जागून काढण्याचीं कामें मात्र नेटिव्हांचीं. उदाहरणार्थ तार बाबूंची किंवा लहान लहान स्टेशनांवरील रातपाळीचे स्टेशन मास्तरांची. नेटिव स्टेशन मास्तर फार फार चढतच नाहींत कारण तेणें करून साहेबाचे पोटावर पाय येतो. या आमच्या टप्प्यांत फार पगार ज्यांस आहे असे २।३ च नेटिव्ह स्टेशन मास्तर आहेत. व पगार ही १००।१२५ च्या आंत व ते ही फार दिवसांचे व मागील युगांतले आहेत म्हणून बचावले आहेत. पण युरोपिअन स्टेशन मास्तरांना मात्र भरपूर चापून पगार मिळतो व हाता खालीं नोकर असल्यामुळें त्यांनां अती त्रास ही पण पडत नाहीं. या वरून असें मात्र कोणी समजू नये कीं सर्वत्रच हा प्रकार आहे पण पुष्कळ ठिकाणीं आहे एवढें मात्र खरें.

दुसरी गोष्ट रेलवेकडील कामा संबंधानें. नुकताच गिरणींत किती काम घ्यावें या संबंधानें कायदा झाला आहे त्यांतील 'गिरणी' ह्या शब्दाचे व्याख्येंत रेलवे येत नाहींत कीं कायद्यांत गिरणी शब्दाचा अर्थ काम करणारे लोकांचे नियमित संख्या असणारी एखादी संस्था एवढींच आहे असें वाटतें. रेलवे कडील लोकांना १२।१२ तास व तें ही रात्रींच्या रात्रीं जागून करावें लागतें. त्या कामा संबंधानें त्याच्या हातीं शेकडोंच्या शेंकडो जीव असतात व अशा वेळीं त्यांनां फारच जपून काम करावें लागतें. परंतु असे महिनेच्या महिने काम करावें लागतें व म्हणून एखादे

वेळीं चुकी होण्याचा संभव असतो व अशी चुकी झाली म्हणजे त्यांना—मनुष्यें मरोत किंवा न मरोत—तुरुंगांत जाण्याची पाळी येते. पगार थोडा. सर्व रात्र जागरण या मुळें विगरे लौकरच मृत्यु मुखीं पण पुष्कळ जाऊन पडतात. रेलवे मध्यें कांहीं दिवस काम करणाऱ्यांस हें स्पष्ट कळेल. अजकाल अपघात व टकरा फार होतात याचें तरी कारण कंपनी लोकांपासून फार काम घेतें हेंच होय. कामाला लोक मिळतात मग ती कां कमी करील पण अशा ठिकाणीं लोकांनीं सरकारकडे दाद मागून ८ तासावर कोणी ही काम घेऊं नये—निदान त्यांना सांध्याचें किंवा तारेचें, किंवा अशाच प्रकारच्या नाजुक प्रकारचें ज्यांच्यावर पुष्कळ जिवांचें संरक्षण अवलंबून असतें असें काम करावयाचें असेल —त्यांनी ८ तासावर कामास लावूं नये हा ठराव मागून घ्यावा. या संबंधानें रेलवेला थोडासा पैसा संबंधानें खर्च बसेल, पण युरोपियनांच्या जागा नेटिव्हांनां दिल्या तर फारच बचत होईल. रेलवेंत पेन्शन वगैरे कांहीं मिळत नाहीं व ग्राच्युइटि वगैरे अगदीं थोडीच असते. लोकांना सुट्या बिलकूल मिळत नाहींत. ह्या प्रमाणें त्यांचे अगदीं अविश्रान्तश्रम असतात. व असें असून ही रजा मिळण्याचे नांवानें बहुतेक शून्य. नुकतीच हक्काची रजा पूर्वीं दहा दिवसांची होती ती २० दिवसांची झाली आहे पण ती मिळेल तेव्हां कारण वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं आपली खुषी दाखवून सोडलें तर ती रजा मिळणार. ह्यासाठीं जरूरीचें कामाला जाणाऱ्यांनां डाक्टराचें व ते ही कंपनीनें ठेवलेल्या डाक्टराचे हातावर दक्षणा ठेवून रजा मिळवावी लागते. या शिवाय दुसऱ्या पुष्कळ गोष्टी आहेत पण मुख्य मुख्य तेवढ्या दिल्या आहेत. यासंबंधानें रेलवेचे नोकरांनीं व लोकांनीं मनावर घेतलें पाहिजे. नुसतें लिहून कांहीं होणार नाहीं.

आतां उतारू लोकांचे संबंधानें बहुतेक त्रास तिसरे क्लासचे उतारूंचे कपाळीं येतो व याच वर्गांतून जाणारे पुष्कळ लोक असतात म्हणून यांचेच संबंधानें आपण पाहूं. रेलवे स्टेशनावर अल्या पासून तो उतरून घरीं जाई पर्यंत या वर्गांतून जाणाऱ्या उतारूंस त्रास पडतो. पहिल्या प्रथम तिकिट घेण्याचे संबंधानें तिकिटाचे द्वार फार वेळ उघडें असतें. त्या ठिकाणीं गर्दी होते. मोठ्या ठिकाणीं पुणें इ. तर कांहीं विचारवयासच नको. टिकीटाचे द्वार फारच लहान असतें. या संबंधान सुधारणा होणें अत्यावश्यकच आहे. दुसरी गोष्ट उतारूंनां कोंडून ठेवण्याची गाडी येई पर्यंत व ती आल्यावर ही कांहीं वेळ पर्यंत तिसरे वर्गाचे उतारु करितां जी जागा असते तिचे द्वार उघडीत नाहींत व मग तें एकदम उघडतात. हें द्वार बहुशा लहान असतें व लोक जाणार येणार फार असतात मग धेंगराधेंगरीचें व धक्काबुक्की ह्यास पारावारच नाहीं. यांतून बाया माणसें ही जावयाची असतात. त्यांचे जे हाल होतात ते पुसूंच नये. इतक्यांतून फाटकावर जर टिकिट पाहात असलें तर मग दुर्दशेची कमालच होते. पुण्या पासून तर थेट नागपुर जबलपुर पर्यंत हीच रीत. पुण्यास तर ४।५ द्वारें असूनच फक्त एकच उघडें असतें. याचें कारण विचारतो कोण. बडी धेंडें जाणार २ ऱ्या वर्गांतून. गरीबांच्या हालाकडे बघतो कोण. याचें कारण विचारतां कंपनीचा वट हुकूमच तसा आहे ह्मणून कळतें. व याचें मूळ प्लाटफार्मवर लोक आल्यानें गाडीखालीं सांपडावयाची भिती. पण अन्य रीतीनें व्यवस्था केली तर नाहीं कां चालणार? रेलवे पोलिसाचें काम काय? त्याच्या हातून ही व्यवस्था होण्यासारखी नाहीं काय? पूर्वी अशी बंदी नव्हती तेव्हां कितीसे अपघात झाले? आमचे लोकांनीं निमुटपणें सोसण्याचें व्रत खरोखरच सोडलें पाहिजे. व या गोष्टी संबंधानें तरी तावडतोब व्यवस्था करविली पाहिजे.

तिसरी गोष्ट. कंपनीचे नियम पाळले जात नाहींत. मनुष्य बसवण्याची त्यापेक्षां जास्त भरली जातात. तकरार ऐकली जात नाहीं. लघवीची सोय निदान बायकांचे डब्यातून तरी झाली पाहिजे. डिब्यांचे संबंधानें व इतर गोष्टींत पुष्कळच अंतर असतो व युरोपियन किंवा युरेशिअन लहानग्या पासून लोकांना बराच अपमान व त्रास सोसावा लागतो. उन्हाळ्यांत स्टेशनेच्या स्टेशनें पाणी मिळत नाहीं. या संबंधानें बडोदा रेलवेवर फार चांगली व्यवस्था आहे. त्या रेलवेवर प्रत्येक स्टेशनावर नळ आहेत. जी. आय. पी. वर सुद्धां मोठमोठ्या स्टेशनांवर नळ आहेत पण या ठिकाणीं नळ कोठें चालूस नाहींत व पुष्कळ ठिकाणीं गाडी फार थांबत नाहीं. व कांहीं ठिकाणीं तिसरे वर्गाचे दरवाजे लवकर उघडले जात नाहींत. टिकिटें तपासण्यासाठीं ही व्यवस्था असते पण त्यामुळें उतारू लोकांची फार गैरसोय होते या साठीं या व्यवस्थेंत फेरफार झालाच पाहिजे. जर युरोपियन लोकांचे खान्यासाठीं दोनदां तिनदां २०।२०।३० मिनिट वेळ दिला जातो तर नेटव्हांचे नव्हे व मनुष्याचे सोईकडे तिळमात्र बघुं नये कां? या शिवाय उतारूंस स्टेशनचे लोकांपासून बराच त्रास पोहोंचतो. त्यावर कंपनीची असावी तशी देखरेख नसते नोकर लोक उतारूंशीं पुष्कळ वेळां उर्मटपणानें वागतात व त्यांना हवें तसें वापतात. आपली दाद लावण्यास काय करावें हें पुष्कळांस ठाऊक नसल्यामुळें व ठाऊक असलें तरी त्रास करून घेण्याचा कंटाळा असल्यामुळें अशल्या गोष्टी उजेडांत येत नाहींत. पण एकदां एखाद्या खमक्यापाशीं गांठ पडली ह्मणजे मात्र यांचे पांगवर धारण बसते. यापैकीं कांहीं गोष्टींत सुधारणा करून घेणें हें लोकांचे हातीं आहे. पुष्कळ वेळां अन्यायाचे वर्तना संबंधानें त्यानीं डोळे झांक करतां कामा नये. व त्या संबंधानें त्यांचे हातून होईल तितका प्रत्येकानें उपाय केला पाहिजे. कंपनीचे वरिष्ट अधिकाऱ्याकडे अर्जदारांस अशा गोष्टी कळविल्या पाहिजेत व असें करून कांहीं झालें नाहीं तर सरकारकडे गाऱ्हाणें नेण्यास बरेंच चांगलें होईल. व कंपनी जर तें ऐकेल तर सर्व अर्ज व कागदपत्रां वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध कराव्या व त्या सर्व एके ठिकाणीं करून सरकारकडे पाठवाव्या.

दुसरी गोष्ट. रेलवेमध्यें अशाच प्रकारचे कामाला इतर लोक साहाय्य करित नाहींत. हें फार वईट आहे. हाच प्रसंग कचित् एक दोन दिवसांनीं आपणावर ही येईल. हा विचार प्रत्येकानें करावा ह्मणून कायावाचामनें करून अशा वेळीं मदत करावी. गाडी आल्यावर लोकांना न सोडण्या संबंधानें व अव्यवस्थेचे संबंधानें लोकांनीं अर्ज वगैरे करण्याची तजवीज करावी. ह्या गोष्टी पहून सहृदय मनुष्याला वीट व राग आल्या वाचून राहणार नाहीं. पण इलाज काय? हातीं काय राहिलें आहे. असें आहे तरी, आहे तेवढ्यांत होईल तें करून पाहण्याचा इच्छा कोणीही सोडूं नये. 'यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः' या वाक्यावर दृष्टी ठेऊन होईल तितके यत्न करण्यास मागें पुढें बघूं नये.

या गोष्टी विषयीं एखाद्या दुकानांत किंवा चार चौघांत सपाटून चर्चा होते पण त्या पासून कांहींच निष्पन्न होत नाहीं ह्मणून पत्रांत एके ठिकाणीं येऊन पुष्कळांचें लक्षांत वस्तु स्थिती यावी ह्मणून हें लिहिलें आहे. वस्तु स्थिती खरी किंवा खोटी याविषयीं कोणास शहानिशा करून घ्यावयाची असेल तर त्यांस फार लांब जाणें नको. एक दोन वेळ गाडींतून जाणें येणें बस होणार आहे. पण या वेळीं प्रत्येकानें—जर त्याचे कोणच्या ही रीतीनें कांहीं वजन असेल तर—आपली गोष्ट घेऊन चालतां कामा नये. कारण त्याला यापैकीं कांहीं गोष्टींचा अनुभव घेण्यास संधीच येणार नाहीं. यापासून काय होतें तें पहावें. आमचे लोक जागे होऊन कर्तव्य कर्मास लागतील तर लिहिण्याचें कांहीं तरी सार्थक.

सरकार दरबारांत आपली दाद लागण्यास फार कालावधि लागेल तेव्हां त्या पूर्वीं आपल्या हातून होण्यासारख्या गोष्टी तरी निदान आपण केल्या पाहिजेत. परराज्य असल्या मुळें आमच्या लोकांचा निराळेपणा म्हणून कांहीं नाहीं. नेटीव लोकांचें सर्वस्व नाहींसें होण्याचा काळ समीप येत चालला आहे उदाहरणार्थ, देशी वैद्यकी पहा. आपल्या शाळांतून देशी वैद्यकग्रंथ पढण्यास कोणता ही मार्ग राहिला नाहीं. इंग्रजी वैद्यशास्त्रानिमित्त परीक्षा विश्वविद्यालयांतून होत असतात, स्वतंत्र पाठशाला आहेत, आणि त्यांत प्रवेश करण्याची लायकी येण्यास ही कांहीं परीक्षा उतरावी लागते. अशा शिकलेल्या इंग्रजी वैद्या शिवाय इतरांची सरकारांत विचारपूस नाहीं व त्यास नोकरीचाकरी मिळावयाची नाहीं. इंग्रजी वैद्यक शिकण्याचे सर्व मार्ग खुले असून सहस्त्रावधि सोयी आहेत व सरकारांत इंग्रजी पद्धतीनें शिकलेल्या लोकांचीच नीट संभावना होत असते. दुसऱ्या पक्षीं, अद्याप पर्यंत कांहीं कांहीं वृद्धगृहस्थ देशी वैद्यकविषयांत पारंगत आहेत परंतु ते फार मोजके आहेत आणि ते कालचक्राच्या फेऱ्यांत हरपले म्हणजे आपल्या वैद्यकग्रंथांवरील धूळ झाडण्यासारखे ही कोणी गृहस्थ भेटणार नाहींत. विद्यार्थिजनाला अशा विद्वान् गुरूपाशीं शिकण्याला उत्तेजन मिळत नाहीं कां कीं पूर्वींचा गुरुगृहीं राहून विद्याभ्यास करण्याचा मनु पालटला आहे. फी सारखी गुरुदक्षिणा म्हणून स्वल्प रकम स्वीकारून शिष्यमंडळी तयार करण्याची उठाठेव करण्यास कोण विद्वान वैद्य उद्युक्त होतो? यावन्मरण त्यांस पैशाची अडचण पडत नाहीं. तेव्हां फीची जरूरी नसते शिवाय आपले शिष्य म्हणून गणावण्या सारखीं हुषार मुलें कोठें मिळतात? बहुतेक चोहींकडून अडचणीच येतात नेटिव संस्थानांतून उत्तम वैद्य व हकीम आढळतात व इतर ठिकाणीं त्यांची कोठें वस्ती ही नसतें याचें कारण राजाश्रय हें होय तो असल्या वाचून कोणत्या ही विद्येस तेज येत नाहीं सरांश, देशी वैद्यशास्त्र असून नसून सारखें होत चाललें आहे, त्यांत सुधारणा होत नाहींत, व शस्त्र क्रियेसारख्या अर्वाचीन कलांचा त्यांत प्रवेश ही होण्यास मार्ग दिसत नाहीं.

देशी वैद्यकाविषयीं अशी अनास्था झाल्या कारणानें सामान्य लोकाकडून ही त्या विद्येची अवहेलना दुसरी कडून होत असल्याचें दृष्टीस पडतें. देशी वैद्यक शिकण्याचे एक दोन तपें ज्यांचीं झालीं आहेत असे फार करून लोक आढळत नाहींत. व्यसंग अगदीं थोडा होतो म्हणून त्याची पूर्ण माहिती होत नाहीं, आणि शास्त्रोक्त पठण न झाल्या मुळें कारकामाचे असे वैद्य तयार होतात तेव्हां लोकांना त्यांवर विश्वास ठेऊन औषधपाणी घेणें निर्धास्त वाटत नसतें आणि म्हणून इंग्रजी डाक्तराचा अनुपान असून त्याच्या हातून मरण आलें तरी पुरवलें असें म्हणणारे गृहस्थ कांहीं कांहीं नजरेस पडतात शिवाय इंग्रजी औषधांचा उपयोग फैलावत गेल्यानें आपल्या संपत्तीस ही एक आंतून परद्वीपांत वाहणारा निराळा ओघ लागला आहे.

ज्या प्रमाणें दोन देशाच्या मनुष्यांस आपले विचार सांगण्यास दुभाषा मिळाला ह्मणजे सर्व व्यवहार चालूं लागतात त्याप्रमाणें इंग्रजी विद्येच्या प्रसारानें आमच्या देशांत वैद्यकासंबंधानें जरे दुभाषे विद्वान लोक मिळाल्यानें इंग्रजी वैद्यकाची देशी शास्त्रांत आणखी भर पडेल आणि या दुभाषांची गरज इंग्रज लोकांस नसल्यामुळें त्यांचें काम सुलभ होण्यासारखें आहे. आमचे असें ह्मणणें कीं देशी भाषांतून इंग्रजी वैद्यक शिकण्याच्या सोयी नसल्यामुळें आयुष्यातील पुष्कळ भाग सर्व डाक्टर होऊं इच्छिणार. विद्यार्थीमंडळीस इंग्रजी भाषा शिकविण्यांत घालवावा लागतो आणि दिवसें दिवस या शिकण्याची इयत्ता फार वाढवीत आहेत त्यामुळें विनाकारण मोठी हानि आयुष्याची होत आहे. तेव्हां तेस्मद्बुद्धि, विद्वान, व इंग्रजी वैद्यकांत निष्णांत असे गृहस्थ प्रोफेसर निवडल्यानें इंग्रजी वैद्यकाचा देशीभाषांत अभ्यास होऊन देशी वैद्यक ही त्या त्या पाठशाळांतून सुरू करावें. आज जो पैसा ह्या शिक्षणानिमित्त खर्च होत चालला आहे त्याची नीट व्यवस्था केली व निरनिराळे ग्रंथ देशीभाषांतून एक पण्डित सभा स्थापून तयार करविले व ते शिकण्याच्या नवीन सोयी दुहशी लोक नेमून काढल्या तर कार्यभाग होण्या सारखा आहे परंतु यांत सरकार मार्फत कांहीं प्रयत्न होण्याची आशा नाहीं व असा कांहीं प्रयत्न झाला नाहीं तर कांहीं सूज्ञ गृहस्थांच्या अनुमानाप्रमाणें सर्व देशी वैद्यक अल्पकाळांत लयास जाईल.

नेटिव वैद्यकांस उत्तेजन देण्यासाठीं आमची एक स्वल्प सूचना अशी आहे कीं, कांहीं गांवचे धर्मार्थ दवाखाने ह्मणजे ज्या ज्या ठिकाणीं सिव्हिल इसपितळ व इंग्रजी डाक्टरांचे दवाखाने आहेत अशा शहरांतील धर्मार्थ दवाखाने नेटिव वैद्याच्या ताब्यांत देऊन त्यापासून काय निष्पन्न होतें तें पहावें. हा वैद्य नेमावयाचा तो चांगला पढलेला, समंजस, सद्वर्तनी असा निवडून नेमिला जावा. त्यांस सरकारांतून पगार मिळून इतर हास्पिटल असिस्टंट प्रमाणें त्यांचे अधिकार व जबाबदारी समजली जावी. धर्मार्थ दवाखान्याविषयीं ही सूचना करण्याचे प्रयोजन असें कीं, त्या दवाखान्याच्या खर्चाचा मोठा भाग मुन-

सिपालिटीस उडवावा लागतो तेव्हां अशी सूचना अंमलांत आणण्याचे मुनसिपालिट्यांच्या हातांत असतें कां कीं ज्याचा पैसा ती चांगली गोष्ट नियमाबरहुकूम करण्यास स्वतंत्र असतो हैं सूचना अगदीं नवी आहे व यांत मुनसिपालिटीच्या हक्काचा ही प्रश्न आहे तेव्हां प्रस्तुत यासंबधानें विशष लिहित बसण्याचा फायदा नाहीं.

---

पुण्याचे वकील रा. रा. गंगाराम भाऊ मस्के यांजवर एका बोहृन्याच्या भावजयीशीं व्यभिचाराचा प्रयत्न करण्या संबंधानें आरोप आला होता परंतु चौकशी अंतीं राजश्री मजकूर दोषमुक्त ठरले असें कळलें. उभय पक्षीं साक्षी पुरावे पुष्कळ झाले, बडे बडे वकील होते, व गंगाराम भाऊ सारख्या संभावित मानलेल्या गृहस्थावरील खटल्यांत लोकांचें लक्ष फार ओढवलें होतें तेव्हां लवकर निर्णय लागला ही गोष्ट नीट झाली तरी घडलेल्या हकीकती वरून लोकांच्या न्याय समजुती प्रमाणें व मना जोगता निकाल लागला नाहीं व दोही ही पुढें अपील करणार आहे असें कळतें. प्रसिद्ध सभ्य गृहस्थावर असले अमंगळ आरोप आले ही गोष्ट अगोदर त्या गृहस्थाच्या नांवास कमीपणा आणणारी आहे मग दोषी ठरून निराळा काळिमा येण्या पूर्वीच लोकांचा अभिप्राय अशा मनुष्या विषयीं भलता बनून ठाम होत असतो. आणि प्रस्तुत प्रकरणीं साक्षी पुरव्याच्या योग्य निवाड्या विषयीं चांगल्या चांगल्या लोकांच्या विचारांत भिन्नमत दिसून येतें हें तशा भलत्या अभिप्रायास अधिक कारणीभूत होईल.

व्यभिचाराचे खटले मोठ मोठ्या गृहस्था विषयीं अनेक वेळां कोडतांतून चालतांना दृष्टीस पडतात, व्यभिचाराचे गुप्त प्रकार उघडकीस आल्यानें समाजांत त्या व्यभिचारी स्त्री पुरुषा विषयीं वाईट गोष्टी घाटत असतात, व्यभिचाराची भूमिका नजिकच्या आप्त मित्रांमधील असल्या कारणानें कांहीं जण अपल्या माणसांनाही ओंढवतात आणि या तिन्ही प्रकारांत त्या अधम मनुष्यांनी सद्विवेकाला तिलांजली दिली असते. नर स्त्रीला वाईट मार्गी प्रवृत्त करितात त्या प्रमाणें स्त्रिया नराला कामज्वरांत परद्वारा वेदनाचा धडा घालून देतात असा प्रकार विरळा घडतो म्हणून बहुत बहुत तऱ्हेनें आमचा पुरुषाच्या दुर्वर्तना संबंधानें विशेष कटाक्ष आहे. ज्या संभोगाच्या वासनेनें मनुष्य प्राणी इतका विचारशून्य होतो त्या संभोगाचें यथार्थ वर्णन आम्हीं शुकेश्वराच्या सर्वमान्य 'शुकरंभा संवादां'तून सादर करितो त्याचा कामान्ध लोकांनीं अवश्य विचार करावा:—

॥ वृश्चिक नांगी वरी मधुबिंदु ॥ देखोनी धांवे बुद्धि मंदु ॥ चाखों जातां खेदु ॥ ओंग आला अपार॥

॥ नातरी खडगाचिये धारे॥ चाखर माखिली ते पामरें॥ चाखोंजातां जिव्हा चिरे॥ पुढत केडते कळेना॥

॥ शिवणी मार्जा योनिस्थाना॥ येथें बिंदुंचें आगमन॥ होतां कंडू उद्भव गहन॥ मैथुनानंद ज्या म्हणती॥

॥ योनी बिंदूची भेटी॥ परतां देहीं अल्हाद उठी॥ ते दोन्ही स्त्री पुरुषा निकटीं ॥ बुजती पोटीं कळावि ॥

॥ म्हणूनि तिळतुल्य सुखाचिये चाडे ॥ पुढत नासे मेरू एवढें ॥ जाणांनि स्त्रीदेह दृषपांडें॥ नात ठती सज्ञान ॥

---

# The Berar Samachar

**MONDAY, JUNE 15, 1891**

The Governor General of India is the ruler of about one fifth of the whole human race. An Indian Prince is but as dust under his feet. The Maharaja of Kashmir was in no time reduced to the rank of a simple man. He was said to be worse than useless. And a man is but an animal, and as such he was granted his right of existence unincumbered from all the dignities of a royal person. The state of Cambay saw the probationary dethronement of its ruler because the ryots rebelled against a new system of revenue administration. The Burmese King was transported on account of the reasons of state enunciated by the Earl of Ava. So history abounds with similar instances. In the face of these facts we can hardly assure ourselves with a little hope of the preservation of the Manipur state in its entirity.

Manipur is a Hindu state and we are evidently interested in its concerns. It is notorious that internal dissensions and enmities led to the downfal of that state. The Maharaja the proper claimant to the throne is in exile. The Jubraj and the Senapati are under trial for the recent disturbance and the consequent massacre of the English officers. The military court that is appointed to decide the Manipur princes savours more of a farce than of the reality of a properly instituted judicial tribune. The Jubraj and the Senapati, however ungenerous in their behaviour towards their elder brother, were driven to the last resource of a desperate fight in self-defence when the proceedings of the Durbar which the late lamented Commissioner Mr. Quinton held were observed to be of a suspicious nature and eventually resulted in the deplorable tragedy that followed. To the sacred memory of the English officers that were killed the spleen of revenge is yet to be satisfied with the capital punishment of the ring leaders. No claim of humanity will weigh with the victorious officers in the Military service. The executioner of the state is executed because he sent to heaven Mr. Quinton under the orders of his Raja. We may question which mode of policy lays down the disobedience of the royal mandate. It is a matter of question whether a superior officer will tolerate insubordination from his inferiors on account of his unwise commands. The principle of discipline says one thing while the rule of civilization in the event of a war requires exemplary punishment of the followers of that discipline on the opposite side. In the mad fury of revenge the idols of the God Krishna even were bombarded when victory was crowned with the entry of the British army. In short, the two native princes are nicely calculating the chances of life, the Maharaja is trembling in the balance of permanent exile or the renewed installation on the throne and the Manipur state is on the brink of annexation to the British empire.

With the British Government might is right. But it is ever anxious to reconcile this right with the principle of justice. The papers that are selected to be published in regard to the Manipur affair evidently show this anxiety but the inconsistencies coupled with the want of a connected correspondence in this collection of papers strike even an ordinary reader with the eminent skill of the compiler in marshalling facts so as to make them appear just and sound. Thus this Government correspondence is carefully edited and in this new form it will be laid on the table of the Parliament. From the perusal of these records we are greatly impressed with a new idea. The India Government seems to favour the cause of the Maharaja on pilgrimage. The late Mr. Quinton was for the acquiescence in the circumstances of the Manipur state and for the consequent maintenance of the Jubraj who was king *defacto*. The late Mr. Grimwood the Resident ever pleaded the enthronement of the Senapati who was said to humour the freaks and whims of the Resident in a course that transgressed even the lines of modesty and good conduct. These facts are clear indices to the numerous mistakes that have marred the policy of the Government towards this little state. We shall be really pleased if the Government will atone for its faults by allowing Manipur the full franchises and privileges of a native state. We are threatened with its annexation for it is held to be a prize of the war. Besides the country is attractive as it abounds in game, the climate is good and the valley is unexplored. Colonel John Stone and Sir Richard Temple are against annexation. They see no good to result to the Government from the annexation. Their argument is based on the premises of a worldly wise man. We shall close our prayer to the Government for the non-annexation of the Manipur state with the general observation of the late Mr. John Bright the first M. P. for India:—

"No policy can be more lunatic than the policy of annexation we have pursued of late years in India, and the calamity we are now meeting is the natural and inevitable consequence of the folly we have committed. It is not easy for great generals and statesmen who have been made earls and marquesses and & bronze statues put up in their honour in our public squares —it is not easy for the statesmen who have done all this to turn round and reverse it all; they have not the moral courage to do it; it might be an act of peril; it might appear a descent from the summit of empire and be wrongly construed throughout the world. But as a question of finance and good Government we should, a few years hence, admit that it was a sound policy."

---

The following is a statement of the chief inferences respecting the probable character of the monsoon rains of the present year drawn from the *known* antecedent conditions:

(1) Snowfall conditions on the Western Himalayas and Afghan mountains (and probably over a large portion of Central Asia) & the pressure conditions in India are very unfavourable to the establishment of a strong and early monsoon on the Bombay Coast. It is very probable that the monsoon will not be established in full strength on the Bombay Coast before the third or fourth week in June, and it is probable that it will be below its average strength, and may be withdrawn from Upper India earlier than usual in September.

(2) The snowfall conditions in the Eastern Himalayas and the pressure conditions in North-Eastern India and Burma are favourtble to the advance of a moderately strong or strong monsoon in the Bay of Bengal earlier than usual, and to its establishment in Burma and Bengal before or about its normal period.

(3) Pressure and other conditions are very favourable in Burma and North-Eastern India (Bengal and Assam), and it is probable that these Provinces will obtain normal or abundant rain (more or less in excess of the normal).

(4) Conditions are slightly less favourable in Behar and the eastern districts of the North-West Provinces, but it is probable they will obtain about their normal rainfall. The local depression in the North-West Provinces may, if it intensifies (which, however, does not appear, so far as can be judged from the other conditions, to be probable), determine heavy local rain to the central and eastern districts of the North-West Provinces.

(5) Pressure and other conditions are very unfavourable for Rajputana, and also to a somewhat less extent in Guzerat, the southern districts of the Punjab, and the western districts of the North-West Provinces. It is probable the rainfall will be more or less deficient over the whole of that area, and possible that the deficiency may be large and serious. If the Bombay current be strong (in consequence of at present unknown conditions in the Arabian Sea area), these provinces may receive moderate rain throughout the monsoon. In the East Punjab raintall will probably be normal or slightly deficient, but may be unfavourably distributed in time, commencing late and terminating early.

(6) Conditions are partly favourable and partly unfavourable in North Bombay and Berar, and the amount of the rainfall in these areas will depend chiefly on the strength of the Bombay current as determined by conditions in the Arabian Sea. The rainfall is on the whole more likely to be slightly deficient than to be up to its normal amount.

(7) Taking into consideration the probable position of the trough of low pressure and the other known conditions, the rainfall in the Central Provinces will probably be fairly normal in character, any tendency to excess being most probable in the eastern districts.

(8) In Southern India the pressure conditions are favourable for heavy rain on the Malabar Coast. There may pro-probably be some slight delay in the establishment of the monsoon on that coast, but the Malabar district and Southern India generally are likely to receive favourable rain during the monsoon.

It should be noted, as was the case last year, that one of the important factors, namely, the pressure conditions in the Arabian Sea, is again of unusual importance, and hence that the inferences stated above, more especially so far as they relate to North-Western India, are uncertain to that extent, and that this element of doubt should be carefully kept in view in judging the probabilities.

It will thus be seen that the conditions are most unfavourable for Rajputana and the districts adjacent to it, including Guzerat, South Punjab, the western districts of the North-West Provinces, and some portions of Central India. The chances that the rains in that area will be more or less deficient are at least 5 to 1, and the chances that they will be largely deficient, at least 3 to 1.

G of I.

---

## वऱ्हाड.

लोणारचे शेटबुद्दल काळुराव व आणखी चौवेजण मिळून रात्रीच्या पहिले प्रहरीं अमडापुरास जाण्यासाठीं खामगांवाहून तीन चार मैल येत आहेत इतक्यांत आठ चोरांनीं त्यांस गांठिलें. प्राण जातो कीं राहतो अशी अवस्था होईपावेतों त्यांस मारिलें आणि चार पांच हजारपर्यंतचा विषय लांबविला हा डाका फार भयंकर रीतीनें पडला म्हणून पोलीस अधिकाऱ्यांनीं कडकडीत चौकशी चालविली आहे.

येत्या गुरुवार पासून अकोलें मुक्कामीं सेशन कचेरी भरणार आहे असें कळतें.

सर डेनिस फिट्झपॅट्रिक महाबळेश्वराहून हैदराबादेस गेल्या वृद्दाचे तारखेस दाखल झाले.

'ज्ञान प्रकाशा' वरून कळतें कीं रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी यांनीं सातारा मुक्कामीं 'पूर्वींचा आर्यधर्म हल्लींच्या स्थितींत पाळता येईल कीं नाहीं' या विषयावर सुरस व्याख्यान दिलें.

---

## वर्तमानसार.

इंडियन डेली न्यूज नांवाच्या वर्तमान पत्रांत असें प्रसिद्ध झालें आहे कीं, कलकत्त्यास मुसलमान लोक युरोपियन लोकांच्या नामर्कांची इज्जत घेऊं लागले आहेत. अशा रितीनें अती नीच उद्योग करणाऱ्या लोकांस पायापासून डोक्यापर्यंत फोडून काढावें. हें खरोखर न्याय आहे पण तसा प्रकार न होण्यास काय उपाय करतां पाहिजे? या युरोपियनाचा चाकर, स्वयंपाक्या, घोडेवाला, न्हाव्या, गाडीवाला व बैलेवार सत्पुरुष करणारा असा मुसलमानच असणार! आपल्या युरोपियन धन्याचें लोढणें तो उचलेंही पहात! नवऱ्या नायकोंत भांडण झाल्यास सोडविण्यास मुसलमान, तेव्हां असे मुसलमान आपल्या धन्याची किंमत ओळखून असतील यांत नवल काय? आज युरोपियन लोक ज्या उध्दल्याप्रमाणें राहिले आहेत ते जर कायमचे रहातील तर मात्र असले प्रकार व्हावयाचे नाहींत. एकंदरीनें ज्यावेळीं युरोपियन लोक नेटिव लोकांत चांगल्या रितीनें वागूं लागतील त्याच वेळीं हा प्रकार बंद होईल पण हें व्हावें कसें?

विलायतच्या व्याजाचा दर एक टक्क्यानें कमी झाला आहे ह्मणजे हल्लीं चार टक्के आहे.

येत्या विलायतच्या तारखेस पुण्यास गव्हरनर साहेब धूमधामीचा समारंभ करणार आहेत.

एडिसन नांवाच्या एका शोधकानें चिकागो येथील येत्या वर्षाच्या प्रदर्शनासाठीं एक गमतीचें यंत्र तयार केलें आहे या यंत्राच्या योगानें कोणीही एका मनुष्यास आपल्या दिवाणखान्यांत बसून एक किंवा दोन मैलांवर चालू असलेल्या नाटकांतील गाणें ऐकूं येतें इतकेंच नाहीं तर त्या नाटकांत चालू असलेले देखावे नाटकपात्रांचे वेष आणि मुद्रा त्यांच्या समोर ठेविलेल्या पडद्यावर दिसूं लागतात. एवढें यंत्र नवल असल्यावर नाटक शाळेंत नाटक पहाण्यास जाण्याची जरूर नाहीं!

प्रसिद्ध एडिसन यांनीं नुकतीच एक मेजवानी दिली. त्या मेजवानींत वीज आणि फोनोग्राफ यांच्या साह्यानें फारच गंमत केली होती. जवळच बेंजामिन फ्रांक्लिन याचा पुतळा होता, आणि त्याच्या तोंडातून बेंजामिन फ्रांक्लिनचीं निवडक वाक्यें बाहेर पडत होती, आणि सगळें अन्न विजेच्या योगानें शिजविलें होतें.

काबूल येथून तीन पलटणी तुर्कस्थानाकडे पाठविण्यांत आल्या आहेत.

लाहोरच्या सिव्हिल आणि मिलिटरी ग्याझेटांत पुढील गमतीचा खटला प्रसिद्ध झाला आहे. गेल्या नवंबर महिन्यांत पतबुद्दी चरण बानरजी नांवाच्या मनुष्यास अलाहाबाद येथें वारंट वरून पकडलें. सदरहू वारंट पिंडीच्या माजिस्ट्रेटनें कमिसरियेट कामदाराच्या फिर्यादीवरून काढलें होतें. ज्या वेळीं सदरहू इसमास कोर्टापुढें आणलें त्या वेळीं मी ह्मणतो तो हा मनुष्य नव्हे, तो तुळशीराम होय व त्यानेंच मनिआरडरीवर खोटी सही केली असें फिर्यादीच्या शिपायानें सांगितलें पण गंमत अशी झाली कीं, माजिस्ट्रेटनें त्या तुळशीरामास सोडून दिलें व परवांस हेडा कमिट केलें पुढें तो गरीब परवानी सेशनांत सुटला हें सांगावयास नकोच. सदरहू मनुष्य पूर्ण निरपराधी असतां कमिसरियेट कामदारानें त्याच्यावर फिर्याद केली व माजिस्ट्रेटनें खुशाल सेशन कमिट खटला केला आतां तो मनुष्य जरी निरपराधी ठरला आहे तरी तसें ठरवून घेण्यास त्यास किती खर्च आला असेल बरें. दोघा मूर्ख कामदारांच्या योगानें गरीब बिचारा एक नेटिव अन्नाला मोताद कीं हो झाला.

यंदाच्या पावसाळ्यासंबंधानें कलकत्त्याच्या वायुचक्रशास्त्र खात्याकडून पुढील पंध्रवाड्याचा खात्रीं लिहिल्या प्रमाणें अंदाज केला आहे:—

१ यंदाचें वर्ष १८६८ आणि १८८५ या सालांप्रमाणें आहे. रजपुताना, गुजराथ, पंजाबचा दक्षिण भाग, वायव्य प्रांताचे पश्चिमेकडील जिल्हे ह्या ठिकाणीं पाऊस कमी पडेल आणि त्यामुळें भयंकर स्थिति येईल.

२ बंगाल आणि ब्रह्मदेश या ठिकाणीं लौकर पावसाळा सुरू होईल व पाऊस ही बराच पडेल.

३ वायव्यप्रांत आणि बहार या ठिकाणीं थोडा कमी पाऊस पडेल पण त्यापासून विशेष नुकसान होणार नाहीं.

४ दक्षिण हिंदुस्थानांत पाऊस चांगला पडेल.

५ मुंबईच्या उत्तरेस कांहीं ठिकाणीं पाऊस चांगला पडेल. कांहीं ठिकाणीं पडणार नाहीं ह्मणजे एकंदरीनें पावसाची ओढच होईल.

६ मध्यप्रांतांत साधारण पाऊस पडेल.

७ मलबार किनाऱ्यावर पावसाळा लौकर सुरू होईल.

८ मुंबईच्या किनाऱ्यावर जूनच्या तिसऱ्या किंवा चौथ्या आठवड्यांत पूर्ण पावसाळा सुरू होईल पण तो नेहमी प्रमाणें जोराचा नसेल.

लष्करी मेडिकल विद्यार्थ्यांस ग्रांट मेडिकल कालेजांत जावयाचें असल्यास त्यास सरकारांतून 'राहण्यास जागा, कपडे, बूट, व इतर सामान' पुरविण्यांत येईल व शिवाय २६ रुपये ४ आणे पगार ह्मणून देण्यांत येईल असें सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झाल्यावरून तशा प्रकारचे कित्येक विद्यार्थी त्या कालेजांत गेले. पण पुढें अशी गंमत झाली कीं, पगार देते वेळीं २० रुपये जेवणाचा वगैरे खर्च ह्मणून काढून घेऊन ६-४ रुपये हातावर ठेवले. असें कां असा प्रश्न झाल्यावरून 'ग्याझेटांत छापतेवेळीं चूक झाली आहे' असा जबाब मिळाला. सदरहू चुकीचें ग्याझेट प्रसिद्ध होऊन बरेच दिवस झाले असूनही ती चूक दुरुस्ती झाली नाहीं. ही मारवाडी चूक चांगली खरीच. जरी चूक झाली असें मानलें तरी त्यांचे पायाश्रित गरीब विद्यार्थ्यांवर लादण्यापेक्षां धनाढ्य असा सरकारनें आपली अब्रू राखण्यासाठीं त्या विद्यार्थ्यांस भरपाई पगार देणें जरूरीचें आहे. पण ज्या ठिकाणीं सर्व प्रकारें मारवाडी कारभार चालू आहे त्या ठिकाणीं खरी राजनीति कोण ओळखील. सरकारनें चूक चूक झाली ह्मणून लपंडाव करण्यापेक्षां विद्यार्थ्यांस दोन पैसे देणें वाजवी होईल.

कल्याणास पुढील चमत्कारिक हकीकत घडून आल्याची बातमी आली आहे. कोणी एक कुणब्याची बाई तेथील एका तळ्यावर नेहमीं भांडीं घाशीत असे. कांहीं दिवसांपूर्वीं तिच्या स्वप्नांत विष्णु येऊन तीस सांगू लागला कीं, तूं ज्या ठिकाणीं भांडीं घासतेस त्याच ठिकाणीं माझी मूर्ति आहे, ती तूं काढ व तिच्या खालीं द्रव्य आहे तें काढून माझें देऊळ बांध. या स्वप्नांतील गोष्टीवर त्या बाईनें कानाडोळाच केला. पण एके दिवशीं तो देव तिच्या दुपारीच स्वप्नांत आला व ह्मणूं लागला कीं, 'ऊठ, आतां मला वर काढ' हें ऐकून ती बाई तेथें गेली व उकरण्यास लागली तो त्या मूर्तीचा मुगुट दिसूं लागला नंतर ती जागा बरीच खोल खणल्या नंतर साधारण एक पुरुष उंचीची मूर्ति हातांत शंख चक्र गदा पद्म घेऊन उभी आहे व बाजूस दोन बायका आहेत अशी निघाली. मूर्तीचें ध्यान फार सुरेख आहे. त्या मूर्तीखालीं द्रव्य सांपडलें असें समजल्यावरून आमच्या सरकारचे काळे दूत तेथें आले व त्यांनीं त्या बाईस दूर उभी करून ज्यास्त खणण्यास प्रारंभ केला तों पुढें द्रव्य न सांपडतां कोळसे सांपडले. कोळसे सांपडेपर्यंत ह्मणजे सुमारें ३॥ पुरुष खणीं पर्यंत पाण्याचा लवलेश ही नव्हता पण ती मूर्ती काढल्या नंतर आतां तेथें बरेंच पाणी झालें आहे! हा काय चमत्कार आहे! ठा०

भयंकर दंगा— मद्रास इलाख्यांतील विजागापट्टण जिल्ह्यांत कृष्णादेवी पेठ्यांत गेल्या आठवड्यांत मोठा दंगा झाला. तेथल्या पोलीस स्टेशनावर हल्ला करून तें लुटून जमीनदोस्त केलें. तीन पोलिस मारले गेले. त्या ठिकाणाजवळ डोंगरी प्रदेश आहे त्यावर रहाणाऱ्या गडाबस किंवा सारास नांवाच्या डोंगरी जातीचें व पोलीसचें बरें नव्हतें हें या दंग्याचें कारण असावें असें कळतें.

लष्करी लोकांत दंगा— बेळगांव येथें असलेल्या लिंकनशायर व रायलऐरिश फ्युजिलियर्स या दोन पलटणीमध्यें गेल्या रविवारीं रात्रीं दंगा होऊन लिंकनशायर पलटणी पैकीं एक सोजीर ठार मारला गेला, व सहा जण अतिशय जखमी होऊन इस्पितळांत औषध पाणी घेत पडले आहेत.

दिव्याच्या तेलांत एक चमचाभर मीठ टाकलें असतां दिव्याचा प्रकाश ज्यास्त चांगला पडतो असें ह्मणतात.

टोळांनीं अवघ्या पंजाब इलाख्यांत अनर्थ करून सोडला आहे आणि आतांतर त्या इलाख्यांत त्यांनीं अंडीं घातलीं असून तीं फुटून जुलै महिन्यांत नवीन पीक तयार होतील असें तिकडील पत्रां वरून समजतें. एक टोळ एका खेपेस १०० अंडीं घालतो असें ह्मणतात या वरून पुढील वेळीं हे नवे जुने टोळ इलाख्यांत लक्षावधिपट ज्यास्त नासाडी करणार असा सुमार दिसतो.

रेलवेकंपन्यांची जबर किफायत— हल्लीं युरोपांत गहूं फार महाग झाला आहे त्यामुळें हिंदुस्थानांतून युरोपास अतोनात गहूं जात आहे त्यामुळें रेलव्या कंपन्यांचें उखळ पांढरें झालें आहे. सन १८९० च्या एप्रिल पेक्षां १८९१च्या एप्रिल महिन्यांत ईस्ट इंडियन रेलवेस ३॥ लक्ष रुपये, औधरोहिलखंड रेलवेस २ लक्ष इंडियन मिडलँड रेलवेस १॥ लक्ष, बंगाल नागपूर रेलवेस ३॥ लक्ष व ग्रेट इंडियन पेनिनशुला रेलवेस १२ लक्ष रुपये ज्यास्त किफायत झाली असें त्या त्या रेलवेच्या माहिती वरून समजतें.

येत्या हिवाळ्यांत गव्हरनरजनरल नामदार लॉर्ड ल्यांसडौन हे हैद्राबादेस निजाम सरकारचे पाहुणे ह्मणून जाणार आहेत असें हैद्राबादेकडील वर्तमान पत्रा वरून समजतें.

गव्हांस तेजीचें कारण— 'गतवर्षी या दिवसांत इंग्लंडांत दरक्वार्टर गव्हास जी किंमत पडत होती ती पेक्षां हल्लीं १२ शिलिंग ज्यास्त पडूं लागली आहे इतका विलायतेस गहूं महाग झाला आहे ह्मणून हिंदुस्थानांतून गव्हाचा खासा लोट चालला आहे. सु. प्र.

हैद्राबादच्या निजाम सरकारानें बंगाल येथील एका हिंदुदेवस्थानास महिना ५० रुपयांची नेमणूक करून दिली हें वर्तमान बाहेर पडतांच फक्त निजाम सरकारच्या हिंदुप्रजेसच नव्हे, तर आह्मा इतर राज्यांतील हिंदुस देखील मोठें समाधान वाटून निजामाबद्दल प्रेम वाटलें. तसेंच इंग्रजांस करितां आलें असतें तर सरहद्दीवरील तयारी किंवा रशियन असल्याचा बाऊ वगैरेची पर्वा त्यांस बाळगावयाला नको होती पण नाहीं. त्यांच्या कृती चमत्कारिक फार. करू.

मणिपूरच्या स्वारीला १२ लाखां पेक्षां अधिक रुपये खर्च झाले.

रेलवे आणि अस्वल— फ्लॉरिडा मध्यें राठल स्नेक ट्रेसल वरून आगगाडी जात असतां, दोन अस्वल तिच्या पुढें धांवत होते. शेवटीं पूल फारच उंच असल्यामुळें पुलावरून उडी टाकून सुटका होण्याची आशा नाहीं, असें पाहून, मागाह्यानें त्यांचा पाठलाग करीत असलेल्या लोहाश्वा (रेलवे) ची खोडकी जिरविण्या करितां हें जांबुवंतद्वय दंड थोपटून त्या पुढें उभें राहिले! त्यांपैकीं एकास एंजिनाचा धक्का लागून तें पुलावरून खालीं पडलें दुसरें धक्क्यानें वर उडालें परंतु पडतां पडतां त्यानें एंजिनचा कठडा धरून भयंकर रीतीनें गुर गुरत एंजिनच्या मागील हत्या पर्यंत गेलें. तेथें कोळसे वाला विस्तव नीट करीत होता तो घाबरून त्यानें तापलेले सोऱ्यानें त्या अस्वलास ढोसलें. तेव्हां भयंकर गर्जना करून त्यानें त्यावर झडप घालण्या करितां उडी मारली ती तें पाय सरकून गाडीच्या चाकाच्या खालीं सांपडलें. त्याचा एक पाय तडाक्या सरसा तुटून गेला, तरी तें चैनीनें उडत बागडत अरण्यांत शिरलें.

हैद्राबाद संस्थानची खानेसुमारी— वऱ्हाड प्रांत शिवाय करून हैद्राबाद संस्थानची लोकसंख्या १११३२८२८ आहे असें नुकत्याच झालेल्या खानेसुमारी वरून समजतें. १८८१ साला पेक्षां ही लोकसंख्या १४८७२३४ मनुष्यांनी वाढली आहे चदरघाट वरून खुद्द हैद्राबाद शहरची लोकसंख्या २९७८०० आहे. न्या० सिं०

हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३
सहामाही " ३ " ०।८
सालअखेर " ७ " ।०८
किरकोळ अंकास.......................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .........०१

Rs.
per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 ,,1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy....................................4as

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 a[s]
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXV AKOLA MONDAY 22 JUNE 1891 NO 24

वर्ष २५ अकोला सोमवार तारीख २२ माहे जून सन १८९१ इ० अंक २४

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं अकोलें म्युनसिपाल कमिटीचे हद्दींतील गवताचा लिलाव सन १८९१।९२ साला करितां तारीख १० माहे जून सन १८९१ इ० रोजीं सकाळीं ७वाजतां टाऊनहालांत केला जाणार आहे. ज्यांची लिलाव घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहु तारखेस सदरहु ठिकाणीं हजर राहावें कळावें. तारीख ६।६।९१.

Vyankatesh B. Mudholkar
Secretary.
A. M. C.

## औद्योगिकपरिषद्

किंवा

कारागीर, कारखानदार, व्यापारी व देशांतील उद्योगधंदे वाढविण्याविषयीं हरतेंपरहरतें खटपट करणाऱ्या लोकांची सभा.

येत्या आगष्ट महिन्यांत पुणें मुक्कामीं भरणार आहे.

सभेची तारीख, सभेपुढें यावयाचे विषय वगैरे बद्दलची कच्ची माहिती मागाहून कळविण्यांत येईल

सभेसाठीं येऊं इच्छिणार लोकांनीं तारीख १५ जुलईचे आंत खालीं सही करणार यांजकडे आपलीं नांवें कळवावीं.

पुणें, रेम्युझिम कचेरी ता. १३ माहे मे १८९१ } महादेव बल्लाळ नामजोशी, देशी कारागिरीस व धंद्यास उत्तेजन देणार मंडळीचे सेक्रेटरी.

## जाहिरात.

एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आह्मांस कळवावें. माफक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा.

जी. डी. कविटकर
मर्चंट आणि कमिशनर एजंट
शहर एलिचपूर

## सचित्रक्याटलाग.



आर. डी. कानिटकर
आणि कंपनी
मुंबई गिरगांव ह्याचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ठ शुद्ध १५ शके १८१३

✓ देशी माल वापरावयाचा आणि तो न मिळेल तर विलायती मालाचा उपयोग करावयाचा अशा प्रकारचा निश्चय करून याप्रमाणें वर्तण्यास आज काल लहान थोर पुष्कळ गृहस्थ तयार होत आहेत आणि या संकल्पा प्रमाणें वागणाऱ्या लोकांच्या निरनिराळ्या मंडळ्या स्थापन होत आहेत ही मोठी आनंदाची गोष्ट होय. विलायती मालावर आयात कर सरकारानें न ठेविल्या मुळें हिंदुस्थानांत हजारो कोसावरूनही माल आला तरी तो फार स्वस्त दरानें विकण्यास सवड मिळते; किंबहुना देशी मालावर त्याची सरशी होऊन तो अधिक सुलभ पडतो. अप्रतिबंध व्यापराचें तत्व अर्थशास्त्र दृष्ट्या बरोबर आहे परंतु तें तत्व व्यवहारास लागूं पडण्यात उभय पक्षीं वस्तुस्थिती मध्यें अगदीं साम्य लागत असते या तत्वाला अवश्यक अशा सर्व गोष्टींची अनुकूलता असेल तेंव्हांच अप्रतिबंध व्यापार सुरू करणें हें रास्त होय. इंग्लंड देशाचें यांत्रिक वैभव, त्याची सांपत्तची उन्नत व धनसंपन्न सुस्थिती, व ज्या राज्यावर सूर्य कधीं मावळत नाहीं असें अतिविस्तृत महाराणी सरकारचें राज्य इत्यादी गोष्टी लक्ष्यांत आणिल्या आणि उलट पक्षीं हिंदुस्थानांतील विलयास जात असलेलें हस्तकौशल्य, यांत्रिक विद्येचा अभाव, रेल्वे, व्यापार, व राज्यसूत्रें ही परकीयांच्या हातीं असल्या कारणानें या देशाचें नष्ट वैभव व सुबत्ता असून प्रजेची उपासमारास रखी अन्नान्नदशा, एवढ्या अफाट देशांत जाति, धर्म, आचारविचारादिविविध कारणामुळें एक राष्ट्र बनण्याची दुर्घट व्यवस्था इत्यादि गोष्टी ताडून पाहिल्या ह्मणजे सहजी कळेल कीं अप्रतिबंध व्यापाराचें तत्व इंग्लंड व इंडियांत या देशांतील परस्पर व्यवहारास तिळप्राय लागूं पडत नाहीं. हिंदुस्थानांत स्वल्प रोजींवर काम फार वेळ घेतल्यामुळें कामकरी लोक दुर्बळ व त्रस्त आहेत अशा सबबीवर भूतदयेच्या झपाट्यांत फ्याक्टरी कायदा करण्या विषयीं विलायतच्या लोकांनीं काय काय नाना प्रकार केले हें सर्वांस ठाऊक आहे आणि त्यांच्या सर्व चळवळीचा उद्देश विलायती मालाच्या बरोबरीनें देशीं माल तयार होऊं लागला होता त्यास विघ्न आणण्याचा होता. तेव्हां एकंदरीनें निर्णय असा ठरतो कीं अप्रतिबंध व्यापाराचें तत्व हिंदुस्थानास लागूं करणें अर्थशास्त्रासही संमत नाहीं. परंतु हा विचार करणें सरकारास हितावह नाहीं व ह्मणून तो होतही नाहीं हें उघड आहे. त्या अर्थीं गोष्ट अशा निकराला येऊन पोंचली आहे कीं आपण करूं ते काम व पदरीं असेल तो दाम आणि हा विचार मनात येऊन देशी कपडालत्ता वापरणाऱ्या मंडळीची आह्मी विशेष मातबरी मानतो आणि त्या सर्वत्र स्थापित करण्या विषयीं आमच्या अग्रणी व धुरंधर गृहस्थास विनंती आहे.

## लोकमत वृद्धि.

( १७ वे अंकावरून पुढें चालू. )

इ. स. १७८७ ह्या वर्षीं स्तुत्य व लोकोपयोगी कृत्यें करण्या करितां एक मंडळी निघाली. त्या मंडळीनें आपणास 'स्लेव्हट्रेड असोशिएशन' हें अभिधान घेतलें. राजकीय कामाकरितां ज्या इतर मंडळ्या स्थापन झाल्या होत्या यापासून ही अगदीं निराळी होती. या मंडळीला कोणतेही हक्क मिळावयाचे नव्हते. दूर देशांत जे आपले बांधव अगदीं निकृष्ट अवस्थेस पोहोंचले आहेत, ज्यांचा पशुपक्ष्यादिकांप्रमाणें क्रयविक्रय निर्दयपणानें होत होता, ज्यांविषयीं पुष्कळांचे मनांत कळवळा येत नव्हता, एवढेंच नव्हे, तर ज्यांची पादधुलींत गणना होत असे, ज्यांना पश्वादिकांप्रमाणें किंबहुना याहूनही अधिक हाल सोसावे लागत असत, अशा निराकारण दास्यत्वांत असलेल्या बंधुंना स्वातंत्र्य मिळवून देण्याविषयीं व त्यांना ईश्वरदत्त ऐहिक सुखाच्या बाबींचा उपभोग स्वतंत्रतेनें व निःशंकपणें इतर मानवी प्राण्या प्रमाणें घेण्याची मोकळीक मिळविण्याविषयीं प्रयत्न करण्याचें या मंडळीनें आरंभिलें. या मंडळींतील लोकांची पूर्ण खात्री झाली होती कीं धमकी दाखवून किंवा जुलूम करून या सत्कृत्यांत आपणांस यश येणें कठीण आहे. परोपकार बुद्धि व धर्म कृत्य तत्परता हीं लोकांचे ठायीं उत्पन्न केल्या वांचून गति नाहीं. देशांत हा व्यापार असावा असें पुष्कळांचें मत होतें व त्यांचा पक्ष मोठमोठ्या वजनदार गृहस्थांनीं, व्यापाऱ्यांनीं, नारूवानींनीं, व मोठमोठ्या फडकऱ्यांनीं उचललेला होता. हा व्यापार त्यांना फार फायदेशीर असल्यामुळें तो बंद करणें बिलकुल त्यांना पसंत नव्हते शिवाय यांची संख्याही बरीच होती. तेव्हां या लोकांचे पूर्णपणें बसलेले ग्रह नाहींसे झाल्या वांचून कांहीं एक होणें नाहीं असें या मंडळीस वाटलें नंतर त्यांनीं या लोकांचीं मनें वळविण्याचा प्रयत्न चालविला. असें हें सत्कृत्य ग्रेनविल, वुइलवर फोर्स, क्लार्कसन, मेकाले प्रभृति उदार व थोर मनाच्या पुरुषांनीं हातीं धरल्यावर मग काय विचारतां त्यांनीं जागो जागीं सभा स्थापन केल्या, व सर्व जातीचे व धर्मपंथाचे लोक त्यांचे सभासद झाले. अशिक्षित लोकांचें मन वळविण्यास धर्मासारिखें दुसरें साधन प्रबळ नाहीं. व तें साधन एकदां हातीं आलें ह्मणजे कार्यसिद्धि नव्याण्णव अंशांनीं होतेच. या साधनाचा या मंडळीनें बराच उपयोग करून घेतला. दास क्रयविक्रय करणारे लोक किती निष्ठुरतेनें दासांशीं व्यवहार ठेवितात व त्यामुळें त्यांना किती यातना सोसाव्या लागतात; तसेंच हा क्रयविक्रय करणें मोठें पाप व अन्याय आहे, व हा सुरू ठेवण्यास कोणत्याही धर्मश्रुतीचा आधार सांपडत नाहीं, अशा गोष्टी विषयीं मिळेल तिकडून त्यांनीं पुरावा मिळविला. व तो पुरावा मिळाल्या नंतर त्या व्यापाऱ्यांच्या नैष्ठुर्याचें दृष्टांतासहित हुबेहुब चित्र लोकांचें मनावर उठवून देऊन तसा प्रकार सुरु ठेवणें आपणास धोरबोरद किंवा लांच्छनास्पद आहे याविषयीं एक सारखें धैर्य न खचूं देतां वादविवाद करण्यास त्यांनीं आरंभ केला. कोमल अंतःकरणाच्या व दयालु पुरुषांना त्यांनीं करुणात्मक व मोहक भाषणांनीं व गहिंवर आणून, तसेंच हा व्यापार धर्मभ्रष्ट व निंद्य आहे व तो आपल्यासारख्या थोर पुरुषांनीं बंद ठेवण्याविषयीं झटलें पाहिजे असें हरएक प्रसंगीं व हरएक कालीं त्यांचे मनांत भरवून देऊन, आपल्या पक्षास त्यांनीं वळवून घेतलें. पुष्कळ वेळीं या लोकांना आपली झालेली मानखंडणा, विटंबना, शिव्यांचा भडिमार, व स्वतःचें नुकसान निमूटपणें सोसावीं लागलीं. कधीं कधीं तर त्यांचा जीवित धोक्यांत गेला. मेकॉले साहेबांचें ट्रेव्हेलिन यानें जें चरित्र लिहिलें आहे त्यांत त्यांनीं त्यांचे बापावर हें सत्कृत्य करतांना केवढा घोर प्रसंग आला होता याचें वर्णन केलें आहे. तें वाचून आंगावर शहारे उभे राहिल्या वांचून राहत नाहींत. परंतु अशाही प्रसंगीं त्यांनीं आपलें धैर्य खचूं दिलें नाहीं. सत्कृत्य करणारास ईश्वर सहाय्य असतो हें खोटें नाहीं. यांनीं आपले योक्त व उत्तम विचार लहान लहान पुस्तकांत छापून प्रसिद्ध केले व तीं प्रत्येक ठिकाणीं वांटून दिलीं. ज्याच्या त्याच्या हातांत पहावें तो हेंच पुस्तक. चर्चमध्यें, रंगभूमीवर, नाटक गृहांत, क्लबमध्यें जिकडे तिकडे दासांवर होणाऱ्या नैष्ठुर्याचेंच वर्णन ऐकूं येई. हा व्यापार बंद करण्यासाठीं दररोज पार्लमेंट मध्यें शेंकडों अर्ज येऊं लागले. अशी सार्वजनिक चळवळ दृष्टीस पडल्या बरोबर पार्लमेंटला चौकशी करणें भाग पडलें. पार्लमेंटमध्यें चौकशी होणार अशी वार्ता चोहोंकडे पसरल्या बरोबर या मंडळीला दुप्पट उमेद व उत्साह आला. त्यांनीं सतत तीस वर्षें पर्यंत अव्याहत परिश्रम केलें व त्यांचें चीजही उत्तम प्रकारें झालें. अखेरीस हा व्यापार अगदीं निंद्य आहे व तो तात्काळ बंद करावा असें सर्व पार्लमेंटच्या सभासदांचें मत पडलें व त्यांनीं तो लागलाच बंद करविला. ह्या हकीकतीवरून आपणांस जो कित्ता घ्यावयाचा तो हा—जुलूम करून किंवा धमकी दाखवून किंवा बंड करून कोणत्याही कृत्यांत यश येत नाहीं. खऱ्या स्थितीचें रूप दाखवून लोकांच्या मनांत कळवळा व आस्था उत्पन्न करून ते आपणांस वश करून घेणें हाच उत्तम मार्ग. सर्व लोक वश झाल्यावर मग काय मिळणार नाहीं? याला दृष्टांत अँटी कॉर्न लीग यांचें

यश. त्याचाही अशीच विचित्र हकीकत आहे. या कृत्यांत लोकांनां जें यश आलें तें पुष्कळ अंशीं कॉबडेनच्या परिश्रमाचेंच चीज. त्याची अशी पूर्ण खात्री झाली होती कीं सर्व लोकांचे साह्य मिळविल्याशिवाय हे कायदे आपणांस बंद करितां यावयाचे नाहींत; व त्यांचें साह्य मिळविण्यास उत्तम मार्ग झटला म्हणजे त्यांस खरोखर त्या कायद्याचे प्रतिबंधनापासून काय नुकसान सोसावें लागतें याची पूर्णपणें माहिती करून देणें हा होय. रात्रंदिवस यानें मग तेंच काम सुरू केलें. त्याच्या परिश्रमांचें चित्र हुबेहूब त्याचें चरित्रांत उत्तम प्रकारें उठविलें आहे. व शेवटीं माझी अशी विनंती आहे कीं सुधारणेच्छु लोकांनीं या पुरुषाच्या चरित्राचें अध्ययन वारंवार करावें म्हणजे त्यांना सुधारणेची खरी दिशा कोणती हें समजून येऊन, सुधारणाही कालान्तरानें होत असते व तिच्या चालकांच्या परिश्रमाचें चीज उत्तम प्रकारें होण्यास बराच काळ जावा लागतो हें ही पूर्णपणें समजून येईल. तसेंच सुधारणा करणें म्हणजे व्यक्तिपरत्वाचें काम नव्हे, तर ती अमलांत आणण्यास सर्व लोकांची मदत पाहिजे व तशी मदत मिळविण्यास लोकमता वांचून इतर बळकट साधन नाहीं व तें लोकमत्त अनुकूल करून घेण्यास पुष्कळ काळपर्यंत अव्याहत परिश्रम करावे लागतात, व नाना प्रकारच्या अडचणी, मानभंग, निराशा व उपसर्ग सोसून सर्व लोकांचीं मनें बोधपर माहितीनें वळवून घ्यावीं लागतात व गोडीगुलाबीनें लोकांचेच पोटांत शिरून काम करून घ्यावें लागतें.

---

( लिहून आलेला मजकूर )

आज काल आपल्या हिंदुस्थानांत सुधारक व दुर्धारक असे दोन पक्ष झाले आहेत; व त्यामुळें एकापक्षाची दुसऱ्या पक्षाच्या मंडळीविषयीं केवळ मत भेदांमुळें पुष्कळ द्वेषबुद्धि उत्पन्न झाली आहे, इतकेंच नाहीं तर आतां ही मंडळी बरेच अंशीं एकमेकांच्या वैमनस्यास पात्र होऊं लागली आहे. स्कोबलबिलच्या वेळीं पुण्यास कोठा—मुठनांत जो कांहीं थोडा बहुत मारामारीचा प्रकार झाला त्याचें प्रथम कांहींसें नवल वाटलें होतें. परंतु आतां अशा प्रकारच्या वर्तनाचें नवल वाटण्यासारखें कांहीं राहिलें नाहीं. कोणती ही गोष्ट कधीं न पाहिलेली अशी प्रथमच डोळ्यापुढें आली म्हणजे पहिल्यांदा तिजबद्दल थोडेसें आश्चर्य वाटतें. परंतु तीच जर हमेशा दृष्टीस पडूं लागली तर त्याबद्दल कांहीं नवल वाटण्याचें कारण रहात नाहीं. ज्या बिलामुळें सुधारक व दुर्धारक यांच्यामध्यें मारामारी झाली ( किंवा असा असद्वर्तनाचा दोष उभयपक्षावर आहे ) तें बिल तर अखेरीस उभयपक्षाला तुरी देऊन जसेंच्या तसेंच पसार झालें. परंतु त्यामुळें उभयपक्षांमध्यें उत्पन्न झालेलें वैमनस्य मात्र अद्याप कायम आहे; व दिवसें दिवस वाढत आहे. हें परवां मुंबई येथें शेणवी लोकांची जी सभा भरली होती त्यांतील कांहीं सुधारकांच्या वर्तनावरून सहज कळून येईल. त्याजबद्दल सादंत हकीकत केसरी पत्रांत छापली आहे. ही मंडळी सध्यां कुठें भरसभेंत परस्परांस जोडे फेंकून मारण्याच्या थरास येऊन पोंहोंचली आहे; यापुढें आपल्या बुद्धि कौशल्यामुळें काय काय करतील हें पहाणें आहे हा यादवी केवळ मुंबई पुण्याकडेसच मात्र आहे व आपल्या वऱ्हाडांत त्याचा गंध ही नाहीं असें नाहीं. आणि त्यांत निदान आपचे अकोलें तरी मागें हटणार नाहीं असें वाटतें. अद्याप वाक्युद्धापलीकडे मंडळी कशी गेली नाहीं व या कामीं इतरांपेक्षां मागासली याबद्दल थोडेसें नवल वाटतें. वैदर्भकार व शुद्धवऱ्हाडी वगैरे पत्रांतून परस्परांस शब्दमारापेक्षां इतर मार देणें रास्त आहे वगैरे अर्थाचे उद्गार निघत आहेत; व आतां तो मार त्यांना वाचक देणार किंवा तेंच आपल्या आपसांत देणार याचा मात्र विचार आहे. आजकाल या पत्रांतून एकमेकांविरुद्ध व लोकांस कंटाळवाणे असे बरेच लेख येऊं लागले व त्याजबद्दल आम्हीं उभय पत्रांचे वाचक या नात्यानें दिलगिरी दाखविली असतां कांहीं अयोग्य होणार नाहीं. आज दोन तीन आठवडे झाले शुद्धवऱ्हाडींत 'असत्यद्वेष्टा' या सहीचें एक पत्र प्रसिद्ध होत आहे. प्रथम दर्शनी सदहू गृहस्थ आपल्या नांवाप्रमाणें असतील असें वाटलें होतें परंतु हल्लीं त्यांच्या बाह्याची शैली, व त्यांच्या लेखांतील असंबद्धता, व मि० महाजनी सारख्यांनीं स्पष्टपणें प्रसिद्ध केलेल्या पत्राला उत्तर देण्याची त्यांची ढब पाहून त्यांनीं आपल्या नांवास 'अ' वर्ण विनाकारण जोडला असावा असें वाटतें.

मि. महाजनी यांच्या मुलाचें लग्न थोडे दिवसांपूर्वीं आमदाबादेस झालें. त्या संबंधानें मि० महाजनी यांनीं आपली सही देऊन शुद्धवऱ्हाडी पत्रांत असें प्रसिद्ध केलें आहे कीं हुंड्यासंबंधानें किंवा करणी संबंधानें किंवा इतर कोणत्याही गोष्टी संबंधानें मीं अट ठेविली नाहीं, व कराराही केला नाहीं. असा लेख सही निशी प्रसिद्ध झाल्यावर मग त्या बद्दल पुढें या लग्न संबंधानें वाद चालणार नाहीं असा आमचा समज होता. मि. महाजनी हे किती प्रामाणिक आहेत हें आमच्या वाचकांस महीत आहेच त्यांनीं लिहिलेली गोष्ट असत्य द्वेष्टा कबूल करीत नाहीं इतकेंच नव्हे तर आपलें स्वतःचें नांव पुढें न आणतां व आपल्या पाशीं त्यांचें म्हणणें खोटें मानण्यास काय करणें व माहिती आहे हें न दाखवितां सभ्यतेच्या चालीविरुद्ध तो मि. महाजनी यांस असें विचारतो कीं तुमच्या व्याह्यांस किती पगार मिळतो, त्यांस मुलें बाळें किती आहेत, व त्यांनीं करणी केली त्यांत काय विषय दिले हें आम्हांस कळवा.

मि० महाजनी यांच्या व्याह्यांजवळ काय काय इस्टेट व जिंदगी आहे याची यादी मि० महाजनी जवळ असेल असें आम्हांस वाटत नाहीं. तेव्हां त्यांनीं यदा कदाचित आपल्या व्याह्यांचा पगार कळविला तरी जों पर्यंत त्यांची सर्व जिंदगी व उत्पन्न कळत नाहीं तों पर्यंत त्यांनीं करणी केली ती आपल्या शक्ति बाहेर किंवा अडचणीमुळें केली याचा खुलासा होणें अशक्य आहे तेव्हां मि. महाजनीं यांनीं असत्य द्वेष्ट्यास आणखी एक वार उत्तर दिलें तरी त्यामुळें असत्य द्वेष्ट्यास कांहीं उपयोग होईल असें आम्हांस वाटत नाहीं. सबब मि. महाजनी यांनीं या प्रसंगीं उत्तर देऊं नये हेंच ठीक आहे. जो मनुष्य आपलें नांव प्रसिद्ध न करितां किंवा आपल्या माहिती देणारांचीं नांवें पुढें न आणतां एखाद्या अब्रूदार मनुष्या संबंधानें दुष्ट लेख लिहितो, व जी गोष्ट एका मनुष्यानें दुसऱ्या मनुष्यास विचारूं नये ती विचारतो, व तुमच्या व्याह्याची करणी संबंधानें काय ऐपत आहे ती प्रसिद्ध करा असें म्हणतो त्या अशा असभ्य बेजबाबदारीचे लेख लिहिणाऱ्या मनुष्या बरोबर सभ्यपणाचे चालीस अनुसरून मि. महाजनी यांनीं उत्तर देत बसणें योग्य होणार नाहीं. व त्यांनीं उत्तर देऊं नये अशी आमची त्यास विनंती आहे.

वऱ्हाडांतील सामाजिक सुधारणा परिषदेचे जे सभासद किंवा अधिकारी आहेत त्यांनीं सभेच्या ठरावा प्रमाणें वर्तन केलें पाहिजे. या पलीकडे सभासद या नात्यानें त्यांची जबाबदारी आहे असें आम्हांस वाटत नाहीं. ज्या प्रमाणें मि० महाजनीच्या संबंधानें असत्य द्वेष्ट्यानें वर्तन केलें त्या प्रमाणेंच त्यानें मि० भागवत यांच्या मुलीच्या लग्ना संबंधानें वर्तन केलें आहे. मि० भागवत यांस असत्य द्वेष्टा असें विचारतो कीं एखाद्या गरीब स्थितींतील मुलास मुलगी देऊन त्याच्या विद्याभ्यासाची सोय करण्याची शक्ति होती किंवा नाहीं? या प्रश्नाचें पूर्ण पणें उत्तर देणें म्हणजे मि० भागवत यांनीं आपल्या कुटुंबांत अगर आपल्यावर अवलंबून किती माणसें आहेत. आपल्या जबाबदाऱ्या किती आहेत, आपली हल्लीं इस्टेट किती आहे या सर्वांची यादी करून तीं जगापुढें मांडली पाहिजे. व हे ते करतील असें आम्हांस वाटत नाहीं. व असें न करण्या बद्दल त्यांस कोणी ही दोष देणार नाहीं असा आमचा समज आहे. आपण आपल्या विचारा प्रमाणें वर्तन करतो किंवा नाहीं याचा निर्णय आपण स्वतःच बहुतेक गोष्टींत करूं शकूं. हा निर्णय दुसऱ्यांस करण्यास साधनें नसतात. हीं साधनें दुसऱ्यांस द्यावीं असें असत्य द्वेष्ट्याचें म्हणणें आहे. हें म्हणणें बरोबर आहे किंवा नाहीं याचा निकाल करण्यास आमच्या वाचकांस बिलकुल अवकाश लागणार नाहीं कित्येक सुधारकांचें असें म्हणणें आहे कीं आपली प्राप्ति पाहून त्या प्रमाणें प्रत्येक मनुष्यानें आपलें कुटुंब वाढवावें किंवा कमी ठेववावें. या मता प्रमाणें एखादा सुधारक वागला किंवा नाहीं हें पाहण्यासाठीं एखाद्या असत्य द्वेष्ट्यानें सदहु सुधारकांस असा प्रश्न केला कीं संसार सुख तुम्हीं किती वेळां घेत असतां; तर त्याचा प्रश्न अयोग्य होईल इतकेंच नव्हे तर असल्या तऱ्हेचा प्रश्न करण्यास कोणत्याही सभ्य तऱ्हेनें चालविलेल्या वर्तमान पत्रांत त्यास अवकाश मिळणार नाहीं. आमच्या मतें असत्य द्वेष्ट्याचे जे लेख आज पर्यंत आले आहेत, व अशा प्रकारचे जे पुढें येतील त्या संबंधानें जों पर्यंत असत्य द्वेष्टा आपलें नांव प्रसिद्ध करीत नाहीं तों पर्यंत त्यास उत्तर देण्याची व त्यानें आणलेल्या अपवादावर भरंवसा ठेवण्याची जरूर ही नाहीं.

असल्या प्रकारच्या आडून गोळ्या मारून लोकांचीं गृहछिद्रें काढण्याच्या भानगडींत यापुढें असत्य द्वेष्ट्यानें पडूं नये व लोकांस आपली स्वतःची गृहछिद्रें काढून घेण्याची संधी सांपडूं देऊं नये अशी आमची त्यास प्रार्थना आहे. व कदाचित् या भितीनें तो आपलें नांव पुढें करीत नसेल असें वाटतें शुद्धवऱ्हाडी व वैदर्भ कारांनीं ही अशा प्रकारच्या लेखांस उत्तेजन न देतां त्यांना अशा बाबतींत कांहीं संशय आल्यास प्रत्यक्ष त्या लोकांस विचारून ते आपली खात्री करून घेतील अशी त्यांनाही आमची प्रार्थना आहे.

---

मणिपूर प्रकर्णी बद्दल जुवराज तेंद्रजितसिंग यांजवर महाराणी सरकाराविरुद्ध लढाई करून चीफ कमिशनर मि० क्विंटन व इतर अधिकारी यांचा खून करण्यांत सामील असल्या बद्दलचे वगैरे तीन आरोप होते; व त्याची चौकशी ब्रिटिश न्यायासनापुढें चालू होती, तिचा ता० १४ जून रोजीं निकाल झाला असें मुंबईच्या प्रत्याहिक पत्रावरून कळतें कोर्टानीं जुवराज साहेबांना दोन आरोपा बद्दल गुन्हेगार ठरवून बाकी एका बद्दल दोष मुक्त ठरविलें आहे. कोर्टानीं असें ठरविलें आहे कीं जुवराज साहेबांनीं महाराणी सरकारा विरुद्ध ता० २४ मार्चच्या सुमारास लढाई सुरू केली; व चीफ कमिशनर मि० क्विंटन व त्याजबरोबरील इतर अधिकारी यांचा खून करण्यांत मदत केली. फक्त खून करण्याच्या वेळेस हजर असल्या बद्दलचा जो त्यांच्यावर एक आरोप होता त्याजबद्दल मात्र त्यांना दोष मुक्त ठरविलें आहे. आणि या सर्व अपराधाबद्दल त्यांना फाशीची शिक्षा सुनविण्यांत आली आहे सदहु शिक्षा गव्हरनर जनरल साहेब व त्यांचे काउन्सिल यांच्या मंजुरातीवर अवलंबून आहे.

---

The Berar Samachar

MONDAY, JUNE 22, 1891

MR. HUME ,"ON THE PEOPLE'S CAUSE."

(Continued from our 48th issue of December last.)

"And why, I ask, should less scorn and contempt be meted out to those who, when Tory enemies invade these our Radical burghs, instead of standing by their order and their fellows, basely, to serve some personal end, join the invaders and support their attacks?

You have to deal with weak-kneed people, to stir them up, to put heart of grace into them, to say to them, "What is the use of singing, as you do:

'Wha' would be a traitor knave?
Wha' would fill a coward's grave?
Wha' sae base as be a slave?'

if you, men, Scotchmen, Ayrshire men, almost the kith kin of the great poet, whose immortal verses burn in your hearts, have not even pluck enough to exercise manfully and independently, and without fear or favour, those civil rights won for you and bequeathed to you by braver and nobler sires?'

And there is yet a third class of men who vote wrong, the miserable toadies whose hearts hanker after the flesh pots of Egypt and who would fain creep up even by ever so dirty a back-stair in almost those higher ranks, who dislike and despise them, as they deserve to be disliked and despised, but who for their own ends flatter and cajole them. Thank God, these are not very numerous in Scotland. Snobs and snobbery we have everywhere, but I do honestly think that we have less of this here than they have south of the Tweed. But, few or many, you have to deal with them, and so to mark the scorn and contempt in which you hold such

traitors that few indeed shall care to follow in their muddy footsteps.

No! let the classes and the aristocracy vote Tory if they will:

"Let bears and lions roar and fight
For God hath made them so;"

but, let the people vote solid on the people's side, and to ensure this you must deal with the ignorant and short-sighted, with the timorous and the traitors, and leave but a paltry residuum of these to give respectability to the Tory camp; and, if you only put your shoulders to the wheel, if you only put your hearts and heads into the struggle you *can* do this, and if you do *not* do it, I shall begin to feel ashamed that I was born a Scotchman.

My friends, you must be up and doing. Just look what the Primrose ladies are effecting in so many places by union, by organization, by untiring and persistent effort! You are men, you are Scotchmen, and can you not do as much? Will you own to being beaten in such a noble rivalry by a parcel of ladies, however sweet and earnest?

The dear women, God bless them! They are not very logical we all know, and they are too prone to accept as Gospel whatever is preached to them by lips they love. And so it comes about that these dear Primrose dames—and very charming ladies many of them are: indeed, they are the only section of the Tory party that are worth two straws—so it comes about, I say, that these noble Primrose dames, are fighting, in all good faith, for the cause of injustice and oppression, of coercion and cruelty, and aiding and buttressing up a cause, which, were their pretty heads only half as clear as their hearts are true and tender, they would die rather than support. But for all that *they* are in earnest, they are working together as one woman. They are putting aside in a hundred ways, comfort, convenience, pleasure, personal predilections and prejudices, and all in the hopes of securing results that they have been taught by their fathers and their husbands and their brothers to be for the good of the country. And can you, my friends, in a higher and nobler cause, the cause of liberty, the cause of the people, can you not do as much? Are they really as much superior to you as they claim to be? Or, will you not rather emulate and surpass them in their persistent and unselfish efforts, and prove to them and to the world that, while your hearts like theirs are in the right places, your heads are stronger and clearer, and that while at hearth and home they must ever remain peerless, in public affairs, when it comes to a fight, you can give them any odds and beat them to a distance.

I repeat: it needs only for you, the people, to be true to yourselves, to be in real earnest, to work individually and collectively, to see your cause triumphant everywhere. Each man of you can, if he will, bring over to the right side at least one of his brethren, now blindly or tremblingly following the Tory lead. Do this, and victory is yours. Do this, and you will wipe away the stain that now disfigures your escutcheon of being misrepresented in the national councils by one who ignores your worth and despises your claims to equality. Do this, and the respect of all good men, of all our bonny Scotland, shall be with you now and for ever."

## HYDERABAD RESIDENCY ORDERS, JUNE 15, 1891.

Mr. F. B. Dickenson, Deputy Conservator 2nd grade, Central Provinces, and Officiating Conservator 3rd grade, Berar to be Deputy Conservator 1st grade and continue to officiate as Conservator of Forests in Berar.

In exercise of the powers conferred by sections 4 and 5 of the Foreign Jurisdiction and Extradition Act, XXI of 1879, and of all other powers enabling him in his behalf, the Governor-General in Council is pleased to provide as follows for the administration of civil and criminal justice within the cantonment of Hingoli:—

British Courts having jurisdiction, civil and criminal, within the district of Basim may exercise the same jurisdiction and powers, following the same procedure and applying the same laws, within the cantonment of Hingoli.

With reference to rule XIX of the rules framed under the Berar Rural Boards Law, 1885, the following result of the election of members for the Basim Taluk Board held on the 30th March 1891 to fill the vacancies under rule XXIX of the said rules is hereby notified—:

| Names of members held to have resigned under rule XXIX | Persons now elected |
|---|---|
| 1 Deorao Balaram | 1. Indrabhan Kaniram of Pimpalgaon. |
| 2 Kisanlal Radakisan | |
| 3 Laduram Dulichand | |
| 4 Lachiram Jankidas | 2. Gopal Hari |
| 5 Ghasiram Fateram | Bagut of Mhasla |

And whereas the votes at the said election failed to elect the prescribed number of elective members, the remaining three vacancies have to be filled by nomination under rule XVIII, and the following persons have accordingly been nominated:-

1 Motiram Naudram of Vawali
2 Kusturchand and Ramnarayan of Pardi.
3 Sakuram Jaikisan of Kalumteshwar

Mr. R. A. Simpson, Assistant Commissioner, is placed in charge of the current duties of the office of the Veterinary Superintendent, Hyderabad Assigned Districts, in addition to his own duties, with effect from the 26th August 1890 *vice* Mr. J. Cooper, Veterinary Superintendent transferred to the Bacteriological Laboratory at Poona.

With reference to rule 11 of the rules framed under the Berar Rural Boards Law, 1885, and published in the *Residency Orders* Notification No. 167, dated the 8th July 1889. it is hereby notified that Mr. Ganesh Bapuji, Officiating Extra Assistant Commissioner, has been appointed a member of the District Board at Akola, *vice* Mr. R. Aitken, resigned.

Third class Hospital Assistant Abdul Razak Ahmed, in charge of the Charitable Dispensary at Wun, is granted privilege leave for three months from the date of relief.

Second Class Hospital Assistant Sewrathan Baijnath, of the Reserve List of the Akola District, will hold temporary charge of the Dispensary at Wun until the return from leave of the permanent incumbent, or until further orders.

Mr. A Elliott, Deputy Commissioner of the Wun District, is granted privilege leave for 18 days with effect from the 30th May 1891.

Mr. F. W. A. Prideaux, an Assistant Commissioner of the 3rd class, is placed in charge of the current duties of the office of the Deputy Commissioner of Wun District during the absence of Mr. Elliott on privilege leave, or until further orders.

With reference to rule XIX of the rules framed under the Berar Rural Boards Law 1885, and published in *Residency Orders* Notification No. 46, dated the 7th April 1888, it is hereby notified that Mr. Vithuji Narayen, Officiating Tahsildar, has been appointed to be a nominated member of the Taluk Board at Khamgaon, *vice* Shrikrishna Pandurang, resigned.

With reference to section 25 of the Berar Municipal Law, 1886, it is hereby notified that Mr. Cowasji Edulji Metha has been elected as a member of the Municipal Committee at Sheagaon, *vice* Mr Doorgiah Pillay, resigned.

With referrence to rule XIX of the rules framed under the Berar Rural Boards Law, 1885, and published in *Residency Orders* Notification No. 46, dated 7th April 1888, it is hereby notified that Mr. Krishnaji Mahadeo, Tahsildar, has been appointed to be a nominated member of the Taluk Board at Akot, *vice* Luxumon Sheorao, resigned.

The leave on medical certificate granted to Mr. Krishnaji Daryaji, Sub-Registrar of Basim in *Residency Orders* No. 11, dated the 7th January 1891, is extended by a further period of three months.

## वऱ्हाड.

हवामान—पावसाचें अद्याप चिन्ह नाहीं. कडबी, गवत, अतिशय माहाग झालें आहे. म्हणूनच अतां पावसाकडे लोकांचें लक्ष अधिकाधिक लागलें आहे. धान्याचेही भाव वाढत चालले आहेत.

मि० एफ. बी. डिकिन्सन सेकंड ग्रेड डे० कान्सरव्हेटर यांस कायमचे फर्स्ट ग्रेड डे० कान्सरव्हेटर नेमून वऱ्हाडांत आफिशिएटिंग कान्सरव्हेटर नेमलें.

इंगोली छावणींतील दिवाणी व फौजदारी कामासाठीं सरकारांनीं अशी व्यवस्था केली आहे कीं वाशिम जिल्ह्यांत ब्रिटिश कोर्टें जे दिवाणी व फौजदारी अधिकार चालवितात तेच अधिकार त्यांनीं सदरहु छावणीचे हद्दींत चालवावे.

रा. रा. इंद्रभान कणीराम रहाणार पिंपळगांव व रा. र. गोपाळ हरी यांस वाशीम तालुका बोर्डाचे मेंबर निवडलें; आणि मतें देणारांनीं निवडावयाचे तितके मेंबर न निवडल्यामुळें रा. मोतीराम नंदराम, कस्तुरचंद रामनारायण आणि सखाराम जैपकृष्ण यांस मेंबर नेमलें आहे.

मि. आर. ए. सिंपसन अ० क० यांस आपलें काम करून शिवाय व्हेटरीनरी सुपरिन्टेंडेन्टच्या आफिसचें चालूं काम करण्यास नेमलें आहे.

मि. गणेश बापूजी ऑ० ए० अ० क० यांस अकोला डिस्ट्रिक्ट बोर्डाचे मेंबर नेमलें.

मि. ए. इलियट डे० क० वणी यांना १८ दिवसांची हक्काची रजा मिळाली व त्याचें काम पाहण्यास मि. प्रिडो अ० क० यांस नेमलें.

मि. विठूजी नारायण अ० तहसिलदार यांना खामगांव तालुका बोर्डाचे मेंबर नेमलें.

मि. कावसजी एदलजी मेथा यांना शेगांव म्युनिसिपल कमिटीचे मेंबर निवडलें.

मि. कृष्णाजी महादेव तहशिलदार यांना अकोट म्युनिसिपल कमिटीचे मेंबर नेमलें.

मि. कृष्णाजी दर्याजी, सबरजिस्ट्रार, वाशिम, यांस मिळालेली आजारीपणाची रजा आणखी तीन महिने वाढवली.

मि. यशीनखां अ० क० यांनीं निजामसरकारच्या राज्यांतील हाय कोर्ट जजाची जागा पतकरतां कीं काय म्हणून विचारणा झाली व त्याप्रमाणें ती त्यांनीं पतकरण्याचें कबूल केलें असें कळतें.

येत्या हिवाळ्यांत व्हाईसराय साहेब नागपुराकडे येणार अशी वार्ता आहे.

एलिचपूर जिल्ह्यांतील एका १८ वर्षांच्या मुलानें ७ वर्षांच्या मुलीशीं संभोग केल्यामुळें ती मरण पावली. ह्या मुकदम्याची चौकशी सेशन कोर्टांत सुरू होणार आहे.

गेल्या आठवड्यांत येथें सेशन झालें. वाशीम जिल्ह्यांतील पुंजाई दिला मुलास मारल्या बद्दल जन्मपर्यंत काळे पाण्याची शिक्षा झाली. जळगांव व अगर येथील खुनाचे आरोपी सुटले.

मे. फिट्झपाट्रिक साहेब रेसिडेंट हे लौकरच फर्लो रजेवर विलायतेस जाणार आहेत असें कळतें.

ता० १९ रोजीं ग्रेन मार्केटमध्यें रा० रा० डा० हरी वामन भट यांस पान सुपारी देण्यांत आली. सदर्हु गृहस्थ फार सभ्य असून बरेच लोकप्रिय झाले होते. परंतु त्यांना घरगुती अडचणी मुळें येथें रहातां आलें नाहीं हें पाहून आम्हांस फार वाईट वाटतें. ते शुक्रवारीं सामानासुद्धां येथून दिवसाचे ११॥ च्या गाडीनें पुण्यास रवाना झाले. येथें अशा एकाद्या डाक्टराची फार जरूरी आहे. ही उणीव कधीं भरून येईल तेव्हां खरं.


## जाहिरात

म्युनिसिपल ऑफिसांत एक दरमहा रुपये १२ ची कारकुनाची जागा खाली आहे. व त्याकरितां उमेदवारांचे अर्ज तारीख २८ जून सन १८९१ इसवी पावेतों घेतले जातील. मराठी व इंग्रजी अक्षर चांगलें असलें पाहिजे. चांगल्या वर्तणुकीबद्दल एखाद्या प्रसिद्ध संभावित गृहस्थाचे सहीचा दाखला पाठवावा.

अकोलें, २१।६।९१

Vyankatesh Ramchandra Mudholkar.
सेक्रेटरि, म्युनिसिपालिटी अकोलें.


## वर्तमानसार.

राष्ट्रीय सभे करितां दोन लाख रुपयांचा कायमचा फंड करून ठेवण्याचे विचार चालू आहेत.

चीन प्रांताच्या सरहद्दीवर अलीकडे चीनच्या रयतेस वेड लागले असावें असें दिसते! चीनच्या प्रधानाची वाखाणणी करून पुरते महिना दोन महिनेही झाले नाहींत तोंच या चीन लोकांनीं मिशनरी लोकांचीं घरें दारें, त्यांचीं पुजा स्थानें, अर्भकालयें पार मोडून फडशा मांडण्याचा सारखा सपाटा चालूं केला आहे. गेल्या आठवड्यांत शांघाई येथून दोन तीन तारा आल्या असून त्यांत या चीन लोकांनीं कित्येक बड्या कामदारांस जिवानिशीं प्रभूच्या प्रिय मुलाकडे पाठविलें असून तिकडे आपणास जाणें भाग पडूं नये ह्मणून कित्येक ठिकाणच्या युरोपियन बायकापोरांनीं चंबूगवाळें आटपून इकडचा रस्ता धरला आहे. लंडनची ता० १२ मिनहूची उशिरा आलेली तार सांगते कीं, वुचेन येथील मिशनरी लोकांची सर्व स्थावर मिळकत जाळून फस्त केली. टकूटांक येथें बंड उद्भवलें असून त्यांस येथील सरकारी सैन्यही सामील झालें आहे. यावरून या दंग्याचें स्वरूप उत्तरोत्तर वाढतच आहे असें दिसतें. चीनी लोक जरी गचाळ आहेत असें आमच्या सरकारचें मत असले तरी त्यांची संख्या फार आहे ही गोष्ट आमच्या सरकारास माहीत आहेच; आणि ह्मणून आमचे सरकार मणिपूर किंवा ब्रह्मदेशाप्रमाणें चीनवर पंजा मारण्यास तयार होईल असें वाटत नाहीं आणि आमच्या सरकारानें तसें करूं ही नये हें उत्तम.

चीन देशांत मिशनरी लोकांविरुद्ध जे दंगे चालू आहेत त्यासंबंधानें पार्लमेंटास प्रश्न होऊं लागले आहेत.

ज्वालामुखी व्हेसुविअस पर्वतांतून आसपासच्या प्रांतांत धरणीकंप होऊं लागले आहेत.

भोर, जत आणि दफलापूर येथील संस्थानचे न्यायाधीश जे खटले सेशन कमिट करतील त्यांची चवकशी करण्याचें काम पुणें व विजापूरच्या पोलिटिकल एजंटास दिलें आहे.

खुच्चू नवळ ऊसिन नांवाच्या ठिकाणीं चीन लोकांनीं दंगा केला असून तेथील फ्रेंच देऊळ आणि अर्भकांचे वसतिगृह दंगेखोरांनीं जाळून टाकलें असें ता. ९ मिनहूची शांघाईची तार सांगते.

दमो येथें गेल्या पांचव्या तारखेस ३ वाजण्याच्या सुमारास गारांची वृष्टि झाली. गारा सरासरी बोरां एवढाल्या होत्या.

लार्ड ल्यान्सडौन हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल ह्यांची स्वारी फिरत फिरत येत्या हिवाळ्यामध्यें मध्य प्रदेशांत येणार आहे.

नागास जातीच्या विरुद्ध २०० काश्मिरी लढाऊ लोक व दोन तोफा आमच्या सरकाराकडून पाठविण्यांत आले आहेत.

अमेरिकेंतील गव्हाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांनीं आपला गहूं अमुकच दरानें विकावयाचा असा कट केला आहे. आमच्या कडील शेतकरी असें कांहीं प्रकार करतील काय?

पुण्याच्या सायन्स कालेजचे प्रिन्सिपाल मि. थॉमसन यांस ग्लासगो विश्वविद्यालयाकडून डाक्टर आफ सायन्स असा किताब देण्यांत आला आहे.

स्ट्रेट वसाहतींतही समंतिवय १२ वर्षे करण्यांत येणार असें घाटत आहे तेथें या विरुद्ध ओरड होईल असें वाटत नाहीं असें ह्मणतात. तेथील लोकांस आपल्या आया बहिणी कोर्टांत न्याव्या असें कदाचित वाटत असेल.

हांकांग येथें जे इंग्रज सरकारचें सैन्य आहे तें वाढविण्याचें घाटत आहे. या वाढविण्याच्या सैन्यांत पंजाबी मुसलमान लोकांचा भरणा करण्यांत येणार आहे.

मुंबईस ज्या दोन पार्शी स्त्रियांबद्दल मोठें प्रकरण चालूं आहे त्याबद्दल चवकशी करण्यासाठीं कमिशन नेमण्याचें मुंबई सरकारानें ठरविलें आहे.

रशियांत धान्य अतिशय महाग झाल्यामुळें आमच्या सरकारचा वकील व इतर कामदार यांस तेथें रहाणें फार जड जाऊं लागलें आहे.

हिंदुस्थान सरकारच्या मिलिटरी खात्याकडे दुसरा एक असिस्टंट सेक्रेटरी नेमण्यांत येणार आहे. याचा पगार ५००रुपये आहे. या शिवाय त्याचा पूर्वीचा पगार चालूं रहाणारच.

लष्करी खात्यांकडील ग्यानटेड आफिसर लोक सावकारांचें कर्ज काढतात आणि तें मग फेडीत नाहींत अशाबद्दल ब्रह्मदेशांतील कमिशनरकडे हिंदुस्थानांतून अर्ज झाल्यामुळें सरकारानें एक सरक्युलर काढलें असून त्यांत असें कर्ज काढणारे लोक जर आपल्या कर्जाची फेड योग्य तऱ्हेनें करणार नाहींत तर त्याबद्दल सरकार फार कडक विचार करील असें लिहिलें आहे. फार कडक ह्मणजे तसें सिद्ध झाल्यावरही पेन्शन मिळेल ना!!

न्यूयार्ककडे एक आगगाडी डायनामिट नांवाच्या दारूनें उडविण्यांत आली. या दारूमुळें त्या गाडीचे तुकडे तुकडे झाले. ही दारू रेल्वे रस्त्यापासून जवळच असलेल्या एका झाडाच्या ढोलींत लहानशा देवदारी पेटींत ठवलेली होती.

हिंदुस्थान सरकारासाठीं असि. मिलिटरी सेक्रेटरी एक नवीन नेमणार असून त्या जागेवर मुंबईच्या मिलिटरी अकौंट खात्यांतील मेजर रामस्देन यांची नेमणूक झाली आहे व ती त्यांनीं नेमणूक पतकरली आहे. ठा. अ०

अब्दुलहक्क व निजाम यांजमधील लढा अद्यापि मिटला नाहीं व या खटल्याचा निकाल सिमल्यास होईल असें ह्मणतात.

नेरळ पासून माथेरान पर्यंत ट्रामचे कारण्याचा विचार एका पारशी गहस्थाचा आहे. व त्यासंबंधीं सरकारही हल्लीं विचार करीत आहे.

मेणवत्ती दर तासानें विझविल्यावर पुन्हा लावतां येण्यासारखी एक युक्ति हल्लींच निघाली आहे असें सांगतात.

विनांत इन्फ्लुएंझाच्या सपाट्यानें दोन महिन्यांत १०,००० लोक मेले.

बनारस येथील दंग्यांत सामील असलेल्या सात इसमास खालीं सांगितल्याप्रमाणें शिक्षा झाली.:—

गोरधनदास. तीन वर्षें सक्त कैद आणि २५,००० रुपये दंड. न दिल्यास आणखी नऊ महिने सक्त कैद.

गोपालदास. तीन वर्षें सक्त कैद आणि १०,००० रुपये दंड. दंड न दिल्यास आणखी नऊ महिने सक्त कैद.

गिरजाप्रसाद. तीन वर्षें सक्त कैद पैकीं तीन महिने अंधार कोठडी आणि ३००० रु० दंड. दंड न दिल्यास आणखी नऊ महिन्यांची सक्त कैद.

लछमनदास. ३ वर्षें सक्त कैद पैकीं तीन महिने अंधार कोठडी व ५,००० रु. दंड, दंड न दिल्यास आणखी नऊ महिने कैद.

रामिश्वरदास आणि सुखनंदन प्रत्येकीं २ वर्षें सक्त कैद पैकीं तीन महिने अंधार कोठडी आणि १,००० रु० दंड. दंड न दिल्यास आणखी नऊ महिने सक्त कैद.

रघुनाथदास— तीन वर्षें सक्त कैद पैकीं ३ महिने अंधार कोठडी. सु. प.

संमति वयाच्या कायदे पंडितांस एक बिकट प्रश्न — बंगाल्यांत एका मुलीच्या वयास १० वर्षें आणि चार महिने झाले तेव्हां तीस न्हाण आलें. रीती प्रमाणें गर्भाधान वगैरे संस्कार होऊन नवरा बायकोचा समागम होऊं लागला पुढें ती मुलगी गरोदर होऊन तिच्या वयास ११ वर्षें आणि दोन महिने होतात तों ती बाळंत होऊन तीस मूल झालें तिच्या वयास १२ वर्षें पूर्ण होण्यास अजून ४ महिनें अवकाश आहे. ही मुलगी बाळंत झाली त्याच सुमारास संमति वयाचा कायदा पास झाला. बारा वर्षांच्या स्त्रीशीं समागम केला असतां तो नवरी संभोग होतो असें संमतीचे कायद्यानें ठरविलें आहे. तेव्हां आतां त्या नवऱ्यानें आपल्या एक वेळ मूल झालेल्या स्त्रीशीं समागम केला असतां संमति कायद्याचा कोरडा त्याच्यावर ओढला जाईल कीं काय असा स्टेटस्मन नामक इंग्रजी पत्रांत एक प्रश्न आला आहे. संमति वयाचे कैवारी ह्मणतात संमति कायद्याप्रमाणें त्यानें स्त्रीशीं समागम केल्यास त्याजवर खटला चालण्यास कांहीं हरकत नाहीं. संमति वयाच्या कायदे पंडितास कोडें घालण्यासाठीं परमेश्वरानें हा प्रश्न उत्पन्न केला कीं काय असा संशय येतो.

आफिसरांवर हल्ला — हैद्राबाद कांटिजंट पैकीं लेफ्टनन्ट्स सेक्स्टन आणि डेवीडसन हे दोघे लष्करी आफिसर नवाब तवारजंग यांच्या जहागिरीच्या हद्दींतील इंदूर गांवीं शिकारी साठीं गेले असतां त्यांच्यावर गांव वाल्यानीं हल्ला केला एकास बरीच मोठी व दुसऱ्यास लहान जखम लागली आहे.

विद्युत शक्तीनें चालणारे पंखे— मुंबईतील मेसर्स फिलिप्स आणि को या कंपनीच्या दुकानीं विजेचे लहान मोठे पंखे तयार होत आहेत हे पंखे सतत आठ नऊतास मनुष्याच्या मदती शिवाय चालतात व लहान मोठ्या आकाराच्या मानानें ह्यांस १०० पासून १५० रु० किंमत पडेल असा सुमार आहे. पंखा हालवण्या करितां पंखेवाला ठेवण्यास जो खर्च लागतो तो सर्व ह्या पंख्याच्या साधनानें वांचतो असे ह्मणतात श्रीमंतानी अनुभव पहावा.

मद्रास कडील दुष्काळ— चिंगलपट आणि उत्तर अर्काटची स्थिति फार वाईट आहे. तेथें पाऊस पडला नाहीं गोदावरी, कृष्णा बल्लारी, मद्रास चिंगलपट, उत्तर अर्काट, त्रिचनापल्ली, मदुरा, कोईमतूर, निलगिरी, दक्षीण कानडा, आणि मलबार जिल्ह्यांत धान्य अतिशय महाग झाले आहे चिंगलपट मध्यें ७४९६, व वांदीवासमध्यें ९०७० व इतर ठिकाणीं थोडे फार लोक रिलिफकामावर आहेत. आता रिलोफ मद्रासच्या रेव्हिन्यू बोर्डानें हिंदुस्थान सरकाराकडे केला आहे. रिलीफ कामावर लावलेल्या मजुरांस काम मोजून मजुरी देतात या मुळें कामावर जाण्यास लोक फार नाखूष आहेत असा तिकडील पत्रांतून फार बोभाट आहे. सु. सू.

विजापुराकडे पटकी उद्भवली आहे.

रशियांत पांच हजार मैल लांबीची रेल्वे झाली आहे.

जगांत नित्य ६५ कोटी उतारू आगगाडी मार्गें जातात येतात.

विजेच्या साधानें दात उपटण्याची युक्ति निघाली त्यामुळें बिलकुल इजा होत नाहीं.

फ्रांसांत २८ हजार शाळेतून बागबगीचे तयार करण्याचें ज्ञान शिकवितात.

गोव्याची रेल्वे सडूर्न मराठा रेल्वेकडे देणार ह्मणतात.

मद्रास इलाख्यांत दुष्काळ उड्या मारीत असून सरकार त्याच्या प्रीत्यर्थ कामें सुरूं करीत आहेत.

पुण्यांत प्रोफेसर टिळक यांनीं कायद्याचा वर्ग काढला आहे, ६६ विद्यार्थी तूर्त जमले आहेत.

रडतां कां? तुमच्या अंगांत कांहीं करामत असेल तर करून दाखवा. अशी मोठें मंडीत बसल्यानें इंग्लिश राज्यांत सुखी होण्याची आशा सुद्धां बाळगूं नका. बाहुबलाला नाहीं ठाव, तेथें मानसिक व शारीरिक श्रम करणार असला तरी विचारतो कोण? कानावर पागोटें अथवा रुमाल लटकाऊन हातांत काठी घेऊन चालला खटल्याची मध्यस्ती करण्यास तस्ल्यांची मदत घेऊन राजकीय घटणा बदलण्यास तयार आहो असें ह्मणण्यास लाज कशी वाटत नाहीं? बंडा गुलाम हात जोडून अज्ञाधारकपणा सर्व काळ दाखऊन तुकडा मिळवितो व १० वाजल्या पासून न्यायाविशापुढें यस् सर, यस् सर, करून थुंकी झेलतो तसल्या लोकांस पुढारीपणा देऊन होत इच्छिणें अज्ञानपणाचे, अभरवशाचे, व मूर्खपणाचे नव्हे काय? पोळपाट लाटणी घेऊन शहरांतून पुष्कळ विधवा हिंदू लागल्या ह्मणजे लोक सुखी झाले. अथवा आपला काल चांगला आला अशी समजूत असेल तर ती अर्धी काढून टाका पराधिनतेस पायाखालीं चिरडे तरच कांहीं बरें होण्याची आशा असतां वकिलीचा धंदा स्वतंत्र ह्मणवून त्यांस मोहोरके करतां पण आमच्या मतानें त्या सारखा नालिस्त व दास्यत्वाचा धंदा दुसरा कोणताच नसेल ज्याची दृष्टी द्रव्यानें वेधणारी त्यास स्वतंत्रपणाच्या पोषाखानें हा तुमचा पाठीराखा श्री कृष्ण भगवान, हा तुमचा वाली, हा तुमचा धुरीचा टेकेदार असें म्हणून लोकांस फसविणें बरें नाहीं, वकील ह्मणजे दुसऱ्याचें मढें घेऊन रडत बसणारे लोक त्यांजकडे देशाचा पुढारीपणा देऊन काय ते घडमले हेच करणार अशी जोंवर लोकांची समजूत तोंवर आणखी खाड्यांत पडण्याची मात्र भीति आहे. म. मि.

---

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

[illegible]
सहामाही " ३ " ८८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास.................... ०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस .......०१

per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 ,,1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..............................4as

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 a
Repetition per line 3a,

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXV | AKOLA MONDAY 29 JUNE 1891 | NO 25

वष २५ | अकोला सोमवार तारीख २९ माहे जून सन १८९१ इ० | अंक २५

## नमुना नंबर १४२
## दिवाणी कोर्टास सूचना

कि. क्लास १३ मिसल नंबर १/१८९१

आज्ञानाच्या माल मिळकतीच्या वहिवाटीचे सरटिफिकीट मिळण्याविषयीं अथवा अज्ञानाचें पालन व त्याचे माल मिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्याविषयीं सन १८५८ चा आक्ट ४० कलम ६ प्रमाणें.

अर्जीचा नंबर.

स्पे. अ. कमिशनर साहेब जिल्हा अकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार—— दिनकर
बापाचें नांव—भगवंतराव
जात —— देशमुख
रहाणार —— उगव

वरील (अज्ञान) दिनकर जात देशमुख रहाणार उगव तालुके अकोला जि. अकोला यानें त्याच्या माल मिळकतीच्या वहिवटीचे सरटिफिकीट मिळावें म्हणून अर्ज दिला आहे यास्तव मृत्युपत्राचे आधारें किंवा दस्तऐवजा वरून किंवा अगदीं नवळचे नातलगपणाचें कारणावरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदरहू अज्ञानाचे माल मिळकतीवर मी पालन कर्ता या नात्यानें कबजा करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं, याणी तारीख ४ माहे जुलई सन १८९१ इसवी रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हक्काची लेखी हकीकत दाखल करावी. तारीख २० माहे जून सन १८९१ इ०

Mahommed Yassinkhan
स्पे० अ० कमिशनर अकोला

---

### नोटीस

मे० शाबासखां वलद महिबूबखां मुसलमान रहणार लाखनवाडा ता० बाळापूर जि. अकोला यांसः—

नोटीस देणार आनंदा वलद नारायण पाटील रहाणार लाखनवाडा. नोटिशीनें असें कळवितो कीं, तुह्मी आमचे वडिलापासून आमचे वाडवडिलांनीं मिळविलेलें मिराशी शेत रु० ४०० शेंस विकत घेतलें असें आम्हांस समजतें. सदर्हू शेत आमचे समतीशिवाय तुह्मी घेतलें हें बरोबर केलें नाहीं. याजकरितां तुह्मांस इतकेंच सुचवितों कीं घेतलें असल्यास परत द्यावें. नसल्यास घेऊं नये. आणि इतकेंही उपर आमच्या समतीशिवाय तुम्ही शेताचा सौदा केला असल्यास तुम्हांस शेतांत येऊं देणार नाहीं व शेत तायांतही देणार नाहीं. व याजबद्दल कोणत्याही प्रकारचें आमचें नुकसान झाल्यास सर्व प्रकारचे जबाबदार तुम्हांस धरून नुकसान भरून घेतलें जाईल. कळावें. तारीख २२ माहे जून सन १८९१ इ०

(सही.)

सहीची निशाणी आनंदा वलद नारायण पाटील रहाणार लाखनवाडा यांचे हातची असे.

---

### नोटीस

मे० शाबासखां वलद महिबूबखां मुसलमान रहाणार लाखनवाडा तालुके बाळापूर जि० अकोलें यांसः—

नोटीस देणार नारायण वलद कमळाजी पाटील रहाणार लाखनवाडा तालुके बाळापूर जिल्हा अकोला. नोटिशीनें असें कळवितों कीं, तुह्मी आमचे वंश परंपरा उपभोग घेण्याचें शेत रु० ४००शेंस खरेदी करून घेतलें. ४०० शें रुपयपैकीं १०० रुपये रोख दिले. बाकी रुपये ३०० दिले नाहींत. व मागितलें असतां आज देऊं उद्यां देऊं असें सांगतां. याजकरितां तुम्हांस या नोटिशीनें असें कळवितों कीं नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत सदरहू राहिलेले रुपये ३०० आणून द्यावें. न दिल्यास खरेदीपत्र रद्द आहे. व तुम्हांकडून पावलेले रुपये १०० आह्माकडून घेऊन जावें. कळावें. तारीख २२ माहे जून सन १८९१ इसवी.

(सही.)

सहीची निशाणी नारायण वलद कमळाजी पाटील रहाणार लाखनवाडा यांचे हातची असे.

---

## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास अनकूल असतील असें समजूं नये.

---

रा. रा. वऱ्हाड समाचारकर्ते यांस

वि वि. संमति कायदा रद्द करण्या बद्दल पार्लमेंट सभेस अर्ज पाठविण्यासाठीं उमरावती प्रांत वऱ्हाड येथें सभा.

तारीख २१ मिनहू रोजीं रात्रीं वरील कारणासाठीं उमरावती येथें लोकांचा टोलेजंग सभा झाली. सभेस सर्वांनीं येण्याबद्दल निमत्रण पत्रिका वाटल्या होत्या. नेमलेले वेळेपूर्वीं लोकांची इतकी गर्दी झाली कीं, सभेस जें ठिकाण नेमलें होतें तें पाऊल ठेवण्यास वाट नाहीं इतकें भरून गेलें. गांवींतील मोठमोठे संभावित लोक, शास्त्री, पुराणीक, पंडीत, शेट सावकार, व्यापारी, वकील मंडळी कांहीं सरकारी नौकर आदे करून निरनिराळ्या धंद्याचे व जातीचे लोक आले होते.

वऱ्हाडांतील राजमान्य गृहस्थ रा. रा. श्रीकृष्ण नरहर उर्फ बापू साहेब खापर्डे पेन्शनर ए. अ. क. यांची स्वारी नुकतीच येथें आल्याचे समजल्यावरून त्यांस गांवांतील वजनदार गृहस्थांकडून सभेस येण्याविषयीं मुद्दाम पाचारण होऊन अध्यक्षस्थानीं त्यांची नेमणूक सर्वानुमतें टाळ्यांच्या गजरानें झाली. यामुळें सभेस विशेष शोभा आली. रा. बळवंतराव परांजपे संगीत मंडळीपैकीं उत्तम पात्रांनीं प्रथम देवीचे स्तुतिपर कवन म्हणण्याची इच्छा दाखवून सुंदर गायनांनीं मंडळीस तोषविलें व सभेचें कामास सुरवात झाली.

प्रथम सभेंत काय काम होणार व भाषणें कोणाचीं होणार याजबद्दल रा. रा. गोपाळ वामन बापट बी. ए. यांनीं थोडक्यांत मंडळीस कळविलें. नंतर रा. रा. पांडुरंग गोविंद उर्फ अण्णा साहेब वकील यांनीं उठून हिंदुस्थानी भाषेंत सभा भरविण्याचा उद्देश सर्वांस कळविला. व संमति वयाचा कायदा हिंदुस्थान सरकारनें पसार केला तो रद्द व्हावा म्हणून पार्लमेन्ट सभेस वऱ्हाडांतील लोकांकडून अर्ज जाण्याची अवश्यकता गोड भाषणांनीं व्यक्त करून दाखविली. या सुचनेस अनुमोदन देण्यासाठीं व वरील उद्देश सर्वत्रांस देशभाषेंत समजावा म्हणून रा. रा. गणेश श्रीकृष्ण उर्फ दादा साहेब खापर्डे हाय कोर्ट वकील यांचें भाषण मराठींत अस्खलित, अति सुरस व भारदस्त असें झालें. त्यांचे भाषणाचा सारांश— हा कायदा कलकत्यास पसार होण्यापूर्वीं त्यापासून होणारे भावी त्रासदायक परिणाम, धर्मनिबंधाविरुद्ध वर्तन, व लोकांची नागणी यासाठीं हा कायदा पसार होऊं नये म्हणून विनंति करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारास अर्ज पाठवून कळविण्याच्या हेतूनें प्रथम उमरावतीस कांहीं महिन्यांपूर्वीं फार मोठी जाहिर सभा झाल्याचें स्मरण मंडळीस दिलें या व हिंदुस्थानांतील इतर मोठमोठे ठिकाणचे लोकांचे अर्जा कडे लक्ष्य न देतां हिंदुस्थान सरकारानें हा कायदा पसार केला. संमत्ति वयाच्या कायद्याचे जनक नामदार सर आर. स्कोबल साहेब यांची स्वारी विलायतेस सत्वर जाण्याची असल्या मुळें कायदा पसार होण्या पूर्वीं जितका पूर्ण विचार कायदे करणारे मंडळीचे सभेंत झाला पाहिजे होता तितका न होतां हें बिल फार गडबडीनें पसार झालें. व हीं गोष्ट कायदा पसार झाल्यावर सुमारें एक आठवड्यानेंच हिंदुस्थान सरकारचे देखील नजरेस आली. तो अमलांत आणतानां सरकारी कामगारांनीं किती जपलें पाहिजे या बद्दल सरकारांनीं कडक घट हुकूम फिरविले याजवरून स्पष्ट रीतीनें व्यक्त होत आहे. या कायद्या पासून प्रसंगीं कोणाच्या अब्रूस धक्का बसेल याचा नेम नाहीं. या कामीं सरकारांत फिर्याद झाल्यास तरुण स्त्रियांची तपासाचे कामीं विटंबना होणार व त्यांची परीक्षा डाक्तर लोकां कडून होणार. या बाबत परीक्षा म्हटली म्हणजे हात, पाय, नाडी अगर तोंड पाहून होणारी नव्हे तेव्हां स्त्रियांस व सर्व जगास लज्जेचें जें मुख्य ठिकाण तें परकीया कडून तपासविण्याचा भयंकर प्रसंग येणार; त्या सारखी अब्रूस कलंक आणणारी जगांत दुसरी गोष्टच नाहीं. व गुन्हा शाबीत होवो किंवा न होवो हा प्रकार होणारच. पुढें नवऱ्यावर फौजदारी न्यायाचे कोर्टांत काम चालून त्यास जन्म पर्यंत काळ्या पाण्याची अगर त्याच्या आयुष्यांतील मुख्य वयाचे पत्ते पर्यंत सक्त मजुरीची शिक्षा शानिती अंतीं भोगावी लागणार. त्या पासून त्याचा स्वतःचा जन्माचा तोटा होऊन त्यास, त्याचे कुलास, व त्याच्या बायकोस मोठा कलंक लागणार. बरें नवरा नशिबानें कैदेंतून जगून, वाचून सुटून परत आला तरी त्याच्या आयुष्याचें जन्माचें मातेरें झालें तें कायमच झालें. त्यास मुनसीपाल्टींत अगर इतर प्रसिद्ध ठिकाणीं कोणीही घेणार नाहीं. व कामाचें संबंधानें त्यास कोठेंही न्यायाचे कोर्टांत जावें लागलें तर त्या वेळीं प्रथम सवाल त्याचे शिक्षे बद्दल होणार. शास्त्राच्या आज्ञे प्रमाणें स्त्री प्रथम ऋतुमती झाली म्हणजे पहिले सोळा दिवसांत गर्भाधान करावें म्हणून जी आज्ञा आहे ती या कायद्या मुळें मोडावी लागणार; तुमचे धर्म संबंधीं कामांत कधींही व कोणत्याही प्रकारें हात घालणार नाहीं म्हणून महाराणी सरकारांनीं हिंदुस्थानचे लोकांस सन १८५८ सालीं जाहिरनाम्यांनीं कळविलें त्यांत दिलेले वचना विरुद्ध हा कायदा पसार झालेला आहे. त्या पासून कोणासही फायदा नसून सर्वांशीं त्रास आहे.

कायदा करणारांचा हेतू कितीही चांगला अहि पण गैर समज होऊन तो पसार झाल्याचें दिसतें. भाषणकार म्हणाले कीं राजा चौवांचे डोळयांनीं पाहतो, चौवांचें कानांनीं ऐकतो व चौवांचे तोंडांनीं बोलतो. कोणती गोष्ट प्रजेस हितावह आहे अगर नहीं या बाबतींत राजाची समज करून देण्याचें काम त्याजजवळ रात्रंदिवस जी सचीव मंडळी नौकरी करितात त्यांचें आहे यासाठीं राजा चुकला तर तो दोष त्याचा नाहीं तो सचिवाकडे येतो. कोणती गोष्ट विहित अगर अविहित हे राजास कळविण्याचें काम प्रजेचें आहे व त्याच्या नियमापासून झालेले तोटे हेही प्रजेनेंच त्यास कळविले पाहिजेत. हल्लींचे राजकर्ते परदेशी, परधर्मी, व आपल्या देश भाषा जाणणारे नसल्यामुळें या देशांतील लोकांस कोणते नियम चांगले, कोणते वाईट हें कळविण्याची जबाबदारी तर प्रजेवरच मुख्य आहे. हल्लींचे राज्य व्यवस्थे प्रमाणें एका सरकारानें केलेले ठरावांवर दुसऱ्या सरकाराकडे दाद मागण्या-

साठीं अर्ज पाठविण्याची सदर परवानगी असल्यामुळें व वरिष्ठ सरकार रयतेची दाद घेण्यास तयार असल्यामुळें असल्या कामीं हिंदुस्थान सरकारांनीं केलेला कायदा रद्द करण्याचें बाबतींत विलायतचें पार्लमेंन्ट सभेस अर्ज करून दाद मागणें हें आपले लोकांचे कर्तव्य होय. ही गोष्ट राजा विरुद्ध अगर नीती विरुद्ध मुळींच होत नाहीं व मानली जात नाहीं. यासाठीं हा कायदा रद्द झाला पाहिजे ह्मणून पार्लमेंन्टास अर्ज करण्या बद्दल भाषणकारांनीं अनुमोदन दिलें. वरील व याच बाबतींत दुसरे मुद्यावर दादासाहेब खापर्डे यांचें भाषण सुमारें अर्धातास मुद्देसूत, सुरस, व सर्वांचे मनावर ठसा उमटण्या सारखें झालें. यांचे वाणीस फार माधूर्य असून भाषण करण्याची व श्रोत्यांचे मनावर ठसा उठविण्याची शैली अलौकिक आहे हें आपणांस व सर्वांस श्रुत आहेच. या गृहस्थांचें मधूर भाषण झाल्यावर आपणांसें तो मनकूर संमत असल्या बद्दल सर्वांनीं टाळ्या वाजवून आपली पसंती व्यक्त केली व हा ठराव सर्वानुमतें पसंत झाला.

त्यानंतर रा. रा. पांडुरंग बाबूराव वालेवाल्कर बी. ए. एल. एल. बी. हाय कोर्ट वकील यांनीं या विषयावर भाषण करून नंतर पार्लमेन्ट सभेस अर्ज करण्या साठीं येथें तयार केलेला इंग्रजी मसुदा वांचून दाखविला. अर्जातील मतलब मुंबई व कलकत्ता येथें सभा भरून पास झाल्या प्रमाणेंच असल्या मुळें तो येथें देण्याची जरूरी दिसत नाहीं.

रा. रा. वालेवालकर ह्मणाले कीं हिंदुस्थानांतील प्रजा जशी त्यांचे धर्माचे कामांत हात घातल्यानें नाराज व दुःखी असते तशी कोणतेही गोष्टीनें नसते. त्यांचेवर कोणीही राज्य करो! कितीही त्यांचे पैसे नेवोत! ते इतकी फिकीर करित नाहींत पण धर्माच्या बाबतींत जर कोणी हात घातला तर मात्र त्यास कधींच खपत नाहीं. धर्मरीतींत हिंदुस्थान सरकारांनीं हात घालणें बरोबर होणार नाहीं म्हणून सरजेम्स फरग्युसन व नामदार लॉर्ड डफरीन् यांनीं नुकतेंच थोडे वर्षांपूर्वीं व त्याच बाबतींत कायदा करण्याचें नाकबूल केलें. या गोष्टीस अल्पावकाश झाला नाहीं तोंच आमचे लोकांत इतका विलक्षण काय फेर बदल झाला हें समजत नाहीं. व या कायद्या विरुद्ध विलायतेंतील सरसीन्मुरके वगैरे प्रसिद्ध गृहस्थांपैकीं कित्येकांनीं आपले अभिप्राय प्रगट केले आहेत. सन १८५८ सालचे महाराणी सरकारचे जाहिरनाम्यांतील स्पष्ट वचन व अभय या विरुद्ध हा कायदा पसार झाला, साठीं तो रद्द झाला पाहिजे अशा मतलबाचा अर्ज वऱ्हाडांतून जाणें विहित आहे असें भाषणकार म्हणाले. यांचेंही भाषण चांगलें झालें. या सुचनेस रा. रा. बाजीशर्मा भाटे यांनीं अनुमोदन दिलें. रा. रा. वालेवालकरांनीं अर्जाचा मसुदा इंग्रजींत वांचून दाखविला त्यांचा गोषवारा रा. भाटे यांनीं लोकांस कळविला. व तो ठराव सर्व मान्य झाला. या नंतर रा. रा. रामविलास रावसाहेब, केवलचंद शेटजी वगैरे मंडळींचीं अल्प भाषणें झालीं या सभेचा उद्देश सर्वत्र लोकांस किती मना पासून आवडला हें या पासून सहज समजेल. या प्रमाणें काम होऊन सभा विसर्जन होण्या पूर्वीं सभेचे अध्यक्षाचे आभार मानिलें व मशार निल्हे नाटककार मंडळींनीं "देवी श्रीविक्तोरिया सार्व भौमिनी" हें पद्य फार उत्तम गाइलें. तें गातांना सर्व मंडळी उभी होती हें कळविलें पाहिजे. नाहीं तर पुण्यास एक वेळीं झालेल्या प्रसंगा प्रमाणें कदाचित गैर समजूत होईल. नंतर देशी कपड्या बद्दल सभा भरविण्याचे वेळीं सर्वांनीं अवश्य यावें म्हणुन मि. वालेवालकरांनीं सर्वांस विनंती केली तेव्हां. "जरूर येऊं" असें कित्येक मंडळींनीं उत्तर दिलें. अखेर रा. रा. दादासाहेब खापर्डे यांनीं सर्वांनीं सभेस येण्या बदल तसदी घेतली म्हणून मंडळींचे आभार मानिले व सभा विसर्जन झाली. एकंदरीत सभेचें काम फार व्यवस्थेनें, आल्हादानें व एक चित्तानें झालें; याजबदल सभा भरविणार स्तुतीस पात्र आहेत.

ता० २४।६।९१ आपला एक
उमरावती. नूतन मित्र
'क्ष,'

वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ठ वद्य ८ शके १८१३

मणिपूर संस्थानांत मुख्य तीन राजपुरुष असतात. जो तक्ताधीश असतो त्यास महाराज म्हणतात. महाराजांचे हाताखालीं त्यांचे दोन बंधु असत. त्यांस युवराज व सेनापति हे किताब होते. गुदस्त सालीं सप्टेंबरांत युवराज व सेनापति या उभयतांनीं महाराजांस पदच्युत केलें त्या वेळीं ते अनुक्रमें महाराज व युवराज झाले आणि त्यांचा कनिष्ठ बंधु सेनापति झाला. गेल्या मार्च महिन्या पर्यंत पदच्युत महाराजाविषयीं म्हणण्या सारखी विचारपूस न करितां मि. क्विंटन् यांनीं कमिशनरच्या सल्यानें सेनापतीस हद्दपार करण्याचा घाट घातला परंतु तो फसून सर्व बेत त्यांच्यावर उलटला आणि क्विंटन प्रभृति इंग्रजी अंमलदारांचे खून झाले ही गोष्ट सर्वश्रुत आहे. पुढें जुने युवराज व सेनापति व नवे सेनापति यांच्यावर खटले उभारून इंग्रजी लष्करी अंमलदारांच्या न्याय कोडता समोर त्यांची चौकशी सुरूं झाली तेव्हां पासून आम्हांस मणिपूर संस्थानासंबंधानें विशेष काळजी लागली आहे कांकीं पहिल्यानें मणिपूर हें बंगालच्या पलीकडे आहे तरी हिंदु संस्थान आहे आणि दुसऱ्यानें सन १८५७ सालच्या बंडानंतर इंग्रजी अंमल आज एक पिढीपर्यंत अव्याहत चालूनही त्या मागील प्रसंगाच्या राजनितींच्या तत्वांचे आवलंबन हिंदुस्थान सरकार मणिपूर संस्थानासंबंधानें करील तर देशी राजेरजवाड्यांसही राजनिती फार घातुक होण्याचा संभव विशेष आहे.

महाराणी सरकार विरुद्ध लढाई उपस्थित केली, क्विंटन आदिकरून अधिकाऱ्यांस ठार मारण्या विषयीं लोकांस प्रवृत केले आणि स्वतां खून केले अशा मतलबाचे तीन आरोप वरील तिघा राजपुत्रावर ठेऊन त्यांची चौकशी सुरूं झाली. खुनाचा तिसरा अपराध शाबीद झाला नाहीं तरी पहिले दोन आरोप शाबीद होऊन त्या तिघाजणांस फाशीची शिक्षा लष्करी न्याय कोडतांत सुनावण्यांत आली आहे. फक्त या शिक्षांस व्हाइसराय साहेबांची मंजुरात मिळाली म्हणजे त्या अंमलांत येणार आहेत. पदभ्रष्ट महाराज असून. नसून सारखे आहेत आणि इकडे वरील तिघा राजबिंडयास देहान्त शिक्षा दिली म्हणजे मणिपूरचा हक्कदार कोणी उरला नाहीं! परशुरामानें निःक्षत्रिय पृथ्वी करून सोडली त्या प्रमाणें आमच्या सरकारचा हेतु राजघराण्यांतील पुरुषांचें निर्दालन करण्याचा असावा असें लोक बोलतात.

युवराज आपण निर्दोषी नाहींत असें प्रतिपादितात. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा कीं कळसूत्री बाहुली प्रमाणें मी तक्ताधीश होतो तेव्हां बऱ्या वाईट गोष्टींचे कर्तृत्व मजकडे येऊं शकत नाहीं. आणि अशाच मुद्यांचें नवे सेनापति यांचें म्हणणें आहे तरी त्याचा फारसा विचार होईल असें अव्वलच्या सरकाराच्या वर्तनावरून वाटत नाहीं. खुद्द सेनापति यांजवरील आरोप कितपत लागूं होतात याविषयीं फार थोडयां गृहस्थांस शंका असेल. दरबारास येण्याविषयीं सेनापतीस आमंत्रण होतें आणि दरबारांत गेल्या नंतर आपणास कैद करणार आहेत असें समजतांच सेनापतीनीं आपल्या वागणुकीचा मोर्चा फिरविला आणि इंग्रजी त्या त्या अंमलदारावर शस्त्र उचललें यांत देहांत शिक्षेस पात्र असा अपराध त्यांनीं कोणता केला हें आम्हांस समजत नाहीं.

आमच्या मतें आरंभापासून हिंदुस्थान सरकारचें पाऊल मणिपूर प्रकरणीं चुकीचें आहे. महाराजांस त्यांच्या बंधूनीं पदच्युत केलें त्याबदल बंडखोर भावांस कोणतें पारिपत्य झाल आहे! त्यासमयीं या बंडखोरांचा लगाम सैल सोडण्यांत इंग्रजी तऱ्हेचा कावा होता. क्विंटन साहेबांच्या मनांत युवराजास नवीन बळकावलेल्या गादीवर कायम करून सेनापतीस मणिपुरांतून हाकलून लावण्याचा विचार होता म्हणजे तेणेंकरून इंग्रजी अधिकार बळावत जाऊन सेनापती सारखा धुरंधर पुरुष नाहींसा झाला असता. रेसिडेंट ग्रिमवुड साहेबांचे आंकडे सेनापतीशीं चांगले पटले होते आणि त्यांच्या पत्नी निराळ्या ठिकाणीं स्वतंत्र राहत असल्या कारणानें कांहीं कांहीं नाजूक गोष्टींत सेनापती म्हणजे रेसिडेंटाचा उजवा हात होता असा तिकडील लोकांचा पक्का अनुभव सिद्ध ग्रह आहे आणि त्या प्रमाणें वरील गोष्टींचा ओघ असा दिसतो कीं सेनापतीस गादीवर बसविण्याचा रेसिडेंटचा मनोगत असावा. प्रत्यक्ष हिंदुस्थान सरकारनें पदच्युत महाराजांस निकालाचा जबाब दिला नव्हता त्या वरून सरकारचा विचार त्यांस पूर्ववत् आपल्या गादीवर बसविण्याचा होता. हे तिन्ही प्रकार सरकारी ग्याझिटांतून मणिपूर प्रकरणांतील महत्वाचे कागदपत्र अपुरे प्रासिद्ध झालि आहेत तरी त्या वरून स्पष्ट दिसून येतात. या प्रमाणें तीन विचार तीन तऱ्हेचे पटल्या मुळें कांहींच गोष्ठ निश्चयानें झाली नाहीं आणि त्या चुकीमुळें मणिपूर संस्थान रसातळास पोंचविण्याच्या संधानांत आलें आहे.

साधारणपणें प्रजेला न्याय देण्या विषयीं आमचे सरकार फार खबरदारी घेते आणि तसा लोकांचा सरकार संबंधानें खरोखर ग्रह आहे. त्या अर्थीं मणिपूरच्या चौकशीस आरंभ करण्या पूर्वीं अत्यावश्यक अशी तजवीज सरकारांतून व्हावयाला पाहिजे होती परंतु जेव्हां लष्करी अंमलदार न्यायाधिश त्यांचाच साक्षी पुरावा, आणि तेच राजपुत्रांच्या वर्तनें मांडणारे आहेत असें लोकांमध्यें जाहिर झालें तेव्हां पासून मणिपूर प्रकरणाचा शेवट कोणत्या थराला जाईल हें कित्येक धोरणी लोकांच्यां लक्ष्यांत येऊन चुकलें असावें. युवराज सेनापति व त्यांचे बंधु नवीन सेनापती या तिघांस देहान्त प्रायश्चित्त देण्या सारखा अपराध लागू पडतो किंवा नाहीं हें ठरविण्यास मुख्य पुरावा असा पाहिजे होता कीं इंग्रज सरकारचें वर्तन बंडास आरंभ होई पर्यंत निर्दोषी होतें इतकेंच नव्हे तर त्यांच्या हातून वरील राजपुत्रास बंडा शिवाय अन्य प्राणसंरक्षणाचा उपाय कांहीं नसावा अशा प्रकारची कोणती ही गोष्ट घडून आली नाहीं. परंतु ही चौकशी करण्याचा विचार सरकारच्या मनांत यावा कसा किंवा त्याविषयीं चकार काढणें म्हणजेही एक प्रकार राजद्रोहाचें पातक घडण्याचा संभव होता. वरील राजपुत्र अनेक प्रकारें दोषी असले तरी फांशीच्या शिक्षेला ते पात्र नाहींत असा आमचा समज असल्या कारणानें त्यांची आम्हांस मोठी कीव येते. परंतु ज्यांना बडोदा, काश्मीर, खंबायत इत्यादि स्थळांच्या राज्यक्रांतीचा इतिहास माहीत आहे त्यांना राजपुत्रांची नीट दशा लागेल किंवा नाहीं याविषयीं भ्रांति पडली असेल आणि ती भ्रांति पडणें हेंही साहजिक आहे.

लार्ड रिपन साहेबांनीं मणिपूर संस्थान संबंधानें पार्लमेंटमध्यें मोठ्या जोरदार रीतीनें वादविवाद चालविला आहे. त्यांच्या मतें फांशीची शिक्षा देणें न्याय्य नाहीं. लार्ड साहेबांच्या प्रश्नांला उत्तरें देते वेळीं स्टेट सेक्रेटरीनीं मोठा लपंडावाचा प्रकार मांडला असून मणिपुरास सेनापतीस हद्दपार करण्यासाठीं दरबार भरविण्यांत विश्वास घाताचा प्रकार नव्हतां असें ही प्रतिपादिलें आहे.

मणिपूर संबंधानें स्टेट सेक्रेटरीनीं भाषण करितांना व्हाइसराय लार्ड डाऊन यांच्या वरील बरीच जबाबदारी त्या प्रकरणांतील चुकाविषयीं कमी केली आहे आणि ही गोष्ट कोणीही कबूल करील कीं मणिपूर संबंधानें व्हाइसराय साहेबांस दोष देण्यापेक्षां आसाम कमिशनरापासून सर्व खालील अधिकारी मंडळीकडे एकंदरीनें सर्व दोष येत आहेत. व्हाइसराय साहेबांस बहुविध अधिकार सूत्रें चालवावयाची असल्यामुळें त्यांस हरएक गोष्टींत लक्ष पुरविण्यास अवकाश नाहीं त्या अर्थीं पुष्कळ प्रकारें त्यांच्या कामाच्या अनंतत्वाकडे नजर पोंचविली म्हणजे सर्वोपरीनें त्यांस जबाबदार धरितां येत नाहीं. व्हाइसराय साहेबांचीं कामें एका मनुष्याच्या हातून होण्या सारखीं नाहींत, आणि प्रांताप्रांताच्या गव्हरनरादि अंमलदार लोकांचें थेट स्टेट सेक्रेटरीशीं तारायंत्र द्वारें दळणवळण चालूं

ठेवितां येण्यासारखें आहे म्हणून जान ब्राइ-ट, ब्रॉडला इत्यादि थोर मुत्सद्याचा अभिप्राय असा होता कीं व्हाइसराय साहेबांची जागा अजिबात नको आहे आणि ती बंद केल्यानें हिंदुस्थान सरकारच्या खर्चाच्या संबधानें चांगलि काटकसर होईल आणि तेणेंकरून निर्मर्याद अधिकाराच्या व जबाबदारी नसलेल्या व्हाइसराय साहेबा सारख्या अंमलदाराकडून नेटेवांच्या हक्कांची व जिविताच्या व मालमत्तेच्या संरक्षणाची पायमल्ली थोडी बहुत तरी कमी होण्याचा संभव आहे.

---

मद्रासच्या 'हिंदु' नांवाच्या प्रत्याहिक पत्राच्या हैद्राबादच्या बातमीदारानें पत्र लिहिले त्यांतील मजकूर अशा मतलबाचा आहे.

निजाम सरकारचे दिवाण सर अस्मान जहा बहादूर यांस पुत्रलाभ झाला म्हणून त्यांच्या आप्तमित्र मंडळी मध्यें आनंदोत्सव चालले आहेत.

हैदराबाद हायकोडताचे जज्ज शेरीफूल हस्सन हे मरण पावल्या मुळें एका न्यायाधिशाची जागा रिकामी झाली आहे. त्या जागीं हिंदु किंवा मुसलमान नेमला जातो हें कळण्याकडे लोकांचें विशेष लक्ष लागलें. लोकांच्या तोंडून त्या जागेसाठीं ज्या कांहीं गृहस्थांची नांवें ऐकूं येतात ते गृहस्थ म्हणजे रा. रा. रघुनाथ प्रसाद बी. ए. राय मुरलीधर, राय हुकूमचंद एम् ए. हे होत.

हैदराबाद संस्थानांतील वर्तमान पत्रा संबंधानें त्या सरकारांतून एक कडक सरक्युलर होम सेक्रेटरी मार्फत प्रसिद्ध झालें आहे त्याचा आशय असा कीं वर्तमान पत्रांतून सरकारी अंमलदारास इजा होण्या सारखा धमकीचा लेख नसावा आणि निजाम सरकार किंवा त्याचा अंमलदार यान विरुद्ध लोकांचीं मतें दुषित होण्याचा कल असेल असे लेखही नसावेत. ह्या दोन्ही अटी फार जबर आहेत आणि त्यांच्या अनुसंधानानें वर्तमानपत्र चालवितां येईल असें वाटत नाहीं. या सरक्युलरा वरून लोकांचा असा ग्रह झाला आहे कीं नबाब मेहदी अली रूप देशांतील वर्तमानपत्रांचें शास्ते असत तर कांहीं ठीक पडेंत.

एक पोलिस अमीन तालुक्यांतून तपासणी करीत फिरत असतां त्यांच्याकडून न कळत एका मेजर साहेबांस खडी तालीम वगैरे न मिळाल्यानें त्यांस कांहीं महिने बडतर्फ केलें आहे. या गोष्टीस हसण्यास नको, कां कीं खुद्द इंग्रजींत काय थोडे धोडके प्रकार आढळतात.

हैदराबादेस एक विलक्षण वहिवाट दिसून येते कीं वर्तमानपत्रकारांच्या प्रकाशकांस वेळेवर नियमितपणानें आपापलीं पत्रें धाडण्या विषयीं ताकीद शहराच्या कोतवाला मार्फत पोंचते.

हैदराबादेस मोठ मोठ्या कुलीन घराण्यातून पाळण्यातल्या मुला मुलींच्या लग्ना संबंधानें परकर चोळीच्या सारखा समारंभ चालला असतांना दृष्टीस पडतो. सुधारणे विषयीं कितीही आक्षेप आणिले तरी लग्नाच्या या रूढी अवश्य बंद झाल्या पाहिजेत.

कैलासवाशी सर सालरजंग यांच्या कुटुंबांतील बेगमा पासून पंचावन हजार रुपये लांच खाला गेला म्हणून त्या विषयीं फार कसोशीनें चौकशी चालली आहे.

# The Berar Samachar

## MONDAY, JUNE 29, 1891

The Manipur tragedy of March last threatens another tragedy in the sequel. The Regent, Senapati and Angas are condemned to be hanged. They are declared to be guilty of waging war against Her Majesty the Queen Empress of India, and of abetting the murders of Quinton and his followers. In the Manipur affairs the military officers had to play a double part. They acted justly as commanders and they presided bravely as judges at the new Manipur tribunal. The sentences of the three princes are subject to the confirmation of the Governor General in Council. We hoped that the final decision would be subject to the approval of the Parliament but Lord Cross, the State Secretary, has confided the whole matter to the mature judgment of the Viceroy. We would at last request the latter to postpone his authoritative deliverance on the trial of the Manipur princes until the the Manipur question is come to a close in both the Houses of the Imperial Parliament. Lord Ripon is fortunately taking deep interest in the Manipur discussion. Lord Cross and his Under Secretary Sir John Gorst are trying to turn every point in defence of the India Government. They have both placed themselves in a singular position by their own declarations out of which they have attempted to creep out very lamely. The ability of the Senapati disqualified him as the head of the state and so the Government wanted to deport him. What a strange argument it looks in favour of mediocracy! Lord Cross further shuns off the responsibility of the Viceroy in the Manipur affair. There is again the often repeated assurance of no treacherous conduct in the resolution of the Senapati's deportation to the frontiers. Whatever may be the outcome we may rest content with the hope that truth and justice will triumph in the discussion of the Parliament.

We have requested His Excellency the Viceroy to postpone his deliverance on the question of the capital punishment and we have done that with a tinge of hope. Two Manipurs Aya Parel and Shamoo Colonel were condemned to death but their punishments Lord Lansdowne has commuted to transportation for life. This news has taken the military officers by surprise. A rumour is set afloat that annexation of the state and execution of the princes will alone embolden the coward Manipuris to report against their leaders and to help the English Political officer in settling the Manipur affairs. We circulate the rumour for what it is worth but with it we may throw a hint in regard to the hostile spirit of the Englishmen at Manipur.

---

The Manipur Blue-book is already before the Parliament. Sir Richard Temple styles the arrangement of facts in it as jungly and labyrinthine. He has tried with the help of this book to carry an ordinary man of the world in the due course of the events at Manipur. But when he begins to state the several questions which suggest themselves as arising from these events we happen to witness his masterly skill with which he arrays his arguments to defend the Governmental action. His first observation runs thus:—

"First, was the Government of India just and consistent in the policy prescribed? Certainly yes. Nothing could be more wise, judicious, and moderate than their orders on the one hand; while on the other hand a masterful attitude was preserved, as becomes the paramount. Indeed, a patriotic Englishman ought to feel pride and satisfaction in noticing the carefulness and attention which, amidst manifold distractions, the Government of India devoted to this little state.' Simple as we are we see nothing of the kind a *patriotic* Englishman is expected to notice with pride and satisfaction."

Sir Richard then admits with compunction of duty that the means actually used were not adequate for such enforcement. By the by we feel pride and satisfaction when he proceeds to remark: "No doubt, the 500 Goorkhas are excellent soldiers among the good soldiers, not only of India, but of the world. Like Wellington's men they would go any where and do any thing. In Asiatic warfare they are invaluable. Besides the ammunition was insufficient. The responsibility must, be shared alike by Government of India, Quinton and the military authorities. This, we are sure, nobody will contradict. But we further come to a nice quibbling of a lawyer. The Government did not, it is said, instruct Quinton to arrest Senapati at the Durbar though *'they instructed Quinton to hold a Durbar to announce their intentions and to arrest the Senapati.'* The question of apportioning the blame of a treacherous proceeding 'is narrowed down to Quinton.' Sir Richard is generous enough to excuse Quinton because he doubtless wished to avoid disturbance and bloodshed. Before concluding he traces the dismal occurrence to an event which is noted as follows: Grimwood ought not to have permitted the Maharaja to fly the country last autumn for that was the cause of the subsequent mishaps. 'In conclusion' says he 'a tragedy has been enacted that will long linger in the sorrowful memory of Englishmen. Otherwise the Manipur affair has no political importance in an adverse direction. It hardly detracts at all from the mighty fame which the Government of India has won by a long course of glorious achievements. Its only possible importance consists in this, that it may, under Providence, be made the occasion of vastly improving the Eastern frontier of India.' Thus reads the conclusion and we conclude with the hobby of Sir Richard Temple which he has enunciated in his first letter on Manipur affairs.

---

Acknowledging with thanks the report on the working of the charitable dispensaries in Berar we propose to pass a few remarks this time. The number of dispensaries during the official year 1890 was the same as in the previous one viz 44. The number of indoor patients increased by 302. The English medical system has reached the highest state of perfection. Internal system is most scientifically understood. But dispensaries are in general under young passed medical pupils, who are both extorting and destitute of that mental development which alone enables one to comprehend a subject in a masterly style. Those towns which possess the advantage of a Civil Surgeon show a marked tendency among the enlightened natives of an eagerness to avail themselves of the best and efficient medical aid. In villages mere empiries are often preferred to the hospital assistants. The officials at the head of administration will always aim at making efficiency and skill and high principles and good conduct the ground for promotion Again a plan be tried of detached private wards built on a plan adopted to native usages in which a sick patient could be attended by his own people subject to a reasonable degree of hospital discipline. Moreover there ought to be trained ward boys as in England. It often happens that the Symptoms of diseases can never be marked by the suffering and those around. Ward boys therefore serve naturally a link between the patient and the medical adviser.

There was a decrease of Rs 51 in the subscriptions received from the natives while there were no contributions from Europeans against Rs 114 in the previous year. It is indeed surprising that the Europeans subscribe nothing to the dispensaries especially as in all larger stations their servants must often receive medical relief from these institutions. In institutions like these it is the higher orders that must guard the lower ones. Every human being is morally responsible for the relief of the suffering poor. The subscriptions from the natives are small but their smallness can be hardly observed when Europeans of decidedly better understanding have refrained from giving any.

In conclusion we would advise all hospital assistants to be unselfish and to make it their pride to relieve the suffering poor. They must always bear in mind that remuneration is not the sole reward of the profession. Enlightened views, unselfishness and philanthropy should be the guiding principles of this class.

## ACKNOWLEDGEMENT.

We acknowledge with thanks the receipts of the following:—
The Reports on the Jail and Police Administration H. A. D. for 1890—91.

## वऱ्हाड.

हवामान—इतके दिवस चातक पक्षांप्रमाणें सर्वत्रांचे डोळे मेघराजाकडे लागले होते. पण आतांशा एक दोन दिवसापासून आमच्याकडे दृष्टी फेंकून वृष्टि करण्याची सुरवात केली आहे. गुरुवारीं व शनिवारीं येथें व आसपास थोडासा पाऊस पडला. परवां माने व मोर्तिजापूरच्या दरम्यान मोठा पाऊस होऊन रेलवेची तारही तुटली आहे. गेल्या गुरुवारीं उमरावती येथें थोडी पर्जन्य वृष्टी झाली. सकाळीं व संध्याकाळीं गार वारा सुटत असतो. मनुष्यांचा व विशेषें करून गरीब बिचाऱ्या जनावरांचा काळ आला होता त्याचा समूळ नाश करण्याचे मेघराजानें मनावर घेतल्यामुळें सर्वत्रांस फार आनंद झाला आहे. रोगराई कांहीं नाहीं.

गेल्या सप्तेंबरच्या पहिले तारखे पासून आज तागाईत एकंदर १६५४०६२ कपाशीच्या गठड्या विलायतेस रवाना झाल्या त्यांपैकीं वऱ्हाडांतून ३,८८,४६४ गठड्या असून त्या मागील वर्षापेक्षां ३१७७८ गठड्यांनीं कमी आहेत. वऱ्हाडांतील कपाशीचा व्यापार इतका खालवला ही गोष्ट फार सुमार होय.

वाशिमास एका फारेस्ट दरोग्यावर पैशाच्या बाबतींत फौजदारी मुकद्दमा चालू आहे.

वाशीम येथील म्युनिसिपालिटीच्या एका शिपायानें सुमारें शंभर रुपयाची अफरातफर केल्यावरून त्यांस एक वर्षाच्या कैदेची शिक्षा झाली.

## वर्तमानसार.

रामराम सलामाचेविचित्र परिपाठ.

ग्रीनलंड देशांत रामरामसलामांचा मुळींच परिपाठ नाहीं. आणि तो परिपाठ आहे, अशा लोकांस तेथचे लोक हंसतात. कां कीं, एका माणसानें दुसऱ्यास मोठें मानावें, हें त्यांना विलक्षण वाटतें.

फिलिपैन बेटांजवळच्या कांहीं बेटांत अशी चाल आहे कीं 'गांठ पडली म्हणजे लहान माणसानें मोठ्या माणसाचा हात किंवा पाय धरून तो आपल्या तोंडावर हळूच चोळावा.'

लाबरयांहातले लोक, थोरामोठ्यांचा सन्मान करावयाचा म्हटला म्हणजे, त्यांच्या आंगाला आपलें नाक चोळतात.

सौंड सामुद्रधुनीच्या आसपासचे लोक, पाहुण्याचा डावा पाय किंचित् वर उचलून तो आपल्या तोंडाभोंवतीं ओंवाळितात.

फिलिपैन बेटांतले लोक, दृष्टादृष्ट झाल्यावर आपापल्या गालावर हात ठेवितात, आणि गुडघा वांकवून एक पाय अमळसा उचलतात.

एबिआपियामध्यें, पाहुण्याचीं सगळीं वस्त्रें काढून घेऊन आपल्या आंगावर घालावीं, आणि त्याला अगदीं बहुतेक उघडे नागवें करावें हा परिपाठ आहे.

ओताहिती बेटांतल्या लोकांस सर जो० ब्याक्स ही भेटायास गेला, तेव्हां त्याच्या सन्मानार्थ म्हणून त्यांच्यांतल्या दोन बाया त्यांच्यापुढें अगदीं नग्न होऊन उभ्या राहिल्या!

जपानी लोक आणि आराकानी लोक रस्त्यांत भेटले तर आधीं पायांतले जोडे काढून ठेवितात आणि घरांत भेटले तर पायमोजे काढून ठेवितात.

आफ्रिका खंडाच्या किनाऱ्याच्या प्रदेशांत एक राजा आहे, तो दुसऱ्याचें आगतस्वागत करण्यास, हातच्या मधल्या बोटानें तीन टिचक्या मारतो.

कारामनीआ येथील लोकांत फार मोठा मान करावयाचा म्हटला म्हणजे, आपल्या आंगची शीर तोडावयाची, आणि रक्त पाहुण्यास प्यावयास द्यावयाचें.

चिनी लोकांत असा परिपाठ आहे कीं, गुडघे टेकावें, आणि दोन तीनदां जमिनी पर्यंत मस्तक वाकवावें; शिवाय वेगळ्या वेगळ्या प्रसंगाचे त्यांचे परिपाठ वेगळे वेगळे आहेत. राजाचें दर्शन होण्याच्या आधीं चाळीस दिवस, परक्या देशच्या वकिलास असा कांहीं संस्कार नित्य करावा लागतो.

डच लोक हे जबर खादाड- आहेत. अशी आख्या आहे त्यांच्यांत प्रातःकाळीं गाठी पडल्या म्हणजे, एकमेकांस जें काय म्हणतात, याचा अर्थ, "तुम्हास आज जेवण पोटभर मिळो," असा आहे. शिवाय त्यांच्यांतलें साधारण आगतस्वागत म्हटलें म्हणजे जें विचारतात, त्याचा अर्थ, "आपलें गलबत कसें काय चालतें " असा आहे. हा परिपाठ ते लोक रानटी आणि मासे खाऊन निर्वाह करणारे होते, तेव्हां त्यांच्यांत पडला असावा.

कैरो येथें साधारण आगतस्वागत म्हटलें म्हणजे "आपल्याला घाम कसा काय येतो" अशा अर्थाचें विचारावयाचें. त्यांच्यांत समज असा आहे कीं, आंग अगदीं कोरडें असून ज्वर असणं हें फार नाशकारक आहे.

चीन देशाच्या दक्षिणभागीं, मंडळी एकमेकांस भेटली म्हणजे, "भात खाला कां" असें विचारावयाचें, हें पहिलें आगत स्वागत आहे.

मंगोपार्क ह्यानें आपल्या आफ्रिकेच्या प्रवास वर्णनांत असें लिहिलें आहे कीं, "माझ्या मनांत बायको करावयाची होती, तो तरुण स्त्री, एका भांड्यांत पाणी घेऊन आली, आणि तें मजपुढें ठेऊन, माझ्यापुढें गुडघे टेकून तिनें माझी प्रार्थना केली कीं आपण कृपाकरून हात धुवावें. तसें मी हात धुतल्यावर, तिनें तें पाणी डोळ्यांस प्रेमाश्रु आणून मोठ्या संतोषानें घटाघट पिऊन "टाकलें. हा त्या लोकांत अतिशयीत प्रेमदर्शक परिपाठ समजतात.

याच बरोबर बा० कर्त्यांनी हिंदुस्थानांतील आगत स्वागत प्रकार दाखविला असतां तर बरें झालें असतें.

भविष्य.

बाबू कुलेंद्रप्रसाद बिस्वास या ज्योतिषी गृहस्थानीं या वर्षाचें वर्षफल वर्तविलें आहे, त्यांतील मुख्य गोष्ट खालीं लिहिल्या प्रमाणें:—

१ दीड वर्षाच्या आंत कानसरवेटिव प्रधानमंडळ जाऊन लिबरल प्रधानमंडळ होईल.

२ ब्ल्याक माउंटन स्वारीमध्यें इंग्लिशास चांगलेंसें यश यावयाचें नाहीं. डोंगरी लोकांशीं तह होईल.

३ तीन महिन्यांचें आंत इंग्लिश सरकार मणिपूर घेतील.

४ रशिया, फ्रान्स, जर्मनी, आफगाणीस्थान, चीन आणि जपान यांच्यामध्यें लढाया उत्पन्न होतील त्यांत इंग्लिशास पडावें लागेल.

५ आक्टोबर महिन्यांत लार्ड ल्यान्सडौन राजीनामा देऊन हिंदुस्थानांतून निघून जातील व त्यांच्या जाग्यावर येतील ते गृहस्थ फारच लोक प्रीय होतील, ते या देशाचें बरेंच कल्याण करतील. त्याचें वय ४०—४५ वर्षांचें असेल.

६ कांहीं केलें तरी संमती कायदा रद्द व्हावयाचा नाहीं.

७ अफूच्या व्यापाराच्या संबंधाचा ठराव पार्लमेंटांत होईल आणि तो अमलांत येईल.

८धरणीकंपानें वायव्य प्रांतांत बराच नाश होईल त्यांत दिल्लीस विशेष होईल.

९मुंबई, मद्रास आणि ओरीसा येथें दुष्काळ पडेल.

१० पाऊस गुदस्त सालासारखाच पडेल आणि चितागांग प्रांतांत महापूर येईल.

११ आगगाड्याचे अपघात विशेषें करून किसनगंज, दमदम, मलोली, पार्वतीपूर सुल्तानपूर असेनसोल आणि बरद्वान या ठिकाणीं होऊन माणसें फार मरतील.

१२ रोगराई फार होईल, लोकांस मनस्वी त्रास होईल, जेसोर प्रांतांत फारच पिडा होईल.

१३ वादळादिकांनींही संपत्तीचा नाश मनस्वी होईल.

काबुलाकडे ब्रिटीश एजंटाचे जागीं सरदार महंमद अफजलखान याची नेमणूक होऊन ते चार्ज घेण्याकरितां तिकडे गेले जर मुसलमान एजंट काबुलाकडे रवाना केला तर मग बडोदें, ग्वालेर, इंदूर, निजामहैद्राबाद येथेंच युरोपियन जातीचा एजंट नेमण्याचें कारण काय? असा एकानें सवाल आमच्याकडे पाठविला आहे त्याचें उत्तर आमचें सरकार काय देतें पहावें आमच्या मतानें शिरजोरपणा ज्या जागीं आहे त्या जागीं तेथलाच मंत्री पुढें करावा लागतो वर लिहिलेल्या संस्थानदारांच्या अंगांत कांहीं पराक्रम असतें तर तेथें दुसऱ्या जातीचा अधिकारी नेमला असतां कशाला?

निजाम कालेजमध्यें मुलें व मुली एकत्र अभ्यास करीत असत परंतु प्रिन्सिपाल साहेबांनीं आतां त्या मुलीस शाळेंत येऊन शिकण्याची मनाई केली. कारण विचारतां सांगतात कीं मुलांचें शेजारी मुली शिकत बसल्यामुळें मुलें व मुली क्षयरोगी बनतात. कांहीं गुप्त रोगानें मृत्युमुखीं पडतात. कांहीं पुरुषत्वापासून ढळली जातात, कांहीं मुलें बायको प्रमाणें हावभाव दाखवून मित्रमंडळीस खुष करणें यांतच आनंद मानूं लागतात. तात्पर्य मुलांच्या शाळेंत मुली शिकविण्यास घेणें म्हणजे संस्थेची हानी करूं पाहणें होय; इकडे आमच्या लोकांनीं लक्ष देऊन लवकर जागें व्हावें. मा. मि.

नवीनव्यवस्था— हल्लीं चोहोंकडे जसे बिन पगारी आननरी माजिस्त्रेट्स् आहेत तसेच लहान लहान दाव्यांचे निकाल करण्यासाठीं आननरी मुनसफ नेमण्याचा बंगाल सरकारचा मानस आहे असेल आनररी मुनसफ तूर्त कलकत्ता शहरीं नेमून त्यांच्या पासून काम कसें काय होतें ते पहावें आणि ती व्यवस्था उत्तम असें ठरल्यास ती चोहोंकडे सुरू करावी असा बंगाल सरकारचा विचार आहे.

टोळांनीं खाल्ला— अलजीर्स ( आफ्रिकेंतील फ्रेंचांची वसाहत ) येथें टोळांनीं अतिशय उपद्रव केल्या मुळें सगळ्या लोकांचें अतीशय नुकसान झालें ह्मणून टोळांच्या अंड्यांचा नाश करण्यासाठीं एक शास्त्रज्ञ आणिला होता त्यांचें नांव एम. कंकेल असें होतें ता. १७ मे रोजीं सदरशास्त्रज्ञ अत्यंत उष्णते मुळें झाडींत बसले असतां टोळांचा एक प्रचंड थवा येऊन त्यांनीं त्यांच्यावर हल्ला केला . सभोंवतालच्या झुडपांस आग लावून देऊन टोळांस उडवून लावावें असा बेतांत ते होते, परंतु कांहीं उपाय न चालून टोळांच्या वजनानें त्यांस मृत्युमुखीं पडावें लागलें.टोळांनीं त्यांचें नाक कान खाऊन टाकले होते. यावरून टोळां सारखें क्षुद्रप्राणी ही सूड उगवतात असें दिसतें.

उडणारी पाल— आशिया खंडाच्या व हिंदुस्थानच्या दक्षिण भागीं उडणाऱ्या पाली आहेत. ह्यांना फार लांब किंवा उंच उडण्यासारखें पंख नसतात. त्या भागीं ह्यांना उडणारी फुलें असें त्यांच्या निळ्या आणि भुऱ्या रंगावरून ह्मणतात. ह्यांचें शेपूट लांब असून सर्पा सारखें दिसतें. शु. सू.

—फ्रान्समध्यें येत्या जुलईच्या १० व्या तारखेपासून धान्यावरील कर कमी करणार.

—हिंदुस्थानांतील गिरण्यांत ११ वर्षांच्या खालीं मुलांना गिरणींत कामाला लावूं नये नये अशाबद्दल ठराव पार्लमेंटांत ता. १९ रोजीं पास झाला.

—इंडिअन कौन्सिल बिल काढून टाकण्यांत आलें. सु० प०

चीनमध्यें जो दंगा सुरु झाला आहे त्याच्या विरुद्ध फ्रेंच सरकाराकडून एक लढाऊ गलबत पाठविण्यात आलें आहे.

हैद्राबादच्या हायकोर्टाचे जज मोलवी सय्यद शेरीफ बुलहसन हे नुकतेच मरण पावले यांचे वय ४० वर्षांचे होतें.

अमेरिकेंत यंदा गव्हाचें पीक चांगलें येईल असें म्हणतात. आमचे इकडे अजून पाऊस सुद्धां नाहीं.

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यात येतें कीं अकोलें मुनसिपाल कमिटीचे हद्दींतील गवताचा लिलाव सन १८९१।९२ साला करितां तारीख ३० माहे जून सन १८९१ इ० रोजीं सकाळीं ७वाजतां टाऊनहालांत केला जाणार आहे. ज्यांची लिलाव घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहु तारखेस सदरहु ठिकाणीं हजर राहावें कळावें. तारीख ६।६।९१.

Vyankatesh R. Mudholkar
Secretary.
A. M. C.

## औद्योगिकपरिषद्

किंवा

कारागीर, कारखानदार, व्यापारी व देशांतील उद्योगधंदे वाढविण्याविषयीं हरतेंपरहरतें खटपट करणाऱ्या लोकांची सभा.

येत्या आगष्ट महिन्यांत पुणें मुक्कामीं भरणार आहे.

सभेची तारीख, सभेपुढें यावयाचे विषय वगैरे बद्दलची कच्ची माहिती मागाहून कळविण्यांत येईल

सभेसाठीं येऊं इच्छिणार लोकांनीं तारीख १५ जुलईचे आंत खालीं सही करणार यांजकडे आपलीं नांवें कळवावीं.

| | |
|---|---|
| पुणें, रेम्यूझिम कचेरी ता.१३ माहे मे १८९१ | महादेव बल्लाळ नामजोशी, देशी कारागिरीस व धंद्यास उत्तेजन देणारे मंडळीचे सेक्रेटरी. |

## जाहिरात.

एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आह्मांस कळवावें. माफक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा.

जी. डी. काविटकर
मर्चंट आणि कमिशनर एजंट
शहर एलिचपूर

## सचित्रक्याटलाग.



आर. डी. कानिटकर
आणि कंपनी
मुंबई गिरगांव ह्याचा नवीन
तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी
अर्ध्या आण्याचें तिकिट
पाठविल्यास मिळेल.

हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव खाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.